CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २५ जुलै २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २५६ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



धर्म आणि कायदा या दोघांमध्ये खरे पाहू जाता मुळीच संघर्ष नाही. हे दोन्हीही आजच्या युगात यशस्वी, सुखी जनजीवनासाठी आवश्यक आहेत. पण हे निर्विवाद आहे की, मूलतः धर्म कायद्यापेक्षा अधिक प्रभावी व परिणामकारी असा आहे. धर्म सूर्य तर कायदा म्हणजे दिवा. जीवनात दोघांचीही भूमिका आहे. लक्षात असू द्या की, सूर्य जोपर्यंत आकाशात चमकत राहतो तोपर्यंत दिव्याची आवश्यकता नसते. पण ज्या क्षणी सूर्य क्षितिजाखाली सरकतो त्या क्षणापासून दिवा आवश्यक होतो.

**रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

# भारत-ब्रिटनमध्ये ऐतिहासिक व्यापार करार

## वार्षिक ३४ अब्ज डॉलर्सने उलाढाल वाढणार ● उभय देशांमधील व्यापार होईल स्वस्त आणि जलद

◆ **लंडन, २४ जुलै**

भारत आणि ब्रिटनमध्ये गुरुवारी ऐतिहासिक व्यापार करार करण्यात आला. या करारामुळे दोन्ही देशांमधील व्यापार दरवर्षी ३४ अब्ज डॉलर्सने वाढण्याची अपेक्षा आहे. २०२० मध्ये युरोपियन युनियनमधून बाहेर पडल्यानंतर कोणत्याही देशासोबत ब्रिटनने केलेला हा सर्वांत मोठा करार आहे.

केंद्रीय व्यापार व वाणिज्य मंत्री पीयूष गोयल आणि ब्रिटनचे जोनाथन रेनॉल्ड्स यांनी या करारावर स्वाक्षरी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कीर स्टार्मर यांच्यात येथे झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर हा महत्त्वपूर्ण करार करण्यात आला. भारत आणि ब्रिटनच्या भरभराटीसाठी एफटीए हा एक आराखडा होता. या करारामुळे द्विपक्षीय व्यापार दरवर्षी ३४ अब्ज डॉलर्सने वाढण्याची अपेक्षा आहे,



व्यापारी करारावर स्वाक्षरी करताना भारताचे केंद्रीय व्यापार व वाणिज्य मंत्री पीयूष गोयल आणि ब्रिटनचे जोनाथन रेनॉल्डस्

अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करारानंतर व्यक्त केली. ते दोन दिवसांच्या ब्रिटन दौऱ्यावर आहेत.

आज आपल्या संबंधांमध्ये एक ऐतिहासिक दिवस आहे. अनेक वर्षांच्या कठोर परिश्रमानंतर आज आपल्या दोन्ही देशांनी व्यापक आर्थिक व्यापार करारावर स्वाक्षरी केल्याचा आनंद मला आहे, असे मोदी म्हणाले. या कराराचा फायदा भारतातील युवा, शेतकरी, मासेमार आणि एमएसएमई क्षेत्राला होणार असल्याचे मोदी म्हणाले.

भारताचा विकसित देशासोबतचा १० वर्षांपेक्षा जास्त काळातील पहिला मोठा हा द्विपक्षीय करार आहे. २०१६ मध्ये युरोपियन युनियनमधून बाहेर पडण्यासाठी मतदान केल्यानंतर आणि २०२० मध्ये अधिकृतपणे युरोपियन युनियनमधून बाहेर पडल्यानंतर ब्रिटनने स्वाक्षरी केलेला हा सर्वांत मोठा व्यापार करार आहे.

> अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मोठ्या प्रमाणावर परस्पर शुल्क आकारणीमुळे जागतिक अनिश्चितता निर्माण झाली असताना भारतासोबत व्यापार करारावर स्वाक्षरी करून ब्रिटन व्यवसायासाठी खुला आहे, असा शक्तिशाली संदेश या माध्यमातून देत आहोत.
> **कीर स्टार्मर,** ब्रिटनचे पंतप्रधान

> भारतातील वस्त्रोद्योग, पादत्राणे, मौल्यवान खडे आणि दागिने, मासे आणि अभियांत्रिकी साहित्याला ब्रिटनमधील बाजारपेठेत चांगल्या प्रकारे स्थान मिळेल. भारतातील कृषी उत्पादने आणि प्रक्रिया केलेले अन्न उद्योगासाठी ब्रिटनमधील बाजारपेठेत नवीन संधी निर्माण होईल.
> **नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

### ब्रिटनमधील उत्पादने परवडणाऱ्या दरात

भारतातील लोक आणि उद्योगांना वैद्यकीय उपकरणे आणि एरोस्पेस सुटे भाग यासारखी ब्रिटनमध्ये निर्मिती झालेली उत्पादने परवडणाऱ्या आणि स्पर्धात्मक किमतीत उपलब्ध होतील. हा एक असा करार आहे, जो आपल्या दोन्ही देशांना मोठे फायदे देईल. यामुळे वेतन वाढेल, राहणीमान उंचावेल आणि काम करणाऱ्या लोकांच्या खिशात अधिक पैसा येईल. नोकऱ्यांसाठीही हा करार चांगला आहे, त्याचप्रमाणे व्यवसायासाठीही आहे. यामुळे शुल्कात कपात होईल आणि व्यापार स्वस्त, जलद आणि सोपा होईल, असे मोदी म्हणाले.

भारतासोबतचा हा महत्त्वाचा व्यापार करार म्हणजे ब्रिटनमध्ये नोकऱ्या, गुंतवणूक आणि वृद्धी बळकट करणार आहे. यामुळे हजारो ब्रिटिश नोकऱ्या निर्माण होतील. व्यवसायासाठी नवीन संधी आणि काम करणाऱ्यांच्या खिशात पैसा येईल हाच आमच्या कृतीशील बदलाचा आराखडा आहे, अशी प्रतिक्रिया कीर स्टार्मर यांनी 'एक्स'वर व्यक्त केली. भारत-ब्रिटन या देशांमध्ये झालेल्या या करारामुळे भारतीयांना अनेक महत्त्वाच्या वस्तू स्वस्त मिळण्याची शक्यता आहे.

## एअर इंडिया एक्सप्रेसच्या विमानात उड्डाणापूर्वी बिघाड

**नवी दिल्ली, २५ जुलै**

राजधानी दिल्लीतील आंतरराष्ट्रीय विमानतळावर मुंबईला जाणाऱ्या एअर इंडिया एक्सप्रेसच्या विमानात उड्डाणापूर्वी तांत्रिक बिघाड झाला. त्यानंतर विमानाचे उड्डाण रद्द करण्यात आले आणि प्रवाशांना दुसऱ्या विमानाने पाठविण्यात आले. विमानात सुमारे १६० प्रवासी होते.

एअर इंडिया एक्सप्रेसच्या प्रवक्त्याने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, दिल्ली-मुंबई विमान उड्डाणाच्या तयारीत असताना वैमानिकाला तांत्रिक समस्या असल्याचे निदर्शनास आले. विमानाच्या तपासणीनंतर इंजिनात तांत्रिक बिघाड असल्याचे आढळून आल्याने उड्डाण रद्द करण्यात आले. प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन हा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर प्रवाशांना नियोजित स्थळी पोहोचविण्यासाठी पर्यायी विमान उपलब्ध करून देण्यात आले. मंगळवारी याआधी दिल्लीहून कोलकाताला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमान एआय-२४०३ मध्ये तांत्रिक बिघाड झाला होता. त्यानंतर विमानाला उड्डाण घेण्यापासून रोखण्यात आले. (वृत्तसंस्था)

## रमी खेळल्याचे आढळल्यास कोकाटेंवर कारवाई : अजित पवार

**मुंबई :** मंत्री माणिकराव कोकाटे यांचे रमी खेळतानाच्या सभागृहातील कथित व्हिडीओत सत्यता आढळल्यास कारवाईचा निर्णय आम च्या अखत्यारीमध्ये असेल. मुख्यमंत्री आणि आम्ही सर्व मिळून कारवाईचा निर्णय घेऊ. कोकाटे यांच्यासोबत समोरासमोर बसून चर्चा करणार असल्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी म्हटले आहे. पत्रपरिषदेत बोलताना गुरुवारी अजित पवार म्हणाले, महायुतीत कडवटपणा येईल, असे विधान कोणाकडूनही होता कामा नये. मी कोकाटेंना सांगितले होते, की इजा झाले, बिजा झाले आता तिजाची वेळ आणू नका. कृषिमंत्री कोकाटे यांच्या बाबतीत मला जी माहिती मिळाली ती घटना सभागृहाच्या आत घडलेली आहे.

## दक्षिण-पूर्व आता आशियातही पेटले युद्ध

**बँकॉक :** थायलंड आणि कंबोडिया यांच्यात गुरुवारी सकाळी प्रसात ता मुएन थॉम मंदिराजवळील सीमा वादावरून संघर्ष उफाळला. मंदिरावरील दाव्यावरून दोन्ही देशांचे सैन्यात चकमक झडली, त्यानंतर कंबोडियाने थायलंडच्या एका रुग्णालयावर केलेल्या हल्ल्यानंतर संघर्ष शिगेला पोहोचला. दोन्ही देशांच्या सैन्यांमध्ये सहापेक्षा अधिक सीमा भागात भागात चकमकी झडल्या. यात थायलंडचे १२ नागरिक ठार झाले, तर ५० पेक्षा अधिक जण जखमी आहे. यानंतर थायलंडने एफ- १६ लढाऊ विमानाने कंबोडियाच्या सैन्य ठिकाणांवर हल्ले केले. थायलंडने हवाई हल्ले केल्यानंतर कंबोडियानेदेखील प्रत्युत्तरात बॉम्ब हल्ले केले, यात थायलंडचे पाच सैनिक जखमी झाले.

# मुंबई हायकोर्टाच्या निकालाला स्थगिती

## मुंबई लोकल ट्रेन बॉम्बस्फोट प्रकरण

◆ **नवी दिल्ली, २४ जुलै**

मुंबई उपनगरीय रेल्वेतील २००६ मधील साखळी बॉम्बस्फोट खटला प्रकरणाच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाला गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. उच्च न्यायालयाने निर्दोष ठरविलेल्या १२ आरोपींच्या सुटकेला स्थगिती देण्यास आणि त्यांची पुन्हा तुरुंगात रवानगी करण्यास मात्र, न्यायासनाने नकार दिला.

मुंबई साखळी बॉम्बस्फोटातील आरोपींची निर्दोष सुटका करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाला राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते, आणि याप्रकरणी तातडीने सुनावणी घेण्याची विनंती केली होती. गुरुवारी न्या. एम. एम. सुंदरेश आणि न्या. एन. के. सिंह यांच्या न्यायासनाने घेतलेल्या सुनावणीत महान्यायाभिकर्ता तुषार मेहता यांनी महाराष्ट्र सरकारच्या बाजूने युक्तिवाद करताना सांगितले की, मुंबई साखळी बॉम्बस्फोटात १८९ जणांचा मृत्यू आणि ८०० हून अधिक लोक जखमी झाले होते. याप्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने



दिलेल्या निकालावर आमचा आक्षेप आहे. या प्रकरणात उच्च न्यायालयाने मांडलेली निरीक्षणे मकोकाअंतर्गत सुरू असलेल्या इतर प्रकरणांवर परिणाम करू शकतात. त्यामुळे या निकालाला स्थगिती दिली जावी आणि सुटका केलेल्या आरोपींची रवानगी पुन्हा तुरुंगात करण्यात यावी. यावर न्यायासनाने निकालाला स्थगिती देण्याचा निर्णय दिला, तर सुटका झालेल्या आरोपींना पुन्हा तुरुंगात पाठविण्याची आवश्यकता नसल्याचे नमूद केले.

**वादग्रस्त निकाल उदाहरण होवू शकत नाही**

मेहता यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायासन म्हणाले, या प्रकरणी उच्च न्यायालयाचा निकाल लागू राहणार नाही आणि त्यावरील स्थगिती मर्यादित स्वरुपाची असेल. सर्व आरोपींना सोडण्यात आले आहे आणि त्यामुळे त्यांना पुन्हा तुरुंगात आणण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, कायद्याच्या प्रश्नावर आम्ही असे म्हणू की वादग्रस्त निकाल हा इतर कोणत्याही प्रकरणात उदाहरण म्हणून मानला जात नाही. (वृत्तसंस्था)

# राज्य मंत्रिमंडळात फेरबदलाचे उपमुख्यमंत्री शिंदेंचे संकेत

### एसटी महामंडळाने एकत्र बूकिंगवर ३० टक्के केलेली वाढ रद्द होणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ जुलै-**

संत नामदेव महाराज यांच्या नावे जाहीर झालेला पुरस्कार स्वीकारण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आले असता त्यांनी पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. पत्रकारांशी बोलताना त्यांनी सध्याच्या राजकारणावर भाष्य केले आहे. ते म्हणाले, आम्ही टीम म्हणून काम करत आहोत. पद खाली वर होत असतात, असे म्हणत त्यांनी मंत्रिमंडळात फेरबदल होणार असल्याच्या चर्चांवर सूचक विधान केले आहे. तसेच पुढे बोलताना ते म्हणाले, चांगले काम करण्याचा सरकारचा अजेंडा आहे. आमचा अजेंडा खुर्ची नाही, खुर्चीत ज्यांनी बसवले त्यांचे प्रश्न सोडवणे हा आमचा अजेंडा आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आम्ही सारे एकत्र आहोत, असे शिंदे यांनी म्हटले.

यावेळी पत्रकारांनी लाडकी बहीण योजनेमुळे सरकार अडचणीत येत आहे का? असा सवाल केला. यावर उत्तर देताना एकनाथ शिंदे म्हणाले, असे काहीही नाही. एसटी महामंडळाने एकत्र बूकिंगवर ३० टक्के वाढ केली होती. त्याबद्दल मी सकाळीच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी बोललो आहे. त्यांनी जी काही वाढ केली आहे ती रद्द करण्यास सांगितले आहे. महाराष्ट्रात सध्या आमदारांचे अनेक व्हिडिओ समोर येत आहेत. कोणी मारामारी करत आहे, तर कोणाच्या घरात पैशांनी भरलेली बॅग दिसून येत आहे. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे विधिमंडळात मोबाइलवर रम्मी खेळतानाचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला. यावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठवली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळात फेरबदल होणार असल्याच्या चर्चा सुरू आहे.

# सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावातच करावे

### मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश

**मुंबई :** ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या दहा दिवशीय गणेशोत्सवापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. सहा फुटांपर्यंत उंची असलेल्या मूर्तींचे कृत्रिम तलावातच विसर्जन करण्यात यावे, असा आदेश न्यायालयाने जारी केला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अलोक अराध्ये आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपिठासमोर याप्रकरणावर सुनावणी झाली. मूर्ती विसर्जन करताना पर्यावरणावर कमीत कमी परिणाम व्हावा,यासाठी प्रयत्न करावे लागतील. मूर्तींच्या विसर्जनाबाबत जे धोरण निश्चित केले आहे त्याची तंतोतंत अंमलबजावणी होण्यासाठी राज्य सरकारने पावले उचलावीत, असेही न्यायालयाने सांगितले. सहा फूट अथवा त्यापेक्षा कमी उंचीच्या मूर्तींचे कृत्रिम तलावातच विसर्जन होईल, याची खात्री स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावी, असेही न्यायालयाने म्हटले आहे.



# मातृभाषेसोबत अन्य भाषांचा सन्मान करावा


### ▸▸ मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन

**नवी दिल्ली, २४ जुलै**

भाषा हे संवादाचे प्रभावी साधन असून, या माध्यमातून ज्ञानाचा खजिना उपलब्ध होतो. प्रत्येकाने आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगताना इतर भारतीय भाषांचा देखील सन्मान ठेवला पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील कन्व्हेन्शन सेंटरमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज सामरिक आणि संरक्षण विशेष अध्यासन केंद्र आणि कुसुमाग्रज मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती अध्यासन केंद्राचे उदघाटन देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. शांतिश्री धुलिपुडी पंडित, तंजावर घराण्याचे छत्रपती बाबाजीराजे भोसले, कुलसचिव प्रा. रविकेश उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस यांनी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सामरिक दूरदृष्टी आणि युद्धनीतीचा अभ्यास जेएनयूसारख्या प्रतिष्ठित संस्थेत सुरू झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.



# बेकायदेशीर लॉटरी जुगार, तत्सम जुगारामध्ये सहभागी होणे टाळावे

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि. २४ जुलै-**

बेकायदेशीर जुगार, बेकायदेशीर लॉटरी अथवा तत्सम प्रकारच्या जुगारामध्ये सहभागी होण्याचे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९८१ यामध्ये महत्वाची सुधारणा करून सदर कायद्याची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.



उक्त कायद्यामध्ये बेकायदेशीर जुगार, बेकायदेशीर लॉटरी आणि मानवी अपव्यापार करणाऱ्या व्यक्ती यांचा समावेश करण्यात आला आहे. सदर सुधारणेमुळे बौकयदेशीर जुगार किंवा बेकायदेशीर लॉटरी चालवित असेल किंवा ती चालविण्याची व्यवस्था करीत असेल किंवा बेकायदेशीर लॉटरीची तीकीटे विकत असेल किंवा अशा कामाशी संबधीत असेल किंवा लॉटरी बाबतच्या कायद्यान्वये शिक्षेस पात्र अपराध करीत असेल अशा व्यक्तींचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे, बेकायदेशीर जुगार, बेकायदेशीर लॉटरी बाबतचे गुन्हे करणाऱ्या व्यक्तींच्या विघातक कृत्यांमुळे सार्वजनिक सुरक्षीततसे बाधा निर्माण होत असेल किवा होण्याची शक्यता असेल अशा गुन्हेगांराविरुध्द नमूद एम.पी.डी.ए. अधिनियम ान्वये स्थानबद्धतेसारखी कठोर प्रतिबंधक कारवाई करण्याचे अधिकार पोलीसांना प्राप्त आहे.

# कोकणासह पुणे, सातारा घाट, भागात रेड अलर्ट

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २४ जुलै**

राज्यात पावसाचा जोर वाढला असून गुरुवारी मुंबई, ठाणेसह कोकणात सततधार सुरु आहे.पुढील २४ तासासाठी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांसह पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर घाट या भागात रेड अलर्ट देण्यात आला आहे. जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे आपत्कानील कार्य केंद्राने कळविले आहे.



भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्रामार्फत ठाणे, मुंबई शहर व उपनगर, रायगड, रत्नागिरी, पालघर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांच्या किनारपट्टीला दि. २४ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५.३० पासून ते दि. २६ जुलै २०२५ रोजीचे रात्रौ ८.३० पर्यंत ३.८ ते ४.७ मीटर उंच लाटांचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत लहान होड्यांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच समुद्राची धूप आणि उंच लाटांचे तडाखे समुद्र किनारी येण्याचा इशारा देण्यात आला असून सर्व जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

गडचिरोली जिल्ह्यातील गोमणी येथे कोलपल्ली नाल्याच्या अचानक वाढलेल्या पुराच्या पाण्यात ग्रामसेवक उमेश धोडरे अडकले असता, पोलीस विभाग आणि स्थानिक बचाव पथक तात्काळ घटनास्थळी पोहचून त्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. मुंबई शहर आणि उपनगर यांना पाणी पुरवठा करणाऱ्या मोडक सागर, मध्य वैतरणा आणि तानसा या धरणातून अनुक्रमे २०४३.७४, २११८.९५ आणि ३३१५.२५ क्युसेक इतका विसर्ग सुरू आहे. संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांनाही सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचेही राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

# अवैध गुटखा साठा; पान शॉपवर अन्नभेसळ पथकाची कारवाई

## दोघाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि.२४ जुलै-**

मंगळवेढा शहरातील रुद्र पान शॉप व बेकरी मध्ये अवैधरित्या विमल पान मसाला, सुगंधी तंबाखू याच्यासह अन्य बंदी असलेले पदार्थ ठेवल्या प्रकरणी मंगळवेढा पोलीसात सुनिल रामचंद्र शिंदे,पुरवठादार महेश हजारे या दोघा विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान या कारवाईत ८ हजार ८६० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी अन्न औषध प्रशासनचे उमेश भुसे हे दि.२२ रोजी दुपारी १.१० वाजता आरोपी सुनिल रामचंद्र शिंदे याने त्याच्या मालकीच्या मार्केट यार्डासमोरील मंगळवेढा-पंढरपूर मार्गावर पान टपरीत प्रतीबंदी अन्न पदार्थ विमल पान मसाला ८ पाकिटे,सुगंधीत तंबाखू २५ पाकिटे, राजू इलाची सुपारी ६ पाकटे,आरएमडी १ बॉक्स,एम सुगंधीत तंबाखू ५ बॉक्स, सुपर जीम पान मसाला ४ पाकिटे,एसपी ९९९ सुगंधीत तंबाखू १४ पाकिटे, मावा ११० पाकिटे असा एकूण ८ हजार ८६० रुपयाचा मुद्देमाल सदर फिर्यादीने छापा टाकून जप्त केला आहे. राज्यात गुटखा बंदी असतानाही सर्रास पान टपऱ्यावरुन शहर व ग्रामीण भागात मुक्तपणे त्याची विक्री सुरु असल्याचे चित्र आहे. पावसाळी अधिवेशनामध्ये खुलेआम सुरु असलेल्या गुटखा विक्री प्रकरणावरुन चांगलाच गदारोळ झाला होता. त्यामुळे अन्न औषध प्रशासन खडबडून जागे झाले असून आत्तापर्यंत दोन कारवाया त्यांनी मंगळवेढ्यात केल्या आहेत. दरम्यान गुरुवारी मंगळवेढा अजून एका ठिकाणी छापा टाकून गुटखा व अन्य पदार्थ जप्त केल्याची शहरभर चर्चा होती, मात्र रात्री उशीरापर्यंत याबाबत पोलीसात कोणताही गुन्हा दाखल झाला नसल्याचे पोलीस सुत्रांकडून सांगण्यात आले.




# खा. दुबेला जाब विचारणाऱ्या रणरागिनी खासदारांचे काँग्रेसतर्फे अभिनंदन


## महाराष्ट्रविरोधी वक्तव्याचा तीव्र निषेध

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २४ जुलै-**

भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी महाराष्ट्राचा अवमान करणाऱ्या विधानाने संपूर्ण राज्याच्या अस्मितेला ठेच पोहोचवली आहे. त्यांना संसद भवनाच्या लॉबीत थेट जाब विचारणाऱ्या काँग्रेसच्या रणरागिनी वर्षा गायकवाड, प्रतिभा धानोरकर व शोभा बच्छाव या तिन्ही खासदारांचे गुरुवारी मुंबई काँग्रेसतर्फे जाहीर अभिनंदन करण्यात आले.

या प्रसंगी मुंबई काँग्रेसचे नेते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेतृत्व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सचिन सावंत यांनी केले. मुंबई काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस, अनुसूचित जाती विभागाचे मुंबई अध्यक्ष कचरू यादव, महासचिव महेंद्र मुणगेकर, प्रवक्ते निजामुद्दीन राईन, राजेश इंगळे, मंदार पवार, आनंद यादव, के. पी. सिंग, राजेश टेके आदी उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना सचिन सावंत यांनी म्हटले की, ''महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा अपमान करणाऱ्यांना सभागृहात जाब विचारणाऱ्या रणरागिनी खासदारांनी संपूर्ण राज्याची लाज राखली आहे. आजच्या काळात संसदेत अशा धाडसी आवाजांची गरज आहे. आम्ही त्यांचा अभिमान बाळगतो.'' राजहंस म्हणाले, ''भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी महाराष्ट्राच्या संस्कृती, सभ्यता आणि समाजमनावर केलेला आघात असह्य आहे. या वक्तव्याची आम्ही निंदा करतो आणि संसदेसारख्या पवित्र ठिकाणी असे अपमानास्पद विधान करणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे.''

यावेळी दुबेंच्या विधानाचा निषेध करत ''महाराष्ट्राच्या अस्मितेस गालबोट लावणाऱ्या प्रत्येकाचा विरोध होणारच'' असा निर्धार व्यक्त केला. मुंबई काँग्रेसच्या वतीने या धाडसी महिला खासदारांना गौरवपत्र देऊन सन्मानित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



# पिसाळलेल्या कुत्र्याची दहशत

**मोडनिंब, दि.२४ जुलै-**

मोडनिंब (ता. माढा) येथील आदर्श नगर व दत्तनगर परिसरात रोजी एक पिसाळलेला कुत्रा आढळून आला असून, त्याने आतापर्यंत दोन महिला, एक पुरुष व एका लहान मुलावर हल्ला करत चावा घेतला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आदर्श नगर भागात बुधवारी त्याने थेट हल्ला चढवत चार नागरिकांना चावा घेतला. जखमींपैकी दोघांना सोलापूर येथील सिव्हील हॉस्पिटलमध्ये प्रतिबंधक लसीकरणासाठी पाठविण्यात आले आहे.ग्रामस्थांनी लहान मुलांना घरातच ठेवावे व अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडू नये, असे आवाहन स्थानिक प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच बाहेर पडतांना शक्य असल्यास हातात काठी ठेवण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.या कुत्र्याचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.





## श्रीराम पुजारींच्या जन्मशताब्दीनिमित्त व्याख्यान...

**सोलापूर : हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या वतीने गुरुवारी सायंकाळी किर्लोस्कर सभागृहात श्रीराम पुजारी जन्मशताब्दीनिमित्त 'ए.आय.चे वादळ' या विषयावर अच्युत गोडबोले यांचे व्याख्यान झाले.**

# सिटी बसच्या गतीसाठी पालकमंत्र्यांनी स्टेरिंग हाती घेण्याची गरज!

## सूक्ष्म नियोजन अन् लोकसहभागातून परिवहन उपक्रमाला ऊर्जितावस्था शक्य!

**सोलापूर शहरातील सार्वजनिक वाहतुकीसाठी सिटी बस खूप महत्त्वाची आहे. बस सेवेमुळे शहरांमध्ये लोकांना कमी वेळेत आणि कमी खर्चात प्रवास करणे शक्य होते. रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी कमी होण्यास मोठा हातभार लागतो. पर्यावरण संवर्धनासाठी सिटी बस सेवा खूप महत्त्वाची आहे. मात्र सोलापूर शहरातील महापालिका परिवहन उपक्रमाची बस सेवा गेल्या अनेक वर्षांपासून चढउतारांचा प्रवास करत सद्यस्थितीत कासव गतीने चालली आहे. किंबहुना डबघाईला आली आहे. नव्या १०० ई बसेस येणार असल्याची केवळ चर्चा ऐकायला मिळते. सद्यस्थितीत दररोज एक लाख रुपये तोट्यात असलेला महापालिकेचा परिवहन उपक्रम सूक्ष्म नियोजन आणि लोकसभागातून उर्जितावस्थेत आणता येऊ शकतो. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आता या परिवहन उपक्रमाचे स्टेरिंग आणि गिअर हाती घेतल्यास बस अधिक स्पीडली धावू शकणार आहे. विकासाचे व्हिजन असलेल्या पालकमंत्री जयाभाऊंनी लक्ष घातल्यास राज्य आणि केंद्र शासनाच्या सहकार्यातून या उपक्रमाला पुनर्वैभव प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे.**

शहरातील नागरिकांसाठी बस सेवा सुरू करावी यासाठी ७६ वर्षांपूर्वी शर्तीचे प्रयत्न झाले होते. अखेर दि. १० जानेवारी १९४९ पासून म्युनिसिपालिटीच्या मालकीची बस सेवा सुरू करण्यात आली. त्यावेळी सुरुवातीला १५ बसेस उपलब्ध होत्या. आज ७६ वर्षांनंतर महापालिका परिवहन सेवेचा आढावा घेतला असता मधल्या काळात दमदारपणे चालणारी परिवहन सेवा आज डबघाईला आली आहे. आमदनी अठन्नी आणि खर्चा रुपया अशी स्थिती या उपक्रमाची झाली आहे. सध्या सोलापूर शहरात १४ लाख लोकसंख्येसाठी केवळ १८ बसेस मार्गावर धावत असल्याचे दिसून येते. यापूर्वी सन २०१४ मध्ये केंद्र शासनाच्या जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत मिळालेल्या सुमारे १०० बसेस सदोष असल्याच्या कारणाने भंगार बंद अवस्थेत पडून आहेत. उर्वरित बसेस खरेदी न केल्याने अशोक लेलँड कंपनीने परिवहन उपक्रमावर नुकसानभरपाईचा दावा केला. सदोष बसेसमुळे अगोदरच परिवहन उपक्रमाचे नुकसान झाले तर दुसरीकडे बंद बसच्या स्पेअर पार्टची ही लय लूट होत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. लवादामध्ये महापालिकेच्या विरोधात निकाल लागला. आता जिल्हा व सत्र न्यायालयाने चेसी क्रॅक बस प्रकरणातील महापालिकेचे अपील फेटाळले आहे. लवादाने यापूर्वी अशोक लेलँड कंपनीच्या बाजूने निकाल दिला. या अंतर्गत महापालिकेला २४ कोटी रुपये दहा टक्के व्याजासह देण्याचा निर्णय दिला आहे. सोलापूर महापालिका प्रशासनाने आता उच्च न्यायालयात जाण्याची तयारी दर्शवली आहे. सोलापूर महापालिका परिवहन उपक्रमाची सद्यस्थिती पाहिल्यास शहरातील विविध मार्गावर एकूण २९ बसेस पैकी सरासरी १८ बसेस रोज धावतात. दैनंदिन सरासरी रोज एक लाख रुपये उत्पन्न प्राप्त होते. वेतन खर्च हा वाहतुक, कार्यशाळा मिळून एक लाख पंधरा हजार आहे. डिझेल खर्च पंचाहत्तर हजार असा एकूण खर्च एक लाख नव्वद हजार आहे. रोज सरासरी एक लाख रुपये तुट आहे. पेंशन देय समाविष्ट नाही. ''आमदनी अठन्नी और खर्चा रुपया'' अशी गत सोलापूर महापालिका परिवहन उपक्रमाची झाली आहे. गेल्या अनेक वर्षापासून या विभागाकडे प्रशासन आणि तत्कालीन सत्ताधाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष झाले. यामुळे आज हा उपक्रम बस सेवा ''पंक्चर'' झाली आहे. सद्यस्थितीत महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी या उपक्रमाच्या व्यवस्थापक तथा नियंत्रण अधिकारीपदी उपअभियंता तपन डंके यांची विशेष नियुक्ती केली आहे. त्यांच्या माध्यमातून आवश्यक ते प्रयत्न








प्राप्त परिस्थितीत केले जात आहेत. महापालिका अंतर्गत परिवहन उपक्रमाचा सन- २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा ५५ कोटी ९२ लाखाच्या प्रशासकीय अंदाजपत्रकास महापालिका उपसमितीच्या सर्वसाधारण सभेत मान्यता देण्यात आली. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये एकूण १५ ते २० बसेस धावलेले असून आजला बसेसची संख्या ही स्टॅंगबस १५ आणि मिडी बस १५ असे एकूण ३० बसेस इतकी दाखविण्यात आली आहे. परिवहनला २५.९३ कोटींची देणी आहेत. आता महापालिका परिवहन बस प्रवासी सेवेत अल्प भाडेवाढ करण्यात आली आहे.

दरम्यान, पंतप्रधान ई-बस सेवा योजनेअंतर्गत सोलापूर शहरातील रस्त्यांची रुंदी, वळणे, आणि टर्निंग रेडियस यांचा बारकाईने अभ्यास करून, लांबलचक ई-बसच्या ऐवजी सेंट्रल सॅन्क्शनिंग अँड स्टीयरिंग कमिटीने खास सोलापूरसाठी ७० मिडी बसेस आणि ३० नियमित आकाराच्या मोठ्या बसेस मंजूर केल्या आहेत. सोलापूर विकास मंचचा यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू आहे. नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडून सोलापूर महापालिका परिवहन उपक्रमास प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना करण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे सविस्तर प्रस्ताव प्रधानसचिव यांचेकडे दि. ६ सप्टेंबर २०२३ ने प्रस्ताव सादर केला. महाराष्ट्र शासनाच्या शिफारशीने हा प्रस्ताव पी एम ई बससेवा, मिनीस्ट्री ऑफ हौसिंग ॲन्ड अर्बन अफेअर्स ॲड पेट्रोलियम अँड नॅचुरल गॅस, गव्हेंमेंट ऑफ इंडिया यांचेकडे सादर करण्यात आला होता. केंद्र शासनाने सोलापूर महानगरपालिकेस दि. २ नोव्हेंबर २०२३ च्या सेंट्रल सॅक्शनिंग ॲड स्टेअरिंग कमिटी (सी.एस.एस.सी) यांच्या दि. १९ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या बैठकीमध्ये मिडी ७० बसेस व ३० स्टॅंडर्ड (नियमित) बसेस मंजूर केल्या आहेत. तशाप्रकारेच ऑफिस मेमोरेंडम दि. २ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रसिध्द केले. या १०० ई बसेस खरेदीसाठी शासन स्तरावर टेंडर काढण्यात येणार आहे. त्याचबरोबर शहरातील न्यू बुधवार पेठेतील जुन्या बस डेपोच्या जागेवर चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक असणारी लाईन महा वितरण कडून करून देण्यात येणार आहे. या सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतर या बसेस ापरिवहन उपक्रमास मिळणार आहेत.

चेसी क्रॅक बसेसचा मोठा फटका बसल्यानंतर आता पुन्हा नव्याने केंद्र शासनाच्या योजनेतून १०० ई बसेस मंजूर आहेत. मात्र संत गतीने सर्व प्रक्रिया सुरू असल्याने या बसेसची केवळ प्रतीक्षाच आहे. दरम्यान, या १०० नव्या बसेस प्राप्त होऊन शहरात धावण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आता आवश्यक ते ठोस प्रयत्न करण्याची गरज आहे. शहरातील आ. देवेंद्र कोठे , विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख आणि खा. प्रणिती शिंदे यांनी यासाठी साथ देण्याची गरज आहे. पालकमंत्री गोरे यांनी महापालिकेच्या परिवहन उपक्रमाचे ''स्टेरिंग आणि गिअर'' हाती घेतल्यास योग्य ती दिशा आणि गती मिळणार आहे. त्याचबरोबर मायक्रो नियोजन करून या उपक्रमाच्या हक्काच्या जागेवर उत्पन्न वाढविण्यासाठी विविध पर्याय शोधणे गरजेचे आहे. वाहतूक पोलीस, आरटीओ प्रशासनाच्या समन्वयातून आणि लोकसहभागातून हे सूक्ष्म नियोजन अधिकाऱ्यांकडून आवश्यक आहे. तरच सिटी बस सेवेचा ''जय हो '' होईल.

# जाती जन्माने नव्हे तर व्यवसायाने वीरशैव आणि लिंगायत एकच : जगद्गुरु पंचाचार्य

**तभा वृत्तसेवा**
**दावणगिरी (कर्नाटक), दि. २४ जुलै -**

पोटजातीच्या नावाखाली आपण विभक्त व्हायचे नाही. पोटजाती सांभाळून आपण सर्व एक राहायचे. वीरशैव आणि लिंगायत वेगळे आहेत असे म्हणायचे नाही. वीरशैव हा शास्त्रीय शब्द आहे. लिंगायत हा परंपरेतून आलेला शब्द आहे. पंचाचार्य आणि महात्मा बसवेश्वरादी शरणांचे विचार वेगळे नाहीत. वीरशैव आणि लिंगायत एकच आहे असे प्रबोधन जगद्गुरू पंचाचार्य यांनी केले.

भारतामध्ये वीरशैवांची संख्या कळावी. वीरशैवांच्या प्रत्येक घटकाला आरक्षण मिळत नाही. समाजामध्ये ही मोठी समस्या आहे. धर्म आणि जात काय लिहावे हा संभ्रम समाजामध्ये आहे. या प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी दोन दिवसांचे शृंग संमेलन कर्नाटकातील दावणगिरी येथील जगद्गुरू रेणूक मंदिराच्या कल्याण मंडपात आयोजित करण्यात आले होते. या संमेलनासाठी पाचही जगद्गुरू, सर्व प्रांतीय सर्व शिवाचार्य उपस्थित होते.

या संमेलनाचे उद्घाटन २१ जुलै रोजी अ. भा. वीरशैव महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शामनुरू शिवशंकरप्पा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा हे उपस्थित होते.

या संमेलनात जनगणनेमध्ये जात या रकान्यात प्रचलित जात म्हणजे ज्या पोटजातीला आरक्षण मिळते ती लिहायची. धर्म हिंदू लिहायचा. त्याबरोबरच वीरशैव या पंथाचा उल्लेख जनगणनेत होण्यासाठी वीरशैव धर्मीय खासदार, मठाधिपती, विविध पोटजातींच्या भक्तगणांनी एकत्र येऊन पंतप्रधान, राष्ट्रपती आणि संबंधित खात्याचे मंत्री, अधिकारी यांना भेटून धर्माच्या रकान्यानंतर पंथ रकाना असावा असा आग्रह करावा. पंथ या रकान्यामध्ये वीरशैव लिंगायत असे लिहावे असे ठरले.

वीरशैवातील पोटजाती जन्माच्या आधारे नसून व्यवसायांच्या आधारे मिळालेले आडनाव आहेत. म्हणून जातीच्या आधारे कुणीही विभक्त होऊ नये. आपल्या पोटजाती सांभाळून आपण सर्व वीरशैव लिंगायत एकच आहोत अशी भावना निर्माण करण्यासाठी पीठाचार्य, शिवाचार्य आणि राजकारण्यांनी प्रबोधन केले. यावेळी एकूण १२ ठराव घेण्यात आले.



### संमेलनात करण्यात आलेले ठराव

- येणाऱ्या जातीनिहाय जनगणनेमध्ये सर्व पोटजातींचा उल्लेख पंथ या रकान्यामध्ये वीरशैव लिंगायत असा करा.
- सनातन हिंदू वीरशैव लिंगायत धर्माच्या सर्व अनुयायींच्या व्यवसायावर आधारित पोटजातींच्या आधारावर धर्मामध्ये कोणत्याही प्रकारे विभाजन करू नये.
- जनगणना फॉर्ममध्ये धर्माबरोबरच पंथ किंवा मत असा रकाना असावा. अखिल भारतीय वीरशैव महासभेच्या माध्यमातून केंद्र सरकारला याविषयी आग्रह करावा.
- या मुद्द्यावर पंतप्रधानांचे लक्ष वेधण्यासाठी समाजाचे प्रमुख नेते, मठाधिपती, सर्व धर्मीय वीरशैव लिंगायत खासदारांचे एक प्रतिनिधी मंडळ दिल्लीला पाठवावे.
- वीरशैव धर्मातील सर्व पोटजातींना ओबीसी या संवर्गामध्ये समाविष्ट करण्यासाठी पोटजातीच्या सर्व नेत्यांनी एकत्र येऊन केंद्र सरकारचे लक्ष वेधावे.
- वीरशैव लिंगायत समाजाच्या ज्या पोटजातींना आरक्षण मिळत आहे ते आरक्षण कायम राहावे.
- वीरशैव लिंगायत परंपरेतील महिला, दिव्यांग, वंचितांच्या हिताच्या रक्षणासाठी तसेच त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्न करावेत
- वीरशैव पीठाचार्य आणि शिवाचार्य यांचे एकमेकांशी सहकार्याचे धोरण असले पाहिजे. संबंधित पीठ आणि शाखा मठ यांच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच त्यांच्या हिताच्या रक्षणासाठी मार्गदर्शन केले पाहिजे.
- वर्षातून एकदा पीठाचार्य आणि शिवाचार्यांचे महासंमेलन आयोजित करावे.
- उत्तर भारतातील दिल्ली, हरियाणा, पंजाब, राजस्थान, जम्मू आणि काश्मीर राज्यात वीरशैव समाजासाठी धार्मिक, सांस्कृतिक योजना तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# जनतेचे प्रश्न सोडविणे हाच आमचा अजेंडा

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे : पत्रकारांशी साधला संवाद



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ जुलै -**

आमचा अजेंडा हा खुर्ची नाही तर ज्यांनी आम्हाला खुर्चीत बसविले आहे त्यांचे प्रश्न सोडविणे, त्यांचे प्रश्न शोधणे आणि त्याचे निराकरण करणे हाच आमचा अजेंडा असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले.

येथील भक्तश्रेष्ठ नामदेव महाराज पुरस्कार उपमुख्यमंत्री शिंदे यांना जाहीर झालेला होता. तो पुरस्कार स्विकारण्यासाठी गुरुवारी पंढरपूर दौऱ्यावर ते आले होते. त्यावेळी पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री म्हणाले, आमचे महायुतीचे जे सरकार आहे ते सर्वसामान्य लोकांच्या जीवनामध्ये आमुलाग्र बदल घडविण्यासाठी काम करीत आहे. वारकरी महामंडळाविषयी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना शिंदे म्हणाले, याबाबत देखील आपण मगाशीच बोललो आहे. वारकरी महामंडळाच्या बाबतीत जे जे काही करावे लागणार आहे ते देखील आपण लवकरच पुर्ण करणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. दरम्यान आपली जागा उदय सामंत घेत असल्याचे शिवसेना उबाठा गटाचे नेते विनायक राऊत म्हणतात या प्रश्नाचे उत्तर देताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, अरे आज आनंदाचा दिवस आहे. रोज राजकारण हे आहेच की. त्यामुळे आज तरी राजकीय कोणतेही भाष्य नको. दरम्यान असे म्हणत या विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी पध्दतशीर बगल देत त्यांनी आवर्जुन सांगितले की राज्यात आम्ही, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे तिघेजण टिम म्हणून एकत्रित काम करतो आहे. पदे वरती खालती होतात पण आमचा आजेंडा मात्र सर्वसामान्य माणसांचा विकास हाच आहे.

### राजकीय आधिष्ठानापेक्षा धार्मिक अधिष्ठान उच्च

सध्या नामदेव महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्या निमित्त विविध कार्यक्रम सुरु आहेत. या सोहळ्या मध्ये आपणाला नामदेव महाराज पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले. त्यामुळे आयुष्यभर वारकरी, संतांची सेवा करण्याची संधी तसेच भाग्य मला मिळालेले आहे. त्यामुळे आपण नेहमी सांगत असतो की राजकीय आधिष्ठाना पेक्षा धार्मिक आणि अध्यात्मिक आधिष्ठान हे केव्हाही वर असते. त्यामुळे हा महाराष्ट्र संतांच्या आशीर्वादाने पुढे जातो आहे, त्याचा विकास होतो आहे अशी देखील भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली.

### नामदेव महाराजांच्या पुरस्काराने उर्जा मिळाली

भक्तशिरोमणी नामदेव महाराज पुरस्कार आपल्या सारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला दिला त्या बद्दल आपण नामदेव महाराज संस्थान, नामदेव महाराजांचे वंशंज, संत परंपरा या सगळ्यांचे मनापासून आभारी आहे. वारकऱ्यांची मनोभावे सेवा करण्याची संधी किंबहुना प्रेरणा किंवा उर्जा या पुरस्कारामुळे आपणाला प्राप्त झालेली आहे. यापूर्वी संत तुकाराम महाराज पुरस्कार आपणाला मिळालेला होता. आज संत नामदेव महाराज पुरस्कार माझ्या सारख्या कार्यकर्त्याला देण्याचे ओद्यार्य संत नामदेव महाराज संस्थान, त्यांचे वंशज आणि समस्त नामदेव महाराज भक्तमंडळींकडून दाखविले गेलेले आहे त्यांचा मी मनापासून आभारी आहे असेही यावेळी शिंदे यांनी सांगितले.

### खरे व्हीआयपी हे वारकरीच

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, आमच्या दृष्टीने खरे व्हीआयपी हे वारकरी आहेत आम्ही नाही आहोत. त्यामुळे आषाढी यात्रेच्या काळात या वारकऱ्यांना त्रास होवू नये म्हणून बिलकुल रांग न थांबविता आम्ही आषाढी यात्रेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आलेलो होतो त्यावेळी मुखदर्शन घेऊन परत गेलेलो होतो. पण येथील मंदिरात आल्या नंतर आज खूप वेळ पांडुरंगा समोर बसण्याचा योग,संधी मिळाली हे आपले भाग्य असल्याचे त्यांनी सांगितले.

# सर्पमित्रांना १० लाखांचा अपघात विमा अन् सरकारी ओळखपत्र

**मुंबई, दि. २४ जुलै -**

ग्रामीण भागात वन्यजीव आणि मानवी संघर्ष कमी करण्यासाठी सर्पांपासून होणारे धोके टाळण्यासाठी कामगिरी बजावणाऱ्या सर्पमित्रांना लवकरच अधिकृत ओळखपत्र आणि १० लाख रुपयांचा अपघात विमा मिळणार आहे. त्यांना 'अत्यावश्यक सेवा' आणि 'आघाडीचे स्वयंसेवक' म्हणून दर्जा मिळण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे शिफारस करण्यात येईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी दिली.



वन्य प्राण्यांकडून होणाऱ्या त्रासातून ग्रामस्थांना दिलासा देण्यासाठी सर्पमित्र नेहमीच धावून येतात. अनेकदा आपला जीव धोक्यात घालून ते सर्पांना पकडून सुरक्षितस्थळी सोडून देतात. त्यांच्या या कार्याची दखल घेत योजना आखण्यात येत आहे.

या निर्णयामुळे सर्पमित्रांच्या कार्याला अधिकृत मान्यता मिळेल आणि त्यांच्या जीविताच्या सुरक्षिततेची काळजी घेतली जाईल. स्वतःचा जीव धोक्यात घालून इतरांचे रक्षण करण्याच्या सर्पमित्रांच्या कामाचे महत्त्व लक्षात घेता त्यांना 'अत्यावश्यक सेवा' म्हणून घोषित करण्याची आणि आपत्ती व्यवस्थापनाचा एक महत्त्वाचा भाग बनवण्याची गरज या बैठकीत व्यक्त करण्यात आली.

या बैठकीला वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, राज्य वन्यजीव संरक्षक एम. श्रीनिवास राव, अखिल भारतीय सर्पमित्र आणि प्राणिमित्र संघटनेचे अध्यक्ष प्रा. संभाजीराव पाटील आदी उपस्थित होते.



# पंढरीत शिक्षक संवाद दिन; मुख्याध्यापक, लिपिकांची कार्यशाळा

## शिक्षणाधिकारी जगतापांनी साधला शिक्षकांशी संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ जुलै -**

शिक्षण विभागाकडून येथील दाते मंगल कार्यालयात शिक्षक संवाद उपक्रमाचे आयोजन केले होते. त्यामध्ये मुख्याध्यापक, लिपिक व शिक्षकांसाठी कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यक्रमास शिक्षणाधिकारी सचिन जगताप, पंढरपूरचे गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, विवेकवर्धिनी विद्यालयाचे प्रा. डॉ. यु. आर. मुंढे, सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक स्मिता नडीमेटला, वरिष्ठ सहाय्यक अनिल पाटील, श्रीकांत धोत्रे, गुरुदाप्पा रेवे, अतिरिक्त मुख्य लिपिक राजगुरू उपस्थित होते. या बैठकीस जिल्ह्यातील मुख्याध्यापक, लिपिक आणि शिक्षक उपस्थित होते. कार्यशाळेत ५६ शिक्षकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याचे निवारण करण्यात आले. यावेळी माध्यमांशी बोलताना शिक्षणाधिकारी जगताप यांनी सांगितले की, सोलापूर जिल्ह्यात १ हजार ८५ माध्यमिक शाळा असून साडेतीन लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची संख्या आहे. यासाठी ७ हजार ५०० शिक्षक काम करत आहेत. शिक्षक, पालक आणि शाळांची कामे प्रलंबित राहू नयेत. यासाठी तालुकास्तरावर शिक्षक संवाद उपक्रमाद्वारे जागेवरच तक्रारींचा निपटारा केला जाणार आहे. याचबरोबर एक कोटी वृक्ष लागवडीत सहभाग नोंदवून वृक्षारोपण कार्यक्रम तसेच घरघर संविधान, डिजिटल शाळा या विविध उपक्रमाची माहिती मुख्याध्यापक शिक्षक आणि लिपिकांना देण्यात आली. पुढील काळात शाळेतील शिक्षकांच्या तक्रारीचे तात्काळ निराकरण करण्यासाठी शिक्षक संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून विद्यार्थ्यांना मोबाईल मधून बाहेर काढणे गरजेचे असून मुलांना सुजाण नागरिक बनवण्यासाठी शाळांनी उपक्रमशील कार्यक्रमाचे आयोजन करावे. अशा सूचना देण्यात आल्याचे शिक्षणाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

# कासेगावात भारूडातून केले समाजप्रबोधन

## संत सावता महाराज उत्सवानिमित्त निघाली दिंडी मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**कासेगाव, दि. २४ जुलै-**

चिंचेच्या पानावर देऊळ बांधले आधी कळस मग पाया रे... पाटील हायतं वो झोपेत...अशा अनेक भारूडांच्या सादरीकरणातून भारूडकार दिनकर आवताडे (विरवडे) व दशरथ वऱ्हाडे (शिरापूर) यांनी कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे आज दि.२४ जुलै रोजी समाज प्रबोधन केले.

येथे प्रतिवर्षाप्रमाणे संत सावता महाराज समाधी सोहळ्यानिमित्त आषाढ आमावस्येला गुरूवारी दि.२४ जुलै रोजी दिंडी मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले होते. या मिरवणूकीत गावातील चावडीच्या चौकात भारूडाचा कार्यक्रम रंगला. यामध्ये मोहोळ तालुक्यातील विरवडे येथील दिनकर आवताडे व शिरापूर येथील दशरथ वऱ्हाडे यांनी खुमासदार पध्दतीने भारूडांचे सादरीकरण केले. दत्तात्रय वाडकर यांनी मृदंगावादनाची तर हरिदास वाडकर यांनी हार्मोनियची साथसंगत केली. यावेळी श्रीसंत एकनाथ महाराजांनी रूपकात्मक रचलेल्या भारूडांचा अर्थ उलगडून सांगत व्यसनमुक्ती, वृक्षलागवड, जातीभेद निर्मूलन यावर आधारीत विवेचन भारूडकारांनी केले. त्यांनी विनोदी



ढंगातून सादर केलेल्या भारूडांना ग्रामस्थांनी उदंड प्रतिसाद दिला. तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष रामहरी चौगुले, सुधाकर शिंदे, निशिकांत पाटील, अल्लाऊद्दीन शेख, अर्जून हुडकर, हणमंत काळे, प्रकाश सुतार, अर्जून काळे, ग्रामपंचायत सदस्य भारत जाधव, शिवाजी खारे, अंकुश म्हेत्रे, चैतन्य वाडकर, सूरज चौगुले आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान सकाळी संत सावता महाराजांच्या प्रतिमेची माळी गल्लीतून मिरवणूक काढण्यात आली. सकाळी दहा वाजता विठ्ठल मंदीरासमोर हभप श्याम महाराज जोशी यांचे काल्याचे किर्तन झाले. काला वाटू एकमेका । वैष्णव निका संभ्रम ।। या अभंगाचे गायन करीत काल्याचा प्रसाद वाटप करण्यात आला. कीर्तनानंतरची पंगत राम मोरे यांच्यावतीने देण्यात आली. त्यानंतर दिंडी मिरवणूकीला सुरूवात झाली. चावडीच्या चौकातील भारूडानंतर हि दिंडी मिरवणूक ज्ञानोबा तुकारामच्या गजरात पुढे गावातील प्रमुख मार्गावरून मार्गस्थ झाली. जागोजागी कुटूंबियांकडून विणेकऱ्याचे पाद्यपूजन व संत सावता महाराजांचे पूजन करत मिरवणूकीचे स्वागत करण्यात आले. अनेक घरासमोर रांगोळी काढून दिंडीचे स्वागत होत होते. मिरवणूक गुरव गल्लीत आल्यानंतर गौळणींचे गायन करण्यात आले. मठाच्या चौकात वारकऱ्यांनी फुगडीसह उडीचे खेळ सादर केले. सायंकाळी विठ्ठल मंदीरात दिंडी मिरवणूकीची सांगता झाली. यावेळी महाप्रसादाची पंगत देण्यात आली.

# ऑर्किडच्या ४७६ विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंटमध्ये घवघवीत यश



डॉ. रविंद्र आर. पाटील



डॉ. बी. के. सोनगे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जुलै -**

प्रज्ञा निकेतन एज्युकेशन ट्रस्ट, पुणे संचलित नागेश करजगी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाने यंदाही कॅम्पस प्लेसमेंटमध्ये आपले वर्चस्व सिद्ध करत ४७६ विद्यार्थ्यांना नामांकित राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड मिळवून दिली.

या यशामागील रहस्य म्हणजे महाविद्यालयाने द्वितीय वर्षापासूनच सॉफ्ट स्किल्स आणि ॲप्टिट्यूड ट्रेनिंगचा अंतर्भाव वेळापत्रकात केला आहे. यासोबतच प्री-प्लेसमेंट वर्कशॉप्स, कोडिंग ट्रेनिंग व कंपनी-स्पेसिफिक मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांची कॉर्पोरेट जगतातील स्पर्धेसाठी तयारी झाली आहे.

**ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालय- गुणवत्तेचा मानबिंदू**

अभियांत्रिकी शिक्षणाचा उपयोग समाजोपयोगी व सर्वांगीण विकास घडवणाऱ्या अभियंत्यांच्या घडामोडीसाठी व्हावा, हा ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाचा मुख्य हेतू आहे. केवळ पुस्तकी ज्ञान न देता, विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक कौशल्यांसोबतच नेतृत्व, संवाद, आणि नवोपक्रमक्षमतेचा विकास व्हावा यासाठी महाविद्यालय सातत्याने नवीन, क्रियाशील उपक्रम राबवत असते.

याच गुणवत्तापूर्ण व दूरदृष्टीपूर्ण कार्यपद्धतीची पावती म्हणून ऑर्किड महाविद्यालयाला नॅक (ग्ऋऋक) कडून 'ऋअ' मानांकन प्राप्त झाले आहे, जे महाराष्ट्रातील अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये एक अत्युच्च गुणवत्ता स्तर दर्शवते. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून महाविद्यालयास प्राप्त झालेला 'स्वायत्त दर्जा' हे ऑर्किडच्या शैक्षणिक प्रगतीतील आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या स्वायत्ततेमुळे महाविद्यालयाला अभ्यासक्रम, परीक्षा व मूल्यांकन प्रक्रिया अधिक लवचिक आणि उद्योगजगतातील गरजांशी सुसंगत बनवता येणार आहे.

ही दोन्ही सन्मानचिन्हे म्हणजे ऑर्किड महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्तबद्ध नियोजन आणि संस्थात्मक प्रगतीचा गौरवच होय. ऑर्किड महाविद्यालयाची शिक्षण प्रणाली केवळ शैक्षणिक नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावरही विशेष भर देणारी आहे. 'समाज उपयोगी, अष्टपैलू अभियंते घडवणे' हा संस्थेचा मुख्य उद्देश असून, यासाठी विविध नवनवीन क्रियाशील उपक्रम राबवले जातात. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात १०७ वेगवेगळ्या कंपन्यामध्ये विद्यार्थ्यांना प्लॅसमेंटच्या संधी मिळाल्या. त्यात प्रामुख्याने हेक्सावेअर, जेन्सार, टेकसोफिया, सिंक्लाय, सेरेंटिका, बॉश, एच.जी.बी., एल ॲण्ड टी, जेअडब्ल्यू, यश टेक्नॉलॉजी, सीआयआयई, सॉफ्टेन्जर इत्यादी नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

'ऑर्किड महाविद्यालयाने आमच्या पाल्यांना उच्च पगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आणि आमची स्वप्नं पूर्ण केली,' अशी प्रतिक्रिया अनेक पालकांनी यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त, प्राचार्य डॉ. बी.के सोनगे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास मेतन, डॉ. व्ही. के. पत्की व ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिष्ठाता डॉ. रविंद्र पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### सोलापुरातील होतकरू विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट यश

सोलापुरातील होतकरू विद्यार्थ्यांना गुणवत्ता व उत्कृष्टतेकडे घेऊन जाणारा मार्ग म्हणजे योग्य कौशल्य विकास. यामध्ये मॉक इंटरव्ह्यू, ग्रुप डिस्कशन, ॲप्टिट्यूड टेस्ट यांसारख्या मूलभूत व आवश्यक बाबींवर विशेष भर दिला जातो. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील स्पर्धात्मक निवड प्रक्रियेत त्यांचा ठसा उमटतो. विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवणे हेच आमचे मुख्य कार्य आहे. ऑर्किडच्या प्लेसमेंट विभागामार्फत आम्ही नेहमीच नवीन संधी शोधतो, कंपन्यांशी संवाद साधतो आणि विद्यार्थ्यांसाठी यशाची दारे खुली करतो. याच प्रयत्नांचे फलित म्हणजेच या वर्षी ४०० हून अधिक विद्यार्थ्यांना नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांची निवड उत्तम पॅकेजसह होत आहे. हे यश केवळ विद्यार्थ्यांचे नाही तर ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाच्या सांघिक प्रयत्नांचे फलित आहे.

**- डॉ. रविंद्र आर. पाटील, अधिष्ठाता, प्रशिक्षण व प्लेसमेंट विभाग**

### प्लेसमेंटमधील यशस्वी परंपरा; ऑर्किडचा पुढचा टप्पा

ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाने यावर्षीही आपली प्लेसमेंटमधील यशस्वी परंपरा कायम राखत ४०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळवून दिली आहे. हे यश अचानक मिळालेलं नसून, दीर्घकालीन नियोजन, योग्य प्रशिक्षण, आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यामुळे शक्य झालं आहे. महाविद्यालयात द्वितीय वर्षापासूनच सॉफ्ट स्किल्स आणि ॲप्टिट्यूड ट्रेनिंगचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय प्री–प्लेसमेंट वर्कशॉप्स, इंडस्ट्री–ओरिएंटेड ट्रेनिंग, आणि कंपनी स्पेसिफिक सेशन्स यांचा प्रभावी लाभ विद्यार्थ्यांना झाला आहे. या सर्व उपक्रमांचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांना केवळ नोकरी मिळवून देणे नव्हे, तर त्यांना उद्योगजगतात आत्मविश्वासाने टिकून राहण्यासाठी सक्षम बनवणे हा आहे. आमच्या विद्यार्थ्यांनी दाखवलेली कामगिरी ही ऑर्किडच्या शैक्षणिक मूल्यांची आणि प्रशिक्षणाच्या दर्जाची साक्ष आहे.

**- डॉ. बी. के. सोनगे, प्राचार्य, ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालय**

DTE Code : 06223
AN AUTONOMOUS INSTITUTE
A+ ACCREDITED BY NAAC (With CGPA 3.32)
Nagesh Karajagi
Pradnya Niketan Education Society, Pune.
ORCHID COLLEGE OF ENGINEERING AND TECHNOLOGY, SOLAPUR
• Approved by AICTE, Govt. of Maharashtra • Affiliated To DBATU University, Lonere
OUR NUMBERS SPEAK... The Place for REAL PLACEMENTS
Locally Rooted Globally Competent Education
476+ PLACEMENTS-2025
Rigorous Preparations for Placements
Top Recruiters Last Five Years
TIAA 68 | TATA Consultancy Services 258 | wipro 158
ZenSar Technologies 38 | Persistent 56 | Infosys 68
Capgemini 58 | accenture 44 | Hexaware Technologies 49
150 Students Qualified MPSC/ UPSC/ Govt. Sector till now
62 Research Patents
78 Students selected for MS at UK, USA, Germany etc.
04 Foreign University Tie-up
Special Coaching for GATE, GRE, TOEFL & IELTS

UG Courses

| Course Name | Intake |
|---|---|
| Artificial Intelligence & Data Science | 60 |
| Civil Engg. | 60 |
| Computer Science & Engg. | 180 |
| Electronics & Telecommunication Engg. | 60 |
| Electrical Engg. | 60 |
| Mechanical Engg. | 120 |

PG Courses

| Course Name | Intake |
|---|---|
| Computer Aided Structural Analysis & Design-Civil Engg. | 12 |
| Thermal Engg-Mech. Engg. | 06 |
| Electric Vehicle Technology | 06 |

Campus Tour
Visit us
Soham Ads



Prof. Santosh Jadhav 9552529255 (FY B.Tech)
Dr. V.S. Shirwal 9552529258
City centers are available for Option Form Filling at Solapur, Akkalkot, Dharashiv, Tuljapur
Gut No. 16, Solapur-Tuljapur Road, Tale Hipparaga, Solapur-2. Ph.:02172990051, Web : www.orchidengg.ac.in, E-mail : office@orchidengg.ac.in

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# संपादकीय

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# हिरवळ दाटो चोहीकडे...!

भारतीय कालगणनेतील पाचवा महिना श्रावण बहुधा जुलै-ऑगस्टमध्ये पावसाळी वातावरणात येतो. 'श्रवण' या नक्षत्रावरून आलेले हे नाव, निसर्गाच्या व पृथ्वीच्या पुनरुत्थानाचा कालखंड दर्शवते. या काळात, धरती नव्या हिरवाईने सजते आणि वातावरणात प्रसन्नता नांदते. श्रावण म्हणजे केवळ देवपूजा, उपवास आणि व्रतांचे अवकाश नव्हे, तर तो एक ऋतूंचा उत्सव आहे.□निसर्गाचा नवा जन्म, मातीचा सुगंध, शेतीचे चैतन्य, स्त्रियांचे साजशृंगार आणि कवींना प्रेरणा देणारा निसर्ग कवी गुरू ठाकूर यांच्या शब्दांत असा असतो,

**'मातीच्या गंधात झिंगून सांगतो, उनाड अल्लड वारा**
**सोनिया उन्हात न्हाऊन माखून, आल्या गं श्रावणधारा..'**

आषाढानंतर ढगांचा खजिना आभाळात भरून आलेला असतो आणि त्याचा मुक्तहस्ते वर्षाव होतो. झाडाझुडपांचा टवटवीतपणा, हरित रंगांचा मोह, ओसंडून वाहणारी नदीनाले आणि मधूनच उमटणारी चिमणपाखरांची किलबिल हे सारे असते. 'हसरा नाचरा, जरासा लाजरा, सुंदर साजिरा श्रावण आला..' असे कविश्रेष्ठ कुसुमाग्रज आणि 'आला आषाढ श्रावण, आल्या पावसाच्या सरी, किती चातकचोचीने प्यावा वर्षाऋतू तरी..' असे मर्ढेकर सांगतात ते काही उगीच नाही. श्रावण हा महिना शिवभक्तीचा, संयमाचा आणि साधनेचा कालखंड मानला जातो. श्रावण सोमवारचे व्रत, महादेवाला जलअर्पण, बिल्वपत्र, धतूरा फुलांचे अर्पण हे या भक्तिभावाचे प्रतीक आहेत. या महिन्यात अनेक परंपरागत सणदेखील येतात. त्यात नागपंचमी हा सर्पपूजन आणि भूमीच्या संरक्षणाचा संदेश देणारा सण आहे. रक्षाबंधन हा भावाबहिणीच्या बंधाचे प्रतीकात्मक रूप आहे. हरितालिका हा स्त्रियांची एकतानता आणि व्रताचा सण आहे. श्रीकृष्ण जन्माष्टमी हा भगवान श्रीकृष्णाची भक्ती आणि लीलांचे स्मरण करणारा सण आहे. श्रावणातील हे सण केवळ देवपूजेपुरते मर्यादित नाहीत, तर ते सामाजिक, सांस्कृतिक संवादाचे माध्यम आहेत. विशेषतः स्त्रियांसाठी या महिन्याला एक स्वतंत्र सौंदर्य प्राप्त झालं आहे. श्रावण महिना म्हणजे स्त्रीसौंदर्याचा, श्रद्धेचा आणि संस्कृतीचा उत्सव. हिरव्या बांगड्या, चांदीचे तोडे, केसांमध्ये जाई-जुई, पाटावर बसून केलेली व्रतं हे फक्त सौंदर्यदर्शन नाही, तर एक शिस्तबद्ध, सांस्कृतिक बांधिलकीचं रूप आहे. झिम्मा-फुगडी, हरितालिकेची गाणी आणि ओव्या म्हणजे समूहातील स्त्री संवाद. त्यांच्या गाण्यात निसर्गाची उपमा, पतीची आठवण आणि देवीशी संवाद यांचा एक सुंदर समन्वय असतो. म्हणून तर शांता शेळके म्हणतात, 'श्रावण आला गं, वनी श्रावण आला, दरवळे गंध मधुर ओला..'. तर वेगळ्या शब्दांत ग. दि. माडगूळकर म्हणतात,

**'फांद्यांवरी बांधिले गं, मुलींनी हिंदोळे**
**पंचमीचा सण आला, डोळे माझे ओले..'**

पावसाळ्याचा मध्य असलेला हा श्रावण महिना म्हणजे शेतीच्या जोमाचा काळ. बियाणं पेरून झाल्यानंतर, या काळात शेतात उगवलेली रोपं टवटवीत असतात. शेतकऱ्याची सारी आशा या हिरव्या रांगांमध्ये गुंफलेली असते. जमिनीचा सुगंध, पाण्याची पातळी, आकाशाकडे बघून होणारे अंदाज हे सर्व भारतीय कृषी संस्कृतीचा आत्मा आहेत. आज शेतकरी बदलत्या हवामानामुळे आणि पावसाच्या अनिश्चिततेमुळे संकटात असला, तरी श्रावण हे त्याचं भावमनाचं पीक आहे. पावसावर आधारित हे शेतीचक्र जर सुसंगत चाललं, तरच अन्नदात्याच्या घरात आनंद नांदतो.

श्रावण महिना आपल्याला पर्यावरणासोबत नातं जपण्याची आठवण करून देतो. पारंपरिक भारतीय जीवनशैलीने पर्जन्य साठवणूक, गवताच्या पूजा, झाडे लावण्याची चळवळ यांसारख्या उपक्रमांतून पर्यावरण साक्षरता दाखवली जाते. ग्रामीण भागात जलस्रोतांची निर्मिती आणि शुद्धीकरण यासाठी श्रावणातील धार्मिक कार्यक्रम साधन म्हणून वापरले गेले आहेत. या ऋतूतील पाऊस हे केवळ हवामानशास्त्राचं प्रकरण नाही. तो आपल्या मनाच्या सांस्कृतिक कोनात भरतो. साहित्यिक दृष्टिकोनातूनही पावसाळ्याच्या या टप्प्याला एक आगळंवेगळं आकर्षण आहे. पाऊस म्हणजे विरह, ओलावा, आठवणी, शांतता आणि अनेकदा प्रेमाचं अधुरं व्यक्त होणं या सगळ्या भावनांचा वाहक असतो. श्रावण महिना हा साहित्यिक सृजनाचा एक प्रेरणादायी विषय आहे. मराठी काव्यात श्रावणाला भावनांच्या अनेक छटांमध्ये उभं केलं आहे. 'श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे' किंवा 'श्रावणात घननिळा बरसला' अशा एका ओळीत संपूर्ण ऋतूचं चित्र उभं राहतं. ते शब्द निसर्गातील सौंदर्य आणि कोमल भावनांची सांगड घालतात. आजच्या शहरीकरणाने श्रावणाचे भावनिक आणि निसर्गीय स्वरूप बऱ्याच अंशी हरवलं आहे. काँक्रिटच्या जंगलात फुलांची जागा फुलदाण्यांनी घेतली, झाडांची जागा वॉलपेपरकडे आली आणि पावसाच्या नादाची जागा मोबाईल अलार्मने घेतली. ग्लोबल वॉर्मिंग, अनियमित पर्जन्य, नद्या कोरड्या पडणं किंवा पूर येणं या हवामान बदलाच्या समस्यांनी श्रावणातील नैसर्गिक सजीवता धोक्यात आली आहे. पावसामुळे विहिरी, नाले, ओढ्यांचे जतन, जलसंरक्षणाच्या उपक्रमांचा गाभा ठरतो. आधुनिक जीवनात प्लॅस्टिकचा वापर, सजीव-अजीव साखळीत हस्तक्षेप आणि शहरीकरणामुळे ही नैसर्गिक जीवनशैली सावरण्याचे आव्हान उभे करते. श्रावणाचं सौंदर्य पुन्हा अनुभवायचं असेल, तर आपल्याला निसर्गाशी पुनः एकदा नातं जोडावं लागेल. प्रत्येकाने स्वतःच्या घरात एक झाड लावणं, मुलांना श्रावणासंबंधी लोककथा सांगणं, पारंपरिक गाणी जपणं, हे लहान वाटणारे पण सांस्कृतिक वारसा टिकवणारी पावले ठरू शकतात.

विविधतेने नटलेला हा महिना, पर्यावरणाच्या संवर्धनासाठी नवी प्रेरणा, सामाजिक ऐक्य आणि साहित्यिक जाणीव जागवणारा ठरावा, हीच आजच्या काळातील मराठी माणसाची खरी आवश्यकता आहे. सुविधा, साधने, तंत्रज्ञानाचा सुलभ वापर यांच्या बदल्यात जैवविविधतेची हानी, पारंपरिक ज्ञानाची गळती आणि पर्यावरणीय असमतोल. म्हणूनच 'हरित श्रावण'सारख्या चळवळी, वृक्षारोपण, पुनर्नवा जलस्रोत हे उपाय नव्या पिढीला आवश्यक ठरतात. श्रावणातील निसर्ग आपल्याला पर्यावरणपूरक जीवनशैलीचे महत्त्व शिकवतो. 'तरुण भारत' सारख्या दैनिकानेही आपल्या शताब्दी वर्षानिमित्त विविध प्रकारच्या बिया जमा करून त्यांचे घरोघर वाटप करणे, खासकरून प्राणवायू निर्माते वटवृक्ष आणि तुळशींची लागवड, मंदिरांची स्वच्छता असे विविध उपक्रम श्रावण महिन्यातच हाती घेतले आहेत. शिवभक्ती असो की निसर्गपूजन, दोन्हींमध्ये उपचार आला आहे. श्रावणात उपवास करणारी तरुण पिढीही 'डिटॉक्स डाएट' म्हणून या परंपरेला मानते. हे चित्र निराशाजनक असले, तरी यातून सकारात्मकता शोधली, तर सुधारण्याची आणि नव्याने रुजवण्याची संधी आहे. जो प्रयत्न 'तरुण भारत'सारख्या एका चळवळीनेच सुरू केला आहे. असे उपक्रम आता अशा संस्थांनी हाती घेणे ही काळाची गरज बनली आहे आणि तसे होताना आजूबाजूला दिसतही आहे, ही समाधानाची बाब आहे. बालकवींच्या या अजरामर ओळींमधील 'हिरवळ चोहीकडे दाटो..' अशीच भावना सर्वांची असेल,

**'श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे**
**क्षणात येते सरसर शिरवे क्षणांत फिरूनी ऊन पडे..'**

मराठी आणि इतरही भारतीय भाषांमध्ये श्रावण महिना, पावसाची नक्षी, निसर्गाची रंगछटा आणि मानवी सौंदर्य यावर विपुल कविता नावाजल्या आहेत. श्रावणाचा पहिला पाऊस हे अनेक कवींना भावलेलं चित्र आहे. जसे 'ऋतु हिरवा, ऋतु बरवा, पाचूचा वनी रुजवा, युगविरही हृदयावर सरसरतो मधुशिरवा..' अशा ओळी शांता शेळके लिहून जातात. तर प्रसाद कुळकर्णीसारखा नव्या पिढीचा कवी म्हणतो,

**'उल्हासाला फुटे पालवी, मनात फुलले ऋतू**
**मोर नाचती पंख पिसारून हर्ष जातसे उतू**
**मी एकांती, तुझ्या संगती, मीपण माझे भुलतो ग**
**क्षितिजकडेवरी पूर रुपेरी इंद्रधनुचा झुलतो ग..'**

## आंतरराष्ट्रीय

# रशियाच्या आडून भारताची कोंडी

**प्रा. जयसिंग यादव**

पुढील ५० दिवसांमध्ये युक्रेनमधील युद्धावर कोणताही करार झाला नाही, तर रशियाला मोठ्या प्रमाणात शुल्क आकारावे लागेल, असे अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. ट्रम्प यांनी रशियाकडून तेल आयात करणाऱ्या देशांवर १०० टक्के शुल्क लादण्याचा स्वतंत्र इशारा दिला आहे. उत्तर अटलांटिक करार संघटनेचे (नाटो) सरचिटणीस मार्क रूट यांनी यांनी म्हटले की, भारत, चीन आणि ब्राझीलने व्लादिमिर पुतिन यांना फोन करून शांतता चर्चेबाबत गंभीर होण्यास सांगावे. असे न झाल्यास या तिन्ही देशांना मोठे परिणाम भोगावे लागतील. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटले की, ''ऊर्जा सुरक्षा ही भारतासाठी प्राधान्याची बाब आहे. तेल आयातीच्या बाबतीत आम्ही बाजार आणि जागतिक परिस्थितीनुसार निर्णय घेतो. या प्रकरणात कोणत्याही प्रकारच्या दुटप्पी मानकांबद्दल आम्ही इशारा देत आहोत.'' भारताचे पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी म्हणाले की, आमच्यावर कोणत्याही प्रकारच्या दबावाचा परिणाम झालेला नाही. रशियाकडून तेल आयातीवर परिणाम झाला तरी भारताला तेल पुरवठ्याबाबत कोणतीही समस्या येणार नाही. कारण आमचा तेल पुरवठा कोणत्याही एका देशावर अवलंबून नाही. दुसऱ्यांदा सत्तेत आल्यापासून ट्रम्प रशियाचे अध्यक्ष पुतिन यांच्याशी अनेक वेळा फोनवर बोलले आहे; परंतु कोणताही तोडगा काढू शकले नाहीत. भारत आणि चीन हे रशियन कच्च्या तेलाचे सर्वात मोठे आयातदार आहेत. तेल मंत्रालयाच्या मते, भारत तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८८ टक्के तेल आयात करतो. भारत रशियाच्या एकूण तेल निर्यातीपैकी ३८ टक्के तेल खरेदी करत आहे.

'चॅथम हाऊस' या थिंक टँकच्या मते फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर हल्ला करण्यापूर्वी रशियाकडून भारताची तेल आयात दोन टक्क्यांपेक्षा कमी होती. बायडेन यांच्या कारकीर्दीतही भारतावर रशियाकडून तेल आयात थांबवण्याचा दबाव होता; परंतु मोदी सरकार त्यावेळी पश्चिमेला अतिशय आक्रमकपणे प्रतिसाद देत होते. ट्रम्प केवळ रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दलच भारताला धमकावत नाहीत तर 'ब्रिक्स'बद्दल सतत इशारा देत आहेत. त्यांना वाटते की, ब्रिक्स (ब्राझील, भारत, रशिया, चीन, दक्षिण आफ्रिका) हा अमेरिकन वर्चस्वाला आव्हान देणारा गट आहे. ट्रम्प यांनी ब्रिक्स देशांवर स्वतंत्र शुल्क लादण्याची धमकी दिली आहे. दुसरीकडे अमेरिकन सिनेटर रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर ५०० टक्के कर लादण्याच्या विधेयकावर काम करत आहेत. या मुद्यावर भारतावरील दबाव वाढला आहे आणि हा दबाव अशा प्रकारे दुर्लक्ष करता येणार नाही. किंबहुना, भारताला दोन आव्हानांना तोंड द्यावे लागेल. रशियाकडून तेल आयात बंद झाल्यास भारताला स्वस्तात तेल मिळणार नाही. याशिवाय आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढतील. यामुळे भारताला महागडे तेल खरेदी करावे लागेल. पण हा विषय फक्त तेलापुरता मर्यादित नाही.

अमेरिकेच्या मते भारताने रशियासोबत व्यापार थांबवावा; परंतु भारत हा दबाव मान्य करण्याची शक्यता नाही. ट्रम्प यांची धमकी प्रत्यक्षात आल्यास मात्र भारतासाठी समस्या वाढतील. भारतासोबत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करण्याबाबत चीनही आघाडीवर आहे. अमेरिका आणि 'नाटो'ने चीनलाही इशारा दिला आहे. याचा अर्थ असा की, ट्रम्प अनेक देशांशी खूप कडक वागत आहेत; परंतु ते ट्रम्प यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देत आहेत. त्यांच्याशी तडजोड करत आहेत; पण भारत हा चीन नाही. चीनने 'रेअर अर्थन मॅग्नेटिक' आणि अर्धवाहकांचा पुरवठा थांबवला होता. अशा परिस्थितीत, भारत अमेरिकेच्या दबावापुढे झुकणे हे चीनच्या बाजूने असेल का? यामुळे रशियाचे चीनवरील अवलंबित्व आणखी वाढेल आणि हे भारतासाठी कोणत्याही प्रकारे चांगले नाही. रशियाकडे आता चीनशिवाय पर्याय नाही. रशियाच्या एकूण तेल निर्यातीपैकी ४७ टक्के निर्यात चीनमध्ये होत आहे.

भारताचे रशियातील माजी राजदूत आणि भारताचे माजी परराष्ट्र सचिव कंवल सिब्बल यांनी मार्क रूट यांचे विधान पुन्हा पोस्ट करताना 'एक्स'वर लिहिले आहे की 'नाटो' आता भारताला धमकावत आहे. 'नाटो' प्रमुखांनीही चीनसमोर भारताचा उल्लेख केला आहे. भारत, चीन आणि ब्राझीलला धमकी देऊन 'नाटो' प्रमुख केवळ भू-राजकीय खोलीबद्दल त्यांचे अज्ञान दाखवत आहेत. नाटो सरचिटणीसांना अशा इशाऱ्यांचा परिणाम काय होईल हे माहीत नाही. तुर्कस्तान रशियाकडून मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आयात करतो. तुर्कस्तान 'नाटो'चा सदस्य आहे. नाटो सरचिटणीस तुर्कस्तानवरही निर्बंध लादतील का? नाटो आपल्या सोयीनुसार तुर्कस्तानबाबत गप्प का आहे, असे प्रश्न उपस्थित होतात. युरोपीय महासंघ अजूनही त्याच्या तेलाच्या गरजेच्या सात टक्के कच्चे तेल रशियाकडून आयात करतो. हंगेरी आणि स्लोवाकिया हे दोन्ही देश 'नाटो'चे सदस्य आहेत. तेही रशियाकडून कच्चे तेल आयात करतात. त्यांच्याबाबतही मार्क रूट मौन बाळगतात. ट्रम्प युक्रेनमधील युद्ध थांबवू इच्छितात; पण पुतिन तयार नाहीत. रशियाला थेट लक्ष्य करण्याऐवजी ट्रम्प रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांना लक्ष्य करीत आहेत. चीन आणि भारत या जगातील दोन महत्त्वाच्या अर्थव्यवस्था आहेत. आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या मते, रशियाने गेल्या वर्षी कच्च्या तेलाच्या निर्यातीतून १९२ अब्ज डॉलर्स कमावले. ट्रम्प या उत्पन्नाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न करीत आहेत; परंतु त्याचा परिणाम केवळ रशियापुरता मर्यादित राहणार नाही.

रशिया दररोज ७० लाख पिंपापेक्षा जास्त कच्चे तेल निर्यात करीत आहे. हा व्यापार विस्कळीत झाल्यास कच्च्या तेलाच्या किमती वाढतील. चीन रशियाकडून खरेदी करत असलेल्या तेलाच्या प्रमाणात घट करू शकतो; परंतु यामुळे रशियाबद्दल चीनचा दृष्टिकोन बदलणार नाही. अमेरिकेच्या इशाऱ्यामुळे चीन रशियावर दबाव आणण्याची शक्यता नाही. भारताने हा दबाव स्वीकारू नये, कारण हा अमेरिकेचा शेवटचा दबाव नसेल. त्यांच्या मागण्या वाढतच जातील. अमेरिकेचे यासंदर्भातले ध्येय निश्चित नाही. रशियाकडून तेल स्वस्तात उपलब्ध असल्यामुळे आपण ते खरेदी केले पाहिजे. आपण रशियाकडून खरेदी न केल्यास तेल महाग होईल आणि याचा थेट परिणाम भारतीयांवर होईल. ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात भारताची रणनीती थोडी बदललेली दिसते. बायडेन यांच्या राजवटीत भारत अमेरिकेला अचूक उत्तर देत असे; पण आता तो गप्प आहे. चीनशिवाय दुसरा कोणताही देश बोलत नाही. ट्रम्प यांच्या मागण्यांना अंत नाही. अमेरिका टोल टॅक्ससारखे शुल्क मागत आहे. ज्या देशांसोबत अमेरिकेचा व्यापार करार झाला, तेदेखील या वर्तनाशी सहमत नाहीत. अमेरिकेतील लोकांना याचा फटका सहन करावा लागेल. त्यामुळे वास्तविक पाहता 'ब्रिक्स' देशांना धमकावून ट्रम्प यांच्या पदरात काहीच पडणार नाही.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)


## वेध

**रेवती जोशी अंधारे**

# जिवाचा गेम

मोबाईलवर गंमत म्हणून गेम खेळण्यास सुरुवात झाली. फळं कापणं, सारख्या रंगाच्या वस्तू जोडणं, फुगे फोडणं यासारख्या बिनडोक गेम्सच्या लेव्हल्स ओलांडण्यात जीवनाचं यश वाटू लागलं. मग, असं खेळून पैसेही कमावता येतात, हे कळलं. सुरुवातीला त्यातून चांगली कमाई झाली. मग, आपण जितका जास्त पैसा लावू, तितका जास्त फायदा, हे समजलं. जवळचा पैसा लावून गेम खेळण्यातील गंमत संपली आणि हा अस्सल धंदा असल्याचं लक्षात आलं. मग, घरातील लहान-मोठ्या वस्तू विकून गेमिंगमध्ये पैसा लावला. आता गेमिंगचं प्रमाण वाढलं असलं, तरी उत्पन्न मात्र हळूहळू कमी होत चाललं. शेती विकून आलेला पैसा गेमिंगमध्ये लावला. विरोध करणाऱ्या गर्भवती बायकोचा अडीच वर्षांच्या लेकीसह जीव घेतला. इतकं करूनही हाव संपत नव्हती आणि संयम साधत नव्हता. आत्महत्येचा पर्याय स्वीकारला.

गेल्या महिन्यात पुण्यात घडलेल्या या घटनेने अजून संवेदना शिल्लक कदाचित मोजक्याच लोकांना नवीन कोडं घातलंय. ऑनलाईन गेमिंगमधील काही प्रकार म्हणजे पैसे लावून खेळणं आणि यालाच आपण जुगार असेही म्हणतो. म्हणजे आतापर्यंत कुठेतरी आडोशाला बसून, पोलिसांपासून लपून खेळल्या जाणाऱ्या जुगाराला ऑनलाईन गेमिंग असं ब्रॅण्डनेम मिळालं. ७० च्या दशकात इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा वापर करून टाईमपास म्हणून गेम खेळण्याची सुरुवात झाली. आपल्यापैकी अनेकांनी इंटरनेट बंद झाल्यास उड्या मारत जाणाऱ्या छोट्याशा डायनासोरचा गेम खेळला असेलच. पण, तो तेवढ्यापुरताच! नवीन तंत्रज्ञानासह इलियॉनिस विद्यापीठाचा प्लेटो आणि एमयुडी म्हणजे 'मल्टी युजर डंज्न' या नेटवर्क गेमिंग प्लॅटफॉर्म्सने जोर धरला. पण, दोनच दशकांनंतर आलेल्या लॅन म्हणजे लोकल एरिया नेटवर्किंगने एकाच वेळी अनेकांना जोडण्याची क्षमता निर्माण केली आणि इथेच ऑनलाईन गेमिंगचा पाया रचला गेला. २१ व्या शतकाच्या सुरुवातीला 'मॅसिव्हली मल्टिप्लेयर ऑनलाईन गेम' या संकल्पनेचा उदय आणि प्रचंड वेगाने विस्तार झाला. मनोरंजनासाठी अज्ञात लोकांसोबत ऑनलाईन गेमिंगचा पर्याय जास्त ट्रेंडी आणि स्मार्ट ठरला.



दरम्यान, लोकांना बुद्धी गहाण टाकून निष्क्रिय करणाऱ्या खेळांमधून पैसे कमविता येतात याचा साक्षात्कार चतुर उद्योजकांना झालाच होता. वर्ष १९८४ मध्ये 'आयर्लंड्स ऑफ केस्माई' या पहिल्या ऑनलाईन गेमची सुरुवात झाली. 'ईझी मनी'ची ही भन्नाट कल्पना चाणाक्ष लोकांनी उचलून धरली. जास्त ग्राफीक्समुळे रंगबिरंगी आणि हॅपनिंग झालेले ॲक्शन गेम्स प्रचंड लोकप्रिय झाले. साधारण ९० च्या दशकात इंटरनेटमुळे कनेक्टिव्हिटीची नवी लाटच आली आणि डूम किंवा क्वेकसारखे गेम युवावर्गाच्या डोक्यात धुमाकूळ घालू लागले. फास्ट इंटरनेट, स्मार्टफोन आणि कॉम्प्युटरच्या लाटा आता आशियाचे दार ठोठावू लागल्या. पश्चिमेच्या कौतुकात नेहमीच अग्रेसर असलेल्या भारतीयांनी कवाडं उघडून या त्सुनामीला स्वत:च्या मेंदूचा ताबा दिला. भराभर चित्र बदलत गेलं. पाश्चिमात्यांसाठी भारत नेहमीच 'मोठी बाजारपेठ' राहिला आहे. भारतीयांची मानसिकता हेरून, ऑनलाईन गेमिंगच्या माध्यमातून ईझी मनी मिळतो, हे सूत्र रुजविण्यात गेमिंग कंपन्या यशस्वी झाल्या.

युवकांवर प्रभाव पाडणारे हिरो-हिरोईन्स, क्रिकेटर्स, सोशल मीडिया इनफ्लुएन्सर्स या ऑनलाईन गेमिंगची जाहिरात करतात. झटपट आणि कमी श्रमात श्रीमंत होण्याचा हा मार्ग दाखविताना 'इस खेल की आदत लगना संभव है, जिम्मेदारीसे खेले' असा एका नाममात्र संदेश द्यायला कंपन्या विसरत नाहीत. हा संदेश दिला की, आपली जबाबदारी संपली, इतकी भावनाशून्यता तर नक्कीच आहे. झेनोफोबिया म्हणजे प्रवाहापासून वेगळे पडण्याची भीती, गेमिंगो व्यसन, सायबर हल्ले आणि फसवणूक, अनैसर्गिक हिंसाचारी वृत्ती, भावनाशून्य मन आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे कशाचंच काहीही न वाटणं! हे सगळे ऑनलाईन गेमिंगच्या व्यसनाचे परिणाम आता दिसू लागले आहेत. भारतविरोधी दहशतवादी कारवायांना पैसे पुरविण्यासाठी, जिहादी विचारांच्या प्रचारासाठी या गेम्सचा वापर हा आणखी एक आयाम आहेच. गेल्या तीन वर्षांत भारत सरकारने १,५२४ अवैध गेमिंग साईट्स आणि मोबाईल ॲप्सवर बंदी आणली आहे. आता महाराष्ट्र सरकारही यादृष्टीने विचार करत असल्याचं वृत्त आहे. पैसा कमविण्यासाठी श्रमाला पर्याय नाही तसाच, गेमिंगचं हे भूत युवावर्गाच्या मानगुटीवरून उतरविण्यासाठीही या बंदीला पर्याय नाही.

९८५०३३९२४०

## दखल

# देवाभाऊ... महाराष्ट्राचा नवा कोरा ब्रँड

**मोरेश्वर बडगे**

'शरद पवारांना समजायला शंभर जन्म घ्यावे लागतील' असे त्यांचे भक्त ठाकरे सेनेचे खासदार संजय राऊत एकदा म्हणाले होते. त्याच शरद पवारांवर 'देवेंद्र फडणवीस समजायला हजार वर्षे लागतील' असे म्हणायची वेळ आली आहे. फडणवीसांना आजवर टार्गेट करीत आलेले शरद पवार आज त्यांचे कौतुक करीत आहेत. निमित्त आहे देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसाचे. शरद पवार म्हणतात, 'फडणवीसांच्या कामाची गती अफाट आहे. त्यांच्या कामाचा झपाटा, उरक, कष्ट पाहिले तर ते थकत कसे नाहीत, असा मला प्रश्न पडतो. उद्धव ठाकरे यांचाही गोंधळ कमी नाही. 'फडतूस गृहमंत्री', 'अनाजीपंत' आदी टोमण्यांनी देवेंद्र फडणवीस यांची एकेकाळी टिंगलटवाळी करणारे उद्धव ठाकरे आज त्यांच्या आरत्या ओवाळत आहेत. 'प्रामाणिक, हुशार राजकारणी' या शब्दात उद्धव यांनी फडणवीसांचे कौतुक केले आहे. 'अकेला देवेंद्र' ते 'चाणक्य देवेंद्र' हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रवास विरोधकांचे डोळे गरागरा फिरायला लावणारा आहे.

अवघ्या आठ महिन्यात महाराष्ट्राचे राजकारण किती बदलले आहे, याची ही साक्ष आहे. तब्बल ४० वर्षांपासून महाराष्ट्राचे राजकारण शरद पवारांभोवती फिरत आले. काहीही घडले तरी त्याचा संबंध पवारांशी जोडला जाई. 'शरद पवारांची गुगली', 'शरद पवारांनी गेम केला' असे बोलले जाई. पवार पावसात भिजले तर सीट आलीच समजा, इथपर्यंत हे माहात्म्य पोचले होते. पण आता दिवस फिरले. पवारांनी नुकतेच जयंत पाटील यांच्या जागी शशिकांत शिंदे यांना आणले. पवारांनी पलटवलेल्या या भाकरीची साधी चर्चासुद्धा नाही. राजकारणाची भाषा आता बदलली आहे. चर्चा आहे ती देवाभाऊ आणि त्यांच्या कारनाम्यांची- नेतृत्व गुणांची. प्रत्येक गोष्टीत फडणवीसांचा हात शोधला जात आहे. ठाकरे बंधू २० वर्षांनंतर एका व्यासपीठावर आले तेव्हा तर राज ठाकरे म्हणाले, ''बाळासाहेबांना त्यांच्या हयातीत जमलं नाही ते फडणवीसांनी जमवलं.'' 'बारामतीची गादी' खालसा झाली आहे. सत्तेचा फोकस आता बारामतीहून नागपूरला आला आहे.

विदर्भाचा नेता प्रथमच मुख्यमंत्री झाला अशातला भाग नाही. वसंतराव नाईक तब्बल ११ वर्षे मुख्यमंत्री होते. मात्र रिमोट कन्ट्रोल पश्चिम महाराष्ट्राकडे होता. फडणवीस मुख्यमंत्री हा बदल यासाठी महत्त्वाचा की सत्तेचा रिमोट विदर्भाकडे आला आहे. प्रत्येक पिढी एक नेत्याभोवती फिरते असा इतिहास आहे. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील यांच्यानंतर शरद पवारांनी ती जागा घेतली. कधीही निवडणूक न लढवलेल्या शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचाही एक जमाना होता. प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे लवकर गेले. मुंडे असते तर राज्याचे राजकारण काही वेगळेच असते. या पोकळीत नितीन गडकरी यांनी आघाडी घेतली. त्याच काळात देवेंद्र फडणवीस पुढे येऊ पाहत होते. वयाच्या २२ व्या वर्षी नागपूरचे नगरसेवक, २७ व्या वर्षी महापौर, १९९९ पासून सलग आमदार, वयाच्या ४४ व्या वर्षी मुख्यमंत्री, पुढे पहाटेचा शपथविधी आणि आता तिसऱ्यांदा मुख्यमंत्री... मात्र हा संघर्ष सोपा नव्हता.



फडणवीस यांना आपण आज ज्या हिमालयाच्या उंचीवर पाहतो आहे ती त्यांची अवघ्या ११ वर्षांतली तपश्चर्या आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू होती त्या धुमश्चक्रीत महाराष्ट्राची धुरा नरेंद्र मोदी यांनी या तरुणाकडे दिली. पुढे फडणवीसांनी मागे वळून पाहिले नाही. स्वभावात मवाळपणा, कुठेही इगो नाही, सगळ्या गटातटांना सोबत घेऊन काम करण्याची खुबी... या जोरावर फडणवीस मोदींच्या मनात भरले. महाराष्ट्राने त्या निवडणुकीत मोदींना भरभरून जागा दिल्या. मोदी खूश झाले. मुख्यमंत्रिपदाची माळ फडणवीस यांच्या गळ्यात पडली. तब्बल तीन निवडणुका मोदींची मर्जी राखणं साधी गोष्ट नाही. मग तुम्हाला प्रश्न पडेल, फडणवीसांनी असे काय केले? चोवीस तास राजकारण करणाऱ्या कोणत्याही नेत्याने करायला पाहिजे तेच फडणवीसांनी केले. मोदींचे 'चॉकलेट बॉय' एवढीच फडणवीसांची पात्रता नाही. राजकारणामध्ये फक्त 'गॉडफादर' असून भागत नाही. त्याने दिलेल्या संधीचे सोने करण्यासाठी कष्टही उपसावे लागतात. मोदींचे राजकारण केवळ निवडणुकीपुरते नसते. तसेही भाजपाचे राजकारण आता पार्टटाईम राहिलेले नाही. पाचही वर्षे १८-१८ तास मेहनत आहे. फडणवीसांनी हेच 'वर्क कल्चर' स्वीकारले आणि पाळले. त्या जोरावरच फडणवीस आज आहेत त्या जागी दिसत आहेत. हा प्रवास गुलाबी नव्हता. २०१४ मध्ये त्यांना उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसोबत युतीत सरकार चालवावे लागले. २०१९ मध्ये जनमताचा कौल मिळूनही दगा झाला. मुख्यमंत्री होण्याच्या महत्त्वाकांक्षेने उद्धव ठाकरे यांना पछाडले होते. शरद पवारांनी उद्धव यांची ही नाजूक नस हेरली. काँग्रेसला सोबत घेऊन पवारांनी महाविकास आघाडी सरकारचे जुगाड जमवले. ते टिकणार नव्हतेच. अडीच वर्षांत कोसळले. ठाकरे यांच्या ४० आमदारांनी बंड करून ठाकरेंना घरी बसवले. तरीही एकनाथ शिंदे यांच्यासाठी फडणवीसांना मागच्या सीटवर बसावे लागले. पक्षासाठी फडणवीसांनी तोही त्याग केला. तिप्पट जोशाने काम केले. त्याची बक्षिसी त्यांना मिळाली. लागोपाठ तीन निवडणुकीत पक्षाला शंभरावर जागा जिंकवून दिल्या, एवढीच फडणवीसांची कामगिरी नाही. त्यांच्यातल्या 'चाणक्य'ने दोन-दोन पक्ष फोडले. शरद पवारांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना भाजपाच्या मार्गातले दोन मोठे अडथळे होते. शरद पवार कधीही मोठी ताकद नव्हती. जोडतोड करून पवार सत्तेच्या आश्रयाला राहत आले. पवारांना आपल्या स्वतःच्या हिमतीवर कधीही ७१ पेक्षा जास्त आमदार निवडून आणता आलेले नाहीत. फडणवीसांनी हा फुगा फोडला. पुतण्याकडूनच काकाचा पक्ष हायजॅक करवला. अजितदादा पवार आता भाजपासोबत महायुतीच्या सत्तेत सामील झाले आहेत. उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्व सोडले, त्याची शिक्षा जनतेने त्यांना दिली. आता तर उद्धव यांच्याकडे उरलेले बहुसंख्य नेते-नगरसेवकही एकनाथ शिंदे यांच्याकडे आले आहेत. शरद पवार म्हणा किंवा उद्धव ठाकरे; दोघेही संपल्यात जमा आहेत. त्यामुळे भाजपाचा २०२९ च्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. हे सर्व एका देवाभाऊचे ऑपरेशन आहे.

फडणवीसांनी केवळ राजकारण केलं नाही, विकासकारणही केलं. समृद्धी महामार्ग त्याची साक्ष आहे. शक्तिपीठ महामार्गाचे कामही लवकरच सुरू होईल. पायाभूत सुविधांचे अनेक प्रकल्प फडणवीसांच्या पुढाकाराने सुरू झाले आहेत. काँग्रेसवाले खूप गप्पा मारतात. मात्र गडचिरोली या विदर्भातल्या सर्वात मागास आणि आदिवासी जिल्ह्याची क्षमता फडणवीसच ओळखू शकले. आज त्यांच्या सर्वाधिक फेऱ्या गडचिरोलीला होतात. त्यांच्या लक्ष घालण्यामुळे तिकडचा माओवाद्यांचा त्रास कमी झाला. आता तिकडे पोलादाच्या खाणी सुरू होत आहेत. तुम्ही लिहून ठेवा, भविष्यात गडचिरोली देशाचा 'स्टील हब' म्हणून ओळखला जाईल. पूर्वी गडचिरोलीला जायला अधिकारी तयार नसत. आज ते चित्र बदलले आहे आणि हे एका फडणवीसाने शक्य करून दाखवले. हल्ली दिल्ली फडणवीस यांच्याकडे वेगळ्या नजरेने पाहू लागली आहे. भाजपाचा देशाचा उद्याचा चेहरा फडणवीस झाले तर नवल नको.

९८५०३०४१२३
(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### एसटी कर्मचाऱ्यांचे आर्थिक प्रश्न

अलिकडेच राज्याचा आर्थिक अहवाल, २०२५ चा अर्थसंकल्प आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विविध योजनांबाबतच्या सूचना पाहिल्यानंतर आर्थिक संकट किती खोलवर होत चालले आहे, याची जाणीव होते. राज्यावरील कर्जाचा डोंगर कमी होण्याऐवजी सतत वाढत चालला असल्याने महायुतीला पुन्हा सत्तेत बसवणारी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' तसेच इतर अनेक लोकप्रिय योजनांना अखेर अंकुश लावावे लागले आहे. यंदा शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नाही, असे राज्य सरकारकडून सांगण्यात आले. महाविकास आघाडी सरकार असताना एसटी कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उगारले होते. त्यावेळी उद्धव ठाकरे यांच्या सरकारने कठोर भूमिका घेत शेकडो कर्मचाऱ्यांवर कारवाई केली होती. पण त्यानंतर ही कारवाई मागे घेत कर्मचाऱ्यांच्या वेतनात अखेर पाच हजार रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली होती. २०२२ मध्ये राज्यात सत्तांतर झाले त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने नागरिकांना विविध प्रकारची स्वप्ने दाखवली. त्यापैकी एक म्हणजे एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात चार टक्के वाढ करण्यात आली. त्यापाठोपाठ या कर्मचाऱ्यांच्या वेतनात साडेसहा हजार रुपयांपर्यंतची वाढ करण्यात आली. प्रत्यक्ष स्थिती खूप वाईट आहे. एसटी कर्मचाऱ्यांना वेळेत वेतन दिले तर जात नाही, पण एकूण पगारातील फक्त ५६ टक्के रक्कमच मार्च महिन्याच्या पगारात देण्यात आली. एका बाजूला जीवनावश्यक वस्तूंचे दर सतत वाढत असताना जगायचे कसे असा प्रश्न या कर्मचाऱ्यांसमोर उभा राहिला आहे. जनतेसाठी चालवली जाणारी परिवहन सेवा आणि योजना महायुती सरकारला अडचणीच्या ठरू लागल्या आहेत. एसटी महामंडळाचे शासकीय सेवेत विलीनीकरण करण्याची मागणी कर्मचाऱ्यांची आहे. सरकारने गांभीर्याने यातून प्रभावी मार्ग काढण्याची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

● ● ● ●

### ठाणवाई अर्थात तेलवातीची समई

आषाढ महिन्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच अमावास्येला आषाढी अमावास्या किंवा दीप अमावास्या असे म्हणतात. श्रावणाचा पवित्र महिना सुरू होण्याच्या आदल्या दिवशी ही अमावास्या येत असल्याने घरातील दिव्यांची पूजा केली जाते. दीप अमावास्या म्हणजेच आषाढी अमावास्या होय. दीप पूजन करून आगामी श्रावण महिन्याच्या स्वागताची तयारी केली जाते. अंधारातून प्रकाशाच्या वाटेवर नेणारा दिवा हा मांगल्याचं प्रतीक आहे. मांगल्य, समृद्धी आपल्या आयुष्यामध्ये नांदावी या प्रेरणेने आषाढ महिन्याच्या शेवटच्या दिवशी दीप पूजन करून दीप अमावास्या साजरी केली जाते. पावसाळ्यात कमजोर झालेल्या पचनक्रियेला चालना देण्यासाठी, मजबूत करण्यासाठी ही दीप अमावास्या दिव्यांच्या माध्यमातून प्रेरणा देऊन जाते. कंदील, विजेच्या दिव्याची पूजा शास्त्राला धरून नाही. महारतीसाठी एका ज्योतीस किमान दोन वाती असाव्यात. एका वातीवर कोणतीही आरती करू नये; कारण आरतीमधील ज्योत मानवी जीवनाचे प्रतीक असून दोन वाती म्हणजे आत्मा व पंचमहाभौतिक शरीर होत. तूपसदृश वसा (चरबी) युक्त वनस्पती तूप नामक द्रव पदार्थ (कृत्रिम तूप) माणसाप्रमाणे देवालासुद्धा ग्राह्य नाही. म्हणूनच शुद्ध तुपात भिजविलेल्या वातींचाच वापर करावा. घरातील सर्व दिवे गरम पाण्यामध्ये टाकून स्वच्छ धुवून घ्यावी. देवासमोर एक पाट मांडून त्या भोवती छान रांगोळी काढावी. पाटावरती सर्व दिवे मांडावे. त्या सर्व दिव्यांची हळद-कुंकू गुलाल वाहून पूजा करावी. फुलं वस्त्रमाळ हे दिव्यांवरती व्हावं. नंतर हे सर्व दिवे हे प्रज्वलित करून त्यांना हात जोडून नमस्कार करावा. दिव्याची पूजा केल्यावर महालक्ष्मी प्रसन्न होते.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

● ● ● ●

### पंजाब सरकारचा स्तुत्य निर्णय

पंजाब सरकारने नुकताच एक अभिनव व दूरदृष्टी ठेवून स्तुत्य निर्णय जाहीर केला आहे. लहान मुलांची तस्करी करून त्यांना चौका-चौकात भीक मागण्यास जबरी करून बायकांच्या कडेवर दयनीय अवस्थेत प्रस्तुत केले जाते आणि लोकांची सहानुभूती मिळवून भीक गोळा केली जाते. प्रत्येक वेळा ही शंका असते की ते मूल त्या बाईचेच आहे की नाही. मुलांच्या तस्करीवर आळा बसावा म्हणून पंजाब सरकारने लहान मुलांना कडेवर घेऊन संशयास्पद स्थितीत आढळणारे भिकारी यांची डीएनए टेस्ट (बालक आणि महिला-पुरुष) करून खात्री करून घेणार व गैरप्रकार आढळल्यास कठोर कार्यवाही करणार. पंजाब सरकारचा हा निर्णय कौतुकास्पद व इतर राज्यांनी अनुकरणीय असा आहे. मुलांच्या तस्करीवर व त्यांना भिकेला लावणाऱ्यांवर हा एक प्रभावी उपाय ठरेल असे वाटते.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

● ● ● ●

### अमरावती-जबलपूर ट्रेन प्रयाग-काशीपर्यंत वाढवावी

प्रयाग-काशी येथे जाण्यासाठी दक्षिणेकडून ज्या गाड्या आहेत, त्या नेहमी हाऊसफुल असतात. त्यामुळे विदर्भातून तिथे जाणाऱ्या लोकांना फार त्रास होतो. जर अमरावती-जबलपूर एक्सप्रेस प्रयाग-काशीपर्यंत वाढविली तर विदर्भातील लोकांना त्याचा लाभ मिळेल. जागाही मिळण्याचे चान्सेस वाढतील. रेल्वे प्रशासनाने लक्ष घालून ही गाडी प्रयाग-काशीपर्यंत वाढविण्याची शिफारस करावी ही विनंती.

**चंद्रशेखर खापरे**/९४२३४२०१७१

● ● ● ●

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## दातापीर दर्गाह सर्वधर्म समभावाचे प्रतिक : जनमेजयराजे भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि २४ जुलै-**

अक्कलकोट येथील दाता पिर दर्गाह सर्व धर्मीयांचे श्रध्दास्थान व सर्व धर्म समभावाचे प्रतिक असल्याचे प्रतिपादन श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी केले. दातापीर दर्गाह येथे ऊरूस निमित्त अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी दर्शन घेतले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य



मराठी पत्रकार संघ यांच्यावतीने जीवनगौरव पुरस्काराने गौरव जनमेजयराजे भोसले यांचा झाल्याबद्दल दातापिर दर्गाह ट्रस्ट च्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे सचिव शामराव मोरे, उपाध्यक्ष अभय खोबरे, सय्यद शाह, कादरी दाता पीर सय्यद शाह मस्तूर कादरी, रजाक सय्यद, गुलामदाता बळोरगी, रफिक पठाण, अशपाक मुल्ला तांबोळी, श्रीकांत झिपरे, सायबण्णा जाधव, दिपक साळुखे आदि उपस्थित होते.

## ▶▶ महत्वाचे...

### रस्ता ओलांडताना तरुणीला दुचाकीची धडक

**सोलापूर, दि. २४ जुलै -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (पार्क चौक) परिसरातील केक शॉपसमोर रस्ता ओलांडताना दुचाकीस्वाराने दिलेल्या धडकेत तरुणी जखमी झाली. हा अपघात बुधवारी रात्री आठच्या सुमारास घडला. प्राची महादेव चव्हाण (वय २४, रा. डेंटल कॉलेज, केगाव सोलापूर) असे जखमी तरुणीचे नाव आहे. बुधवारी रात्री आठच्या सुमारास प्राची हि पार्क चौकातील केक शॉपसमोरील रस्ता ओलांडत होती. त्यावेळी अज्ञात दुचाकीस्वाराने धडक दिल्याने पायाला मार लागला तर सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री १०.२० वाजता डॉ. विष्णू मस्के यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दुचाकी घसरून झालेल्या अपघातात तरुण जखमी

**सोलापूर, दि. २४ जुलै -**

शेटे वस्ती ते आमराई जात असताना सोनी सिटी समोरील रस्त्यावर दुचाकी अचानक घसरल्याने तरुण जखमी झाला. हा अपघात बुधवारी रात्री ९.४५ वाजता झाला. सागर चंद्रकांत साळुंखे (वय ३५, रा. औसे वस्ती, आमराई सोलापूर) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. बुधवारी रात्री ९.४५ च्या सुमारास सागर हा शेटे वस्ती येथून दुचाकीवर बसून आमराईच्या दिशेने जात होता. तो सोनी सिटीच्या समोरील रस्त्यावरून जाताना अचानक तो जात असलेली दुचाकी घसरली. यामुळे खाली पडून त्याया चेह-याला जखम झाली. त्याला मित्राने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### अल्पवयीन मुलाचा सात वर्षीय बालिकेवर अत्याचार

**सोलापूर, दि. २४ जुलै-**

एका सात वर्षिय बालिकेवर अत्याचार करणाऱ्या अल्पवयीन मुलावर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत बालिकेच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीत ७ वर्षिय बालिकेस यातील विधीसंघर्ष बालकाने घराशेजारी असलेल्या जंगलामध्ये नेऊन तिच्यावर अत्याचार केला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक रिया बोधे पुढील तपास करीत आहेत.

### सोरेगावातील तरुणाला अज्ञात कारणातून मारहाण

**सोलापूर, दि. २४ जुलै-**

७० फूट रोड येथील हॉटेल तिरंगा समोर अज्ञात कारणातून सोरेगाव येथील तरुणाला अनोळखी तीन लोकांनी मारहाण केली. ही मारहाण १९ जुलै रोजी झाली. प्रविण दगडू माने (वय २८, रा. सोरेगाव ता उ सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. हॉटेल तिरंगा समोर प्रविण यास तीन अनोळखी तरुणांनी लाकडी बांबू तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात डाव्या हाताला आणि डाव्या पायाला मुकामार लागला. त्याच दिवशी शासकीय रुग्णालयात उपचार घेतले. परंतु पुन्हा डाव्या पायाला सुज आल्याने तसेच पायाला इंनफेक्शन झाल्याने त्यास करण गायकवाड याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

### श्री संत नामदेव महाराज पायरीचेही घेतले दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ जुलै-**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे तसेच श्री संत नामदेव महाराज पायरीचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी उपमुख्यमंत्री श्री शिंदे यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार समाधान आवताडे, अभिजीत पाटील, उत्तम जानकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, महाराज मंडळी तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांनी कर्जमाफीसाठी रोखला महामार्ग; पाकणीजवळ चक्काजाम

### प्रहार जनशक्ती पक्ष शेतकरी संघटना, रयत क्रांती सेना आणि संभाजी ब्रिगेडच्या वतीने आंदोलन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २५ जुलै-**

शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करणे व अन्य मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्ष शेतकरी संघटना, रयत क्रांती सेना आणि संभाजी ब्रिगेडच्या वतीने पाकणी येथे सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग रोखण्यात आला.

प्रहार जनशक्ती पक्षाचे सर्वेसर्वा बच्चु कडू यांनी महाराष्ट्रात २४ जुलैला चक्काजाम आंदोलन करण्याचा सरकारला इशारा दिला होता. त्या अनुषंगाने गुरुवारी २४ जुलै रोजी या आंदोलनात इतर संघटनेनेही सहभाग नोंदवत सोलापूर पुणे महामार्ग रोखला होता. शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करणे, दिव्यांगांची पेन्शन, शेतमजूर मेंढपाळ, जिल्हा परिषद कर्मचारी विधवा महिला भगिनींना पेन्शन सुरू करावी अश्या १७ मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले होते. याबाबत बच्चू कडू यांनी अन्नत्याग उपोषण केले होते. महसूल मंत्री यांनी एक समिती गठित करून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू असे आश्वासन दिले होते ते आश्वासन पूर्ण न केल्याने महाराष्ट्रात पूर्ण चक्काजाम करण्यात आला. भविष्यात शेतकऱ्यांचा सातबारा लवकरात लवकर कोरा करून अन्य सतरा मागण्या पूर्ण न केल्यास मंत्रालयात घुसणार असल्याचे बच्चु कडू यांनी सरकारला इशारा दिला होता. यावेळी जिल्हाध्यक्ष दत्ता मस्के पाटील, शहराध्यक्ष अजित कुलकर्णी, संपर्कप्रमुख जमीर शेख, कार्याध्यक्ष खालीद मणियार, संभाजी ब्रिगेडचे सोम नाथ राऊत आदी पदाधिकारी, रयत क्रांती शेतकरी संघटनेचे पदाधिकारी दिव्यांग क्रांतीचे संजीवनी बारंगुळे, तसेच अनेक दिव्यांग बांधव प्रहार, जनशक्ती पक्ष व शेतकरी संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## भारतीय मजूदर संघाचा वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जुलै-**

सोलापूर जिल्ह्यात भारतीय मजदूर संघाचा ७०व्या वर्षाचा समारोप व ७१ व्या वर्धापन दिनाचा सोहळा साजरा करण्यात आला. सकाळी नऊ वाजता भारतीय मजदूर संघाच्या कार्यालय समोर विविध उद्योगातील कार्यकर्त्यांनी मिळून ध्वजारोहण केले. याच बरोबर 'मेरा घर इचड घर' हे अभियान देखील राबवण्यात आले. यामध्ये प्रत्येक सदस्याचे घरी लावण्यासाठी झेंडे व स्टिकर देण्यात आले.



तसेच कार्यालयात श्री सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले होते. सायं. ६ ते ९ मध्ये अनेक मान्यवरांना व सर्व उद्योगातील कार्यकर्त्यांना तीर्थप्रसादासाठी व अल्पोपहारासाठी निमंत्रण दिले होते. सहकारी बँक, रेल्वे, कामगार कल्याण मंडळ, सुरक्षारक्षक, वीज ऊद्योग आदी उद्योगातील अनेक मान्यवरांनी कार्यालयात येऊन श्री सत्यनारायणाचे दर्शन घेऊन, अल्पोपहाराचा आस्वाद घेतला व संघटनेप्रति असलेला स्नेह वृद्धिंगत केला. याप्रसंगी मान्यवरांना श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी जीवनदर्शन ही पुस्तके भेट देण्यात आली. यानिमित्ताने अनेक ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी व त्यांचे मार्गदर्शनही झाले आणि कार्यालयात सायं. ६ ते ९ मध्ये अनेक कार्यकर्त्यांची रेलचेल होती. साधारण २५०-३०० कार्यकर्त्यांची या कार्यक्रमात उपस्थिती होती. भारतीय मजदूर संघाचे चिटणीस सुधांशु रानडे यांनी ही माहिती दिली.

## आई प्रतिष्ठानतर्फे रविवारी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृासेवा,**
**सोलापूर, दि. २४ जुलै-**

आई प्रतिष्ठान गवळी समाज सामाजिक संस्थेच्या वतीने रविवार दि. २७ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता सोलापुरातील शिवानुभव मंगल कार्यालय, मीठ गल्ली येथे गवळी समाजातील इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती ट्रस्टी अध्यक्ष प्रशांत झिपरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध वक्ते विशाल गरड यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांचे विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शनपर व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमास गवळी समाजातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष प्रशांत झिपरे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस प्रसाद भास्कर, सागर अंजीखाने, सागर बडवणे, उमेश बडवणे, प्रेम झिपरे, प्रताप भास्कर उपस्थित होते.

## शितोळे यांचा अन्नछत्र मंडळातर्फे सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ जुलै-**

शिरुर (जि. पुणे) येथील जयमल्हार क्रांती संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष दौलतनाना शितोळे यांचा श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळात धार्मिक कार्याबरोबरच समाज उपयोगी कार्य उल्लेखनीय असून, न्यास हे स्वामी कार्यातील शिखर संस्था असल्याचे मनोगत श्री. शितोळे यांनी व्यक्त केले. त्यांच्यासमवेत बेडर समाज पंचकमिटीचे सेवानिवृत्त पोलिस अधिकारी लक्ष्मण झंपले, नागनाथ गुंजले, शिवाजीराव माने, लक्ष्मण मिनगले, महादेव अनगले, दत्ता माने हे उपस्थित होते. यावेळी न्यासाचे मनोज निकम, बाळासाहेब घाटगे, निखील पाटील, प्रवीण घाडगे, प्रवीण देशमुख, गोटू माने, कुमार सलबत्ते, शहाजी यादव,वैभव मोरे, नामा भोसले, पिंटू हळ्ळूरे, संभाजीराव पवार, प्रसाद हुल्ले , श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, राजू पवार, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, श्रीकांत स्वामी, स्वामिनाथ बाबर, रोहन शिर्के, शावरेप्पा माणकोजी, विशाल घाडगे, तानाजी जाधव, शुभम सावंत, रोहित कदम, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.




सोलापूर : श्रावणाच्या स्वागताला हिरवा शालू नेसून नटलेली नयनरम्य सृष्टी. सिद्धेश्वर वनविहारात टिपलेले छायाचित्र. (छाया : केवल तिवारी)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११८८

**तुका म्हणे सेखीं स्मशान तें वरी ।
संबंध गोवरी आगीसवें ।।**

आम्ही परभणीला जेथे राहत होतो, तेथून जवळच एका मंदिरात दररोज रात्री भजन व्हायचे. आवड असल्याने आम्ही भजनाला जात होतो. भजनाला येणाऱ्या एकमेकांचा आम्हाला चांगला परिचय झाला. विचारांची चांगली देवाण-घेवाण व्हायची. एखादा भजनी भजनाला आला नाही तर तो का आला नाही, याबद्दल आपुलकीने माहिती घेतली जायची. कोणीतरी आपली आठवण करते आहे किंवा कोणालातरी आपली अनुपस्थिती जाणवत आहे, हे कळल्यानंतर गैरहजर असणाऱ्यास बरे वाटायचे. आजच्या धावपळीच्या व बऱ्यापैकी मानवतेपासून दूर चाललेल्या मानवी जीवनात स्वार्थ किंवा व्यवहाराशिवाय कोणाला कोणाची



आठवण काढण्यास किंवा अनुपस्थिती जाणवण्यास वेळ मिळेनासा झालाय. असो, योग असा आला की, आमच्यापैकी एक भजनी अचानक हृदय झटक्याने मृत्यू पावला. भजनाच्या सुरूवातीला त्या मयत हरिभक्ताच्या मृत्यू व अंत्यविधिची चर्चा झाली. दुसरे दिवशी सकाळची वेळ ठरल्याचे मयताच्या आप्तेष्टाकडून कळले. भजनी मंडळीने ज्ञानेबा-तुकोबा, हरिनामाच्या गजरात तो देह स्मशानी नेण्याचे ठरविले. तेवढ्यात आमच्यापैकी एकजण म्हणाला, नको रे बाबा, मी स्मशानात येणार नाही, मला स्मशानाची भीती वाटते. त्यांचे हे उद्गार ऐकून आम्ही त्यांच्या टिळा, माळेकडे व त्यांच्या चेहऱ्याकडे थोडा वेळ पाहत रहिलो. हरिच्या दासाला मृत्यूची, स्मशानाची भय, चिंता ! हे आमच्या बुध्दिला पटत नव्हते. जन्म आहे तिथे मृत्यू आहेच. आपल्यापैकी प्रत्येकाला एके दिवशी स्मशानात जावेच लागणार आहे. हे निश्चित असतानाही या हरिभक्ताने असे वाक्य उच्चारावेत, ही आम्हाला आमची उणीव वाटली. ज्ञानोबा-तुकोबांचे अनेक दाखले देऊन आम्ही त्यांची भीती काढली. असे अनेक लोक आहेत की जे प्रेताला पाहात नाहीत, प्रेत आडवे गेले तर भीतात, अपशकून मानतात. स्मशानात जाण्यास धजत नाहीत. गाढ झोपलेल्या, कोमात गेलेल्या माणसात आणि प्रेतात विशेष काय फरक असणार आहे ? फरक असतो तो मानसिकतेमध्ये. आज ना उद्या प्रत्येकाचा स्मशानाशी संबंध येणारच आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे सेखीं स्मशान तें वरी । संबंध गोवरी आगीसवें ।।

आयुष्यभर या नाशवंत देहाला कितीही जोपासले, कोणाशीही संबंध जोडले, कितीही जमवले, कितीही सुरक्षितता ठेवली, कितीही गोळ्या औषधी, ध्यान धारणा केली तरी एके दिवशी या देहाची पराधिनता ही ठरलेलीच आहे. त्यामुळे जे कोणालाही चुकले नाही व चुकत नाही आणि जे अंतिम सत्य आहे, त्याची भीती वाटता कामा नये. भीती वाटावी ती या नाशवंत देहाकडून जाणिवपुर्वक होणाऱ्या चुकांची. जगद्गुरूंच्या म्हणण्याप्रमाणे एके दिवशी सर्व आप्तेष्टांचे, मित्रमैत्रिणींचे, धन-संपत्तीचे संबंध तुटून प्रत्येकाचा संबंध स्मशानाशी येणार आहे. अर्थात, अंतिमत: गोवरी, लाकूड, अग्नी, माती हे ठरलेलेच आहे. आपणाला स्मशानाची भिती वाटू शकते; पण स्मशानाला आपली कोणाचीही भिती वाटत नाही. कितीही मोठा असला तरी त्याची अंतिम जागा ही स्मशानच होय. हे सत्य असल्याने नको त्या नाशवंत वस्तूच्या जमवाजमवीत जीवनातील खऱ्या आनंदापासून दूर राहू नये. सदाचाराने आनंद घेत जीवन जगणाऱ्याला मृत्यूची, स्मशानाची भीती वाटत नाही. आपलाही अशा आनंदी लोकात समावेश असेल अशी आपण खात्री बाळगायला हवी.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष- |
| दि. २५ जुलै २०२५ | श्रावण मासारंभ |
| विक्रम संवत् २०८१ | महालक्ष्मी स्थापन व पूजन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. प्रतिपदा (२३.३२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पुष्य (१६.००) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वज्र (०७.२७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - किंस्तुघ्न (११.५७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** मुलांच्या बाबतीत कठोर निर्णय घ्यावे लागतील. अपेक्षित मित्रांची मदत मिळेल. भावनेपेक्षा कर्तव्य महत्त्वाचे ठरेल. प्रवासाचा योग संभवतो.

**वृषभ :** आपल्या भोळ्या स्वभावाचा इतर गैरफायदा तर घेत नाही ना याकडे लक्ष द्या. जास्त ताण घेऊ नका. अभ्यासाचा बाऊ न न करता विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा.

**मिथुन :** मनाचा दाखविलेला मोठेपणा नातेसंबंधातील तेढ कमी करणारा ठरेल. विचार बदलतील.

**कर्क :** एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य.

**सिंह :** मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे. हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य.

**कन्या :** आपल्या लहानसहान इच्छा:आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल.

**तुळ :** एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल.

**वृश्चिक :** धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. घरामध्ये छोट्या समारंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल.

**धनु :** कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल.

**मकर :** संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिमानास्पद ठरतील. मात्र, त्यांचे आरोग्याचे प्रश्नाबाबत वेळीच लक्ष द्या.

**कुंभ :** इतरांना न जमणारी कामे तुम्ही यशस्वीरीत्या हाताळाल. त्यामुळे वरिष्ठांची आपल्यावर मर्जी राहील. आनंदात जीवन जगाल. धन लाभ होईल.

**मीन :** एकत्रित होणाऱ्या सहली आनंददायक ठरतील. मुलांच्या हट्टापायी चैनीच्या वस्तूसाठी खर्च करावा लागेल. जीवनात यशस्वी व्हाल.

# जिल्ह्यातील दहा हजार लाडक्या बहिणींच्या अर्जात त्रुटी

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ जुलै-**

राज्यात लाडक्या बहीणींमुळे महायुती सरकार स्थापन झाले. त्यामुळे प्रत्येक महिन्याला लाडक्या बहीणींना दरमहा दीड हजार अनुदान देण्यात येते. शिवाय नवीन अर्ज करणार्या बहीणींचा समावेश करण्यात येत आहे. तर नियमावलीमध्ये न बसणार्या लाडक्या बहीणी अपात्र ठरविण्यात येत आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात लाडक्या बहीणी अनुदानासाठी अर्ज करीत आहेत. त्यामुळे अनुदान मिळविण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणींनी अनुदानासाठी दाखल केलेल्या अर्जामध्ये अनेक त्रुटी आढळून आले आहेत . सोलापूर जिल्ह्यातील सात हजार ६७४ तर महापालिका हद्दीतील एक हजार ९३१ असे एकूण नऊ हजार सहाशे पाच अर्जामध्ये त्रुटी आढळल्याने या बहिणींचा हिरमोड झाला आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण या बहुचर्चित योजनांचा राज्यातील लाखो लाडक्या बहिणींनी लाभ घेतला. सुरुवातीस योजनांवर शंका व्यक्त करत ज्यांनी अर्ज दाखल करणे टाळले होते. त्या बहिणींनी आता या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज भरले आहेत. पण, प्रशासनातील अधिकारी प्रत्येक अर्जाची कसून तपासणी करत आहेत. त्यामुळे अर्जातील त्रुटी लक्षात येत आहेत. यामुळे, दाखल अर्जदार महिलांचा हिरमोड होत आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील सर्वाधिक १६१३ सर्वात कमी बार्शीतील ३३६ अर्जाना त्रुटी लागले आहेत. शहरातील महिपालिका हद्दीतील एक हजार ९३१ अर्जही त्रुटीच्या कात्रीत अडकलेल्या आहेत.

### त्रुटींची पूर्तता करा

शहर, जिल्ह्यातील दाखल झालेल्या अर्जांची छाननी करण्यात आल्याने त्यात जिल्ह्यातील ७६७४ तर शहरातील १९३१ अर्ज अपूर्ण असल्याने त्यांना त्रुटी लागले आहेत. त्रुटींची पूर्तता करण्यासाठी सूचना देण्यात आले आहेत.

**- रमेश काटकर, जिल्हा महिला बालकल्याण अधिकारी**

### तालुकानिहाय अर्ज

अक्कलकोट.. ७०६
बार्शी.. ३३६
करमाळा.. ५२९
माढा.. ६३९
माळशिरस.. ५६१
मोहोळ.. ५७४
पंढरपूर.. ६९६
सांगोला.. ४७७
उत्तर सोलापूर... १६१३
दक्षिण सोलापूर.. ७८२
एकूण...७६७४
महापालिका हद्द .. १९३१

## दुचाकीच्या अपघातात ७ वर्षाच्या बालकासह दोघे जखमी

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ जुलै-**

गुरुनानक चौकात समोरील वाहन अचानक थांबल्याने धडक बसून झालेल्या अपघातात सात वर्षाच्या बालकासह दोघे जखमी झाले. हा अपघात बुधवारी रात्री ८.१५ च्या सुमारास घडला.

रोहित फतेसिंग बाबावाले (वय ७) व फतेसिंग बन्सी बाबावाले (वय २९, दोघे रा. म्हेत्रे वस्ती, सोलापूर) अशी जखमीची नावे आहेत. बुधवारी रात्री आठच्या सुमारास फतेसिंग हा सात वर्षाच्या रोहित नावाच्या मुलाला सोबत घेऊन दुचाकीवरून जात होता. तो गुरुनानक चौकात आल्यानंतर अचानक समोरील वाहनाच्या चालकाने ब्रेक लावल्याने फतेसिंग चालवित असलेली दुचाकी त्या दुचाकीला धडकली. यात रोहितच्या डोक्याला जखम झाली तर फतेसिंगच्या छातीला मार लागल्याने जिल्हा महिला रुग्णालयात ते दोघे उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## मरिआई चौक भाजी मंडईतील विक्रेत्यांना आवश्यक त्या सोयीसुविधा द्याव्यात

### राष्ट्रवादी महिला आघाडीची मागणी

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ जुलै-**

मरिआई चौक चौक येथील भाजी मंडईतील विक्रेत्यांना आवश्यक त्या सोयीसुविधा देण्यात याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष महिला आघाडीच्यावतीने करण्यात आली आहे.

याबाबत आघाडीच्यावतीने उत्तर विधानसभा महिला अध्यक्षा सुनीता दळवी यांच्या नेतृत्वाखाली मनपाचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनाद्वारे प्रभाग क्रमांक सहामधील मरिआई चौक भाजी मंडईतील कोपऱ्यांमध्ये गवत व कचरा साचला असून परिसरातील फरश्या आणि सिमेंट निघालेले आहे. महिला व पुरुषांसाठी स्वच्छतागृहांची सोय गरजेचे आहे. तसेच भाजी विक्रेत्यांना ऊन, वारा व पावसापासून संरक्षण होण्यासाठी पत्राशेड उभारण्यात यावा, येथील हातपंप बंद असल्याने भाजी विक्रेत्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय केली जावी, उजेडासाठी मर्क्युरी बसविण्यात यावी. दररोज त्यांच्याकडून कर वसुली करून त्यांच्यासाठी आवश्यक सोयीसुविधा द्याव्यात यासह विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या शिष्टमंडळात कांचन जाधव, मोनाक्षी जाधव, उमा केत, सखूबाई जाधव, मंगल घोडके, कुसूम लुगडे, श्वेता फुलसागर, कांता इंगोले यासह भाजीविक्रेत्या महिलांचा समावेश होता.

## झेडपी प्रारूप प्रभाग रचनेवर १९ हरकती

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ जुलै-**

जिल्हा प्रशासनाने जिल्हा परिषद पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १४ जुलै रोजी प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध केल्यानंतर त्यावर २१ जुलैपर्यंत १९ हरकती प्राप्त झाले आहेत. त्यावर आता ११ ऑगस्टपर्यंत सुनावणी होऊन १८ ऑगस्ट ऑगस्ट रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध केली जाणार आहे.

बार्शी तालुक्यातून घारी गाव पांगरीजवळ असताना काटी गणात समावेश केल्याबाबतचा हरकत आली आहे. वीट गटातून विहाळ गाव कमी करून झरे गावाचा समावेश करावा. खेड हे गाव कोंडी गटात न करता बीबीदारफळ गटात समाविष्ट करण्याबाबत हरकती आल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या ६८ गट रचनेचा पंचायत समितीचा १३६ गण रचनेसाठी प्रारूप आराखडा प्रसिद्ध करण्यात आला आहे. यात सांगोला, मंगळवेढा व अक्कलकोट तालुक्यातून एकही हरकत आलेली नाही. माळशिरस, माढा, उत्तर सोलापूर तालुक्यातून प्रत्येक १ तर मोहोळ, पंढरपूर तालुक्यातून प्रत्येकी दोन, करमाळा तालुक्यातून ८, बार्शी, दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्रत्येकी दोन असे एकूण १९ हरकती प्राप्त झाल्या आहेत. जिल्हा प्रशासनाने प्रसिद्ध केलेल्या गट व गणरचनेच्या प्रारूप प्रसिद्धी हरकतींवर सुनावणी घेऊन अंतिम गटरचना प्रसिद्ध केले जाणार आहेत. अंतिम गट आणि गण रचनेसाठीच्या मंजुरीसाठी विभागीय आयुक्तांकडे पाठविले जाणार आहेत.



## एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेत लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ जुलै-**

एन.ए.बी. संचलित एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेत लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष अंधकार्यशाळेचे अधिक्षक रामचंद्र कुलकर्णी सर हे होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नॅब संस्थचे उपाध्यक्ष अंकुश कदम उपस्थित होते. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक प्रिती सितारे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांनी लोकमान्य टिळक यांच्या यांच्या जीवनाचे सार अभ्यासपूर्वक विद्यार्थ्यांसमोर मांडले.

रामचंद्र कुलकर्णी यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये लोकमान्य टिळकांचे शैक्षणिक व राजकीय वाटचाली विषयी माहिती दिली. दिपांजली केसकर व प्रकाश काळे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमासाठी रियाज मुल्ला सर व आकांक्षा भंडारे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन शिवकुमार पाटील यांनी केले. तर आभार शिवशरण गडदुरे यांनी केले. कार्यक्रमासाठी शुभम वांझरे व संदेश कांबळे यांचे सहकार्य लाभले.

## सर्कसमध्ये काम करणाऱ्या महाराष्ट्रातील कलावंताना केरळच्या धर्तीवर अनुदान मिळावे

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ जुलै-**

केरळ च्या धर्तीवर महाराष्ट्रातील सर्कस मध्ये काम करणाऱ्या कलावंताना राज्य शासनाकडून अनुदान मिळावे अशी मागणी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडे सोशल मीडिया विभागाचे शहराध्यक्ष वैभव गंगणे निवेदनाद्वारे केले आहे.

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे हे स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर दौऱ्यावर आले होते . शहर - जिल्हाध्यक्ष संतोष पवार व कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली सोशल मीडिया विभागाचे शहराध्यक्ष वैभव गंगणे यांनी सुनील तटकरे यांना महाराष्ट्रात एकमेव राहिलेली राजकमल



सर्कस मधील कलावंताना केरळ च्या धर्तीवर महाराष्ट्रातही राज्य शासनाकडून अनुदान मिळण्याबाबत निवेदन दिले.

समाज घटकातील महत्वाचा घटक ''कलाकार'' हे जीवनातील सर्व सुख दुःख बाजूला ठेवून आपल्या कला शैलीतून समाजाला नेहमी आनंदी ठेवत असतात. काम असेल तेव्हाच चार पैसे या कलाकारांच्या पदरात पडतात. इतर वेळेस या कलाकारांना हाताला काम मिळत नसल्याने त्यांच्यावर उपास मारीची वेळ येते. कौटुंबिक उदर निर्वाहाचा प्रश्न अशा वेळी मुख्यत उपस्थित होतो. केरळ मध्ये असणाऱ्या सर्कस मधील कलावंताना त्यांच्या सरकारकडून अनुदान मिळते त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील सर्कस मध्ये काम करणाऱ्या गरजू कलावंताना राज्य शासनाकडून तत्काळ अनुदान मिळवून देऊन या कलावंताना न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली.

## कला व संगीत शिक्षक पदे न भरण्याच्या निर्णयाचा शासनाने पुनर्विचार करावा

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ जुलै-**

कला व संगीत शिक्षक पदे न भरण्याचा घेतलेल्या निर्णयाचा राज्य शासनाने पुनर्विचार करावा, अशी मागणी निवृत्त कला शिक्षक शशिकांत सदाफुले यांनी केली आहे.

चित्रकला शिक्षकांचे पदे पवित्र पोर्टलवरून वगळल्याचे कळते. नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे विद्यार्थ्यांना शिक्षण हे आनंददायी वाटले पाहिजे असा एक उद्देश आहे. त्यासाठी आठवड्यातून एक दिवस शनिवार विना दप्तर शाळा घेतली जाते. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम त्यामध्ये हस्तकला, चित्रकला, खाद्य संस्कृती, बाजारहाट, विविध क्रीडा प्रकार, विविध स्पर्धा गुणांना वाव देण्यासाठी विशेष विषय ठेवलेला आहे. यातून शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थी कोणत्या खेळात किंवा कोणत्या कलेत कसा पारंगत आहे याचे निरीक्षण व परीक्षण करता येते. मात्र, आज मोजक्याच शाळेमध्ये कलाशिक्षक वावरत असताना दिसतात. ज्या शाळातून कलाशिक्षक सेवानिवृत्त झाले आहेत अशा ठिकाणी गेली २० वर्षे कलाशिक्षक नसल्याने पालक व विद्यार्थ्यांची मोठी तारांबळ झालेली आहे. सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय रेखा कला परीक्षा (elementary, Intermediate grade exam) असते. त्याचा स्वतंत्र अभ्यासक्रम असतो. जून ते सप्टेंबर पर्यंत हा अभ्यासक्रम पूर्ण करायचा असतो. या परीक्षा कला संचालनालय मुंबई यांच्या वतीने घेतल्या जातात.

या प्रमाणपत्राला अनन्य साधारण महत्त्व आहे आणि शासन मात्र आपल्या निर्णयावर गेल्या वीस वर्षापासून कलाशिक्षक न भरण्यावर ठाम आहेत. यावरून शासनाचे नेमके कला शिक्षकांविषयी अथवा कला विषयाबाबत संभ्रम अवस्था आहे.

या धोरणामुळे आज चित्रकलेचे महाविद्यालयीन शिक्षण अर्थात फाउंडेशन, ए.टी.डी., जी. डी. आर्ट, फाईन आर्ट, यासारखे अनेक डिप्लोमा डिग्री कोर्सेस याकडे पालक व विद्यार्थ्यांचा कलेविषयी कल दृष्टीकोन बदलत आहे. त्यामुळे अनेक महाविद्यालय ओस पडत आहेत. त्यामुळे हे कोर्सेस बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. तरी शासनाने कला व संगीत शिक्षक पदे न भरण्याचा घेतलेल्या निर्णयाबद्दल पुनर्विचार करावा.



## पाल्यांनी नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने प्रगती करावे

### उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव; गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ जुलै-**

यश संपादन करण्यासाठी पैसा खर्च करून पुणे येथेच गेले पाहीजे असे नाही. सोलापूर शहरातही प्रयत्न व चिकाटीने अभ्यास करून मोठे ध्येय ठेवले तर यश निश्चित मिळते गुणवंत पाल्यांनी एआय नवीन तंत्राचा अवलंब करून आपली प्रगती केली पाहीजे. पालक आपल्या पाल्यास सुविधा देण्यात कमी पडत नाहीत. त्यामुळे पाल्यांनी नवीन व जुन्या दोन्ही पिढीतील सुवर्णमध्य साधला पाहिजे, असे मत अमोल जाधव यांनी मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार सभारंभ यशवंतराय सभागृहात जिल्हा परीषदेचे पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम क्रमांक एकचे कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, जलसंधारण अधिकारी

एच.सी. सपताळे, पतसंस्थेचे चेअरमन डॉ. एस. पी. माने संचालक विष्णु पाटील , शहाजहान तांबोळी, श्रीधर कलशेटटी, तजमुल मुतवल्ली, विजयकुमार घेरडे, विशाल घोगरे, गजानन मारडकर, शिवानंद म्हमाणे, शिवाजी राठोड, किरण लालवोंदे, विकास शिंदे, चेतन वाघमारे, मृणालिनी शिंदे, स्वेता राऊत तज्ञ संचालक श्रीशैल देशमुख, नितीन शिंदे , सचिव डी. एल. देशपांडे , लेखनिक अशोक पवार, सुभाष काळे, नितीन येमुल, विनोद कदम आदी उपस्थित होते. संस्थेचा हा कार्यक्रम पाल्याना ऊर्जा देणारा असल्याचे मत महिला व बाल कल्याण विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी व्यक्त केले.

यावेळी दहावीच्या २३ व बारावीच्या चार पाल्यांचा फाईल, प्रमाणपत्र, सन्मान चिन्ह व रोप देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र लोक सेवा आयोग यांच्या मार्फत घेतलेल्या परिक्षेमध्ये राज्यात मुलीमध्ये प्रथम कमांकाने उत्तीण झालेल्या वैष्णवी राम गायकवाड हीचा प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन विष्णू पाटील यांनी केले. तर आभार नितीन शिंदे यांनी मानले.

## नवीन पीक विमा धोरणाचा निषेध, काँग्रेसच्या तालुकाध्यक्षांनी दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ जुलै-**



सरकारच्या वतीने शेती पिकांना दिली जाणारी एक रुपयात दिली जाणारी पीक विमा योजना बंद केली असून यंदापासून नवीन पीक विमा योजना जाहीर केली आहे. शेतकऱ्यांकरीता लागू करण्यात आलेल्या नवीन पिक विमा धोरणामधील जाचक अटी रद्द करून पूर्वीप्रमाणे पिक विमा योजना राबविण्यात यावा यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांच्या वतीने काँग्रेस पक्षाच्या सर्व तालुका अध्यक्षांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयास निवेदन दिले. निवेदनाद्वारे खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांकरीता लागू करण्यात आलेल्या नवीन पिक विमा योजनेतील खालील जाचक अटी रद्द होण्याकरीता पूर्वी प्रमाणे सर्व शेतकऱ्यांचा १ रुपयाप्रमाणे विमा भरुन घ्यावा. नुकसानीचे ४ ट्रिगर रहावे. तसेच डिजिटल कचाट्यात अडकलेले शेतकरी Farmer ID, e-Peek अँप, आधार, बँक खाते सगळं लिंक असावं लागतं. यामध्ये मोबाईल अॅप मध्ये चूक झाली तर विमा रद्द होतो. बँकेने वेळेवर पैसे वळते केले नाहीत तर विमा रद्द होतो. कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांनी विम्यातून बाहेर पडायचं असल्यास ७ दिवस आधी opt-out फॉर्म भरावा लागतो. ही सर्व प्रक्रिया सामान्य, वयोवृद्ध शेतकऱ्याला अशक्य आहे. आदी मागण्या केल्या. यावेळी मोहोळ तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुलेमान तांबोळी, मंगळवेढा तालुका अध्यक्ष प्रशांत साळे, उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष भारत जाधव, अक्कलकोट तालुका अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, मंगळवेढा शहर अध्यक्ष राहुल घुले, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेश पवार, पंढरपूरचे संदीप पाटील उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

## संतशिरोमणी सावता महाराजांचा संजीवन समाधी सोहळा वेळापुरात साजरा



**वेळापूर, दि. २४ जुलै-**
वेळापूर येथे संतशिरोमणी सावता महाराज यांचा ७३० वा संजीवन समाधी सोहळा मोठ्या श्रद्धा व भक्तीभावाने साजरा करण्यात आला. सकाळी ७.०० वाजता ब्रह्म वृदांच्या मंत्रोचारात श्रीमूर्तीस अभिषेक घालण्यात आला. सकाळी १० ते १२ या वेळेत हभप किशोर म हाराज लोखंडे यांचे संत सावता महाराज यांच्या जीवनावर अध्यात्मिक सुश्राव्य कीर्तन करून संतांच्या विचारांचा व जीवनातील अध्यात्मिक संदेशांचा जागर घडवला. त्यांच्या कीर्तनाला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दुपारी १२ वाजता समाधीस्थळी पुष्पृष्टीचा कार्यक्रम होऊन आरती करण्यात आली. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या निमित्ताने मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच मंदिर परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रम वेळेत माजी आमदार राम सातपुते, वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे यांच्यासह मान्यवरांनी संत सावता महाराज यांच्या मूर्तीचे दर्शन घेतले. कार्यक्रम पार पाडण्यासाठी वेळापूर येथील माळी समाज बांधवांनी परिश्रम घेतले. अशी माहिती सावता परिषद प्रदेश उपाध्यक्ष महादेव ताटे यांनी दिली.




## कुसमोड येथे रेशीम उद्योग कार्यशाळेचे आयोजन

**पिलीव दि २४ जुलै-**
कुसमोड (ता. माळशिरस) येथे जिल्हा रेशीम कार्यालय व माळशिरसच्या श्री लक्ष्मी रेशीम प्रोड्युसर कंपनीच्या वतीने एकदिवसीय रेशीम उद्योग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेस प्रमुख पाहुणे म्हणून बेंगळुरु रेशीम मंडळाचे शास्त्रज्ञ डॉ. रेवणणा यांचे मार्गदर्शन लाभले. सोलापूर येथील रेशीम कार्यालयाचे प्रमुख विनीत पवार यांनीही उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. सोलापूर येथे रेशीम मार्केट सुरू करण्याचे आश्वासन दिले. यावेळी श्रेत्रीय रेशीम अधिकारी बाळासाहेब सुर्यवंशी यांनीही मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन संचालक राहुल रजपुत यांनी केले. यावेळी सरपंच शहाजी लेंगरे, कृषीभूषण शेतकरी जगन्नाथ मगर, संचालक प्रदीप बगाडे, गोपाळ माळी, अस्मीत काटे, सुनिल सोलंकर, माजी सरपंच तुषार लवटे, धनाजी पाटील, जिल्हा नियोजन समिती विभागाचे दादासाहेब खाडे, सतिश व्होनमाने, विश्वास धायगुडे, अणणासो शिकारे, जगदीश गायकवाड, मेटकरी, लक्ष्मण देवकते, विशाल बोडरे उपस्थित होते.



## भगवंत तरुण गणेश मंडळाच्यावतीने शालेय साहित्य वाटप

**बार्शी, दि. २४ जुलै-**
महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त भगवंत तरुण गणेश मंडळ, श्रीकृष्ण परिवार व रेणुका उद्योग समूह यांच्यावतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याच वाटप करण्यात आले. यावेळी श्रीकृष्ण परिवाराचे सर्वेसर्वा अस्मित कुलकर्णी, रेणुका उद्योग समुहाचे प्रमुख सूर्यकांत देशमुख, पंढरपूर बँकेचे शाखा अधिकारी विशाल तपकीरे, भारतीय जनता पार्टीचे माजी शहराध्यक्ष अश्विन गाढवे आणि श्रीकृष्ण परिवार, रेणुका उद्योग समूह यांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## दुचाकी घसरल्यामुळे काळमवाडी येथील अशोक जानकर यांचा मृत्यू

**पिलीव दि २४ जुलै-**



माळशिरस तालुक्यातील काळमवाडी येथील अशोक दगडु जानकर यांचा पिलीवहून काळमवाडी गावाकडे दि. २० जुलै रोजी रात्री दहा वाजता जात असताना दुचाकी घसरुन खड्डयात पडल्यामुळे अपघाती मृत्यू झाला. ते ५५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक बंधु, पुतणे असा परिवार आहे. त्यांना उपचारासाठी अकलुज येथील दवाखान्यात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले. त्यांच्यावर काळमवाडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करणयात आले. घडलेल्या घटनेची माहीती मयताचे भाऊ बबन जानकर व माजी सरपंच दादासाहेब शिंगाडे यांनी पिलीव पोलीस ठाणयास दिली. घटनास्थळी जाऊन पंचनामा हवालदार पंडीत मिसाळ यांनी केला .तर सदरच्या घटनेचा अधिक तपास माळशिरस पोलीस ठाणयाचे पोलीस निरीक्षक विकास दिंडोरे यांच्या मार्गदशनाखाली हवालदार मरळे हे करीत आहेत.

## यावली पाटी येथे चक्काजाम आंदोलन



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ जुलै-**
शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफी आणि माजी मंत्री बच्चू कडू यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या यावली शाखेतर्फे दि. २४ जुलै रोजी सकाळी १० वाजता वैराग-माढा रोडवरील यावली पाटी येथे चक्काजाम आंदोलन पार पडले. बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखालील या आंदोलनात शेतकरी, शेतमजूर आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

यावेळी वैराग-माढा रोडवरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. संभाजी ब्रिगेडच्या यावली शाखेचे प्रमुख शिवश्री आनंद काशीद यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन शांततापूर्णपणे पार पडले. शेतकऱ्यांच्या कर्जमाफी, शेतमालाला हमीभावापेक्षा २० टक्के जास्त प्रोत्साहन रक्कम आणि दिव्यांग-विधवांसाठी ६,००० रुपये मासिक अनुदानाच्या मागण्या पुन्हा एकदा सरकारसमोर मांडण्यात आल्या. गेल्या महिन्यात बच्चू कडू यांनी याच मागण्यांसाठी आमरण उपोषण केले होते, परंतु सरकारने अधिवेशनात दिलेल्या आश्वासनांवर कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.

आंदोलनादरम्यान स्थानिक प्रशासन आणि वैराग पोलिसांना निवेदन देण्यात आले होते, त्यानुसार पोलिसांनी योग्य बंदोबस्त ठेवला होता. शेतकऱ्यांचे प्रश्न तातडीने सोडवले नाहीत तर सरकारला यापेक्षा तीव्र आंदोलनाला सामोरे जावे लागेल, असे शिवश्री आनंद काशीद यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी गावागावांत जनजागृती सुरु असून, भविष्यातही अशी आंदोलने तीव्र होऊ शकतात, असे आयोजकांनी स्पष्ट केले.



## चिखर्डेत शेतकऱ्यांनी केले रास्ता रोको आंदोलन

### कर्जमाफी व पीकविमा मिळण्याचे दिले निवेदन

**बार्शी, दि. २४ जुलै**
बार्शी तालुक्यातील चिखर्डे येथे बार्शी-धाराशिव रस्त्यावर शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांचे नेतृत्वाखाली सुमारे एक तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी कर्जमाफी द्यावी व पीकविमा मिळावा याबाबतचे निवेदन देण्यात आले.

मागील थकीत पिकविमा तात्काळ देऊन, पीक विम्याचे राज्य प्रमुख विनय आवटे यांच्या संपत्तीची तसेच सर्व कंपन्यांची त्यांचे स्थापनेपासून न्यायालयीन चौकशी करा, शेतकऱ्यांना कर्जमुक्ती द्या, लातूर येथे आंदोलकाला मारहाण केलेल्या गुन्हेगारांवर तसेच मंत्री सुनील तटकरे व कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे सी.डी.आर. तपासून त्यांचेवरही गुन्हे नोंदवा, समान काम समान वेतन कायद्याची अंमलबजावणी करा, दिव्यांग व विधवांच्या मानधनात वाढ करा, जनसुरक्षा विधेयक तत्काळ रद्द करा आदी मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. मागण्यांची पूर्तता लवकरात लवकर न झाल्यास जिल्हा व राज्यस्तरीय अधिकाऱ्यांची कार्यालये, पिकविमा कंपन्या, संबंधित मंत्र्यांच्या घरासमोर तसेच मंत्रालयावर आंदोलन करणार असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

या आंदोलनात तालुकाध्यक्ष शरद भालेकर, उपाध्यक्ष प्रशांत काळदाते, दिगंबर रणखांब, रामभाऊ काटे, काकासाहेब गलांडे, अभिजीत शिंदे, पप्पू कोंढारे, गजानन शाखापुरे, नितीन कोंढारे, यशवंत मोरे, ज्ञानदेव कोंढरे, रघुनाथ कोंढारे, प्रकाश उकिरडे, महेंद्र गलांडे, रामहरी पेजगुडे, सुनील अडसूळ, राहुल कोंढारे, संभाजी भोसले, मामासाहेब ढवळे, बालाजी निंबाळकर आदींसह पंचक्रोशीतील बहुसंख्य शेतकरी व महिला उपस्थित होत्या. मागण्यांचे निवेदन तहसीलच्या प्रतिनिधी, नारीच्या मंडळाधिकारी एम.व्ही. राजपूत यांना देण्यात आले तर या आंदोलनाचा चोख पोलीस बंदोबस्त पांगरी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक राजकुमार यावलकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी ठेवला होता.

## साई ट्रस्ट हे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणारे ऊर्जापीठ : डॉ. पाटणे



**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २४ जुलै-**
श्री साई चॅरिटेबल ट्रस्ट हे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणारे ऊर्जापीठ आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ व्याख्याते प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांनी केले.

सासुरे वैराग येथील श्री साई चॅरिटेबल ट्रस्टच्या १९ व्या वर्धापनदिन आणि धाराशिवचे अतिरिक्त आयुक्त त्रिंबक ढेंगळे-पाटील यांच्या अभिष्टचिंतन कार्यक्रमात डॉ यशवंत पाटणे बोलत होते.

अध्यक्षस्थानी ट्रस्टच्या अध्यक्षा मीरा सूर्यवंशी होत्या. डॉ. पाटणे म्हणाले, तारुण्याचा काळ आयुष्याला सुंदर आकार देण्याचा असतो. शिल्पकार जसा दगडातून मूर्ती घडवतो तसे शिक्षण संस्थानी विद्यार्थ्यातून उद्याची ज्ञानरत्ने घडवली पाहिजेत आणि हेच काम त्रिंबक ढेंगळे पाटील पती पत्नी साई चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून करीत आहेत, असेही डॉ यशवंत पाटणे यांनी यावेळी सांगितले. यावेळी त्रिंबक ढेंगळे-पाटील यांचा इंदिरा डिप्लोमा कॉलेज प्राचार्य डॉ. डी.आर.पिसाळ, साई आयुर्वेद मेडिकल कॉलेज प्राचार्य डॉ. साहेबराव गायकवाड, साई होमिओपॅथी मेडिकल कॉलेज प्राचार्य डॉ. अशोक अनपट, साई आयटीआयचे प्राचार्य श्यामवर्धन गोवर्धन आदींनी सत्कार केला. यावेळी गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.तत्पूर्वी श्री साई चॅरिटेबल ट्रस्टच्या १९ व्या वर्धापन दिनानिमित्त साई होमिओपॅथी मेडिकल कॉलेजमध्ये रक्तदान शिबिर झाले. शिबिराचे उद्घाटन डॉ यश ढेंगळे-पाटील यांच्या हस्ते झाले. साई आयुर्वेद मेडिकल कॉलेजमध्ये सर्व रोग निदान शिबिर झाले. त्याचे उद्घाटन वैरागचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांचे हस्ते झाले. विद्यार्थिनीसाठी बांधण्यात येणाऱ्या वसतिगृह क्रमांक तीनचे भूमिपूजन धाराशिवचे अतिरिक्त आयुक्त ढेंगळे-पाटील, डॉ.यशवंत पाटणे, पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, डॉ.मीरा सूर्यवंशी आदीच्या हस्ते झाले. त्यानंतर साई कॉलेज ते राळेरास या मार्गाच्या दुतर्फा डॉ. मीरा सूर्यवंशी आणि प्राचार्य डॉ. साहेबराव गायकवाड यांचे हस्ते वृक्षारोपण झाले. डॉ.अशोक अनपट यांनी प्रास्ताविक केले तर प्राचार्य डॉ. डी.आर.पिसाळ यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. शेवटी प्राचार्य श्याम गोवर्धन यांनी आभार मानले.सूत्रसंचलन प्रा.समाधान गायकवाड यांनी केले. सर्व कार्यक्रमांचे संयोजन अनंत देशमुख, दशरथ शिंदे, भैय्या देशमुख, डॉ श्रेयस शिंदे, डॉ.सपना मलमे, डॉ प्रशांत गवळी आदींनी केले.



## के. एल. ई. स्कूलमध्ये 'शक्ती पथक गौरव' समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जुलै-**
के. एल. ई. इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ग'वूमन सेल'तर्फे इयत्ता दहावीच्या शक्ती पथकाच्या सदस्यांचा तसेच इयत्ता नववीच्या प्रिफेक्ट्सचा गौरव समारंभ पत्रकार अश्विनी अमीत तडवळकर तसेच सोलापूर पोलीस आयुक्तालयातील वूमन सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वाती बालकृष्ण येले यांच्या हस्ते झाला.

प्राचार्य सतीश हिरेमठ व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिकचिन्ह देऊन विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या प्रेरणादायी भाषणांनी विद्यार्थ्यांना स्फूर्ती मिळाली व त्यांचा आत्मविश्वास अधिकच बळावला. विद्यार्थ्यांमध्ये आत्म विश्वास, स्वयंरक्षणाची जाणीव आणि जबाबदारीची भावना वाढवण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी नव्या जोमाने शाळेतील सुरक्षितता आणि शिस्तीच्या मूल्यांना प्राधान्य देत शक्ती पथकाच्या कार्यात योगदान देण्याचा संकल्प केला. यासाठी विद्यार्थ्यांना प्राचार्य हिरेमठ यांनी मार्गदर्शन केले.

## पिलीव परिसरात पुष्य नक्षत्रातील पावसामुळे पिकांना जिवदान

**तभा वृतसेवा,**
**पिलीव दि २४- जुलै-**
माळशिरस तालुक्यासह पिलीव परीसरात गेल्या दोन दिवसांपासून पुष्य या नक्षत्रातील झालेल्या पावसामुळे खरीप हंगामातील पिकांना जिवदान मिळाले आहे. पिलीवसह सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी यासह पश्चिम भागातील गावात पावसामुळे दीड महीना दडी मारल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांनी पेरलेली, बाजरी, मका, कडवळ व इतर पिके पाणयाअभावी धोकयात आली होती. अक्षरशः ही पिके शेवटची घटका मोजत होती.शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागते काय या विवंचनेत शेतकरी होते.पण गेल्या दोन - तिन दिवसात पावसाने हजेरी लावल्यामुळे खरीपातील पिकांना जिवदान मिळाले असुन दुबार पेरणीचे संकट तात्पुरते तरी टळले आहे. या भागात यंदा मे महीन्यातच समाधानकारक पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांनी चांगली मशागत करुन खतांचा वापर करुन पिके जोमदार आणली आहेत. पण पावसाने तब्बल दीड महीना दडी मारल्यामुळे शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत होता. तो पाऊस अक्षरशः दीड महीन्याने का होईना बरसला यामुळे शेतकऱ्यांच्या खरीपाच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

> बचेरी परिसरात गेल्या दीड महीन्यांपासून पावसाने दडी मारल्यामुळे खरीप हंगामातील पिके धोकयात आली होती.पण गेल्या दोन-तीन दिवसांपासून पडलेल्या पावसामुळे खरीप हंगामातील पिकांना जिवदान मिळाले आहे.
> **- राणी गोरड,** सरपंच बचेरी.

## मंद्रुपच्या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम

**सोलापूर, दि.२४ जुलै-**
येथील संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यायाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त उपक्रम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २६ जुलै ते १ ऑगस्टदरम्यान होणाऱ्या सप्ताहात महाविद्यालयाचा वर्धापन दिन व विद्यार्थ्यांचे स्वागत,प्रभात फेरी, सर्वरोग निदान शिबिर, वक्तृत्व स्पर्धा, वृक्षारोपण व व्याख्यानाने समारोप करण्यात येईल. यामध्ये शनिवार, दि. २६ रोजी महाविद्यालयाचा वर्धापन दिन, व प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ सोमवार दि. २८ रोजी मंद्रुप गावातून प्रभात फेरी काढण्यात येईल. मंगळवार दि. २९ रोजी महाविद्यालयात सोलापूर येथील डॉ. स्मित जानराव यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात येणार आहे. बुधवार दि.२० रोजी महाविद्यालयात तालुकास्तरीय तायक्वांदो स्पर्धा घेण्यात येणार आहेत. गुरुवार दि. ३१ रोजी तालुकास्तरीय कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली आहे. शुक्रवारी दि. १ ऑगस्ट रोजी विद्यापीठ वर्धापन दिन कार्यक्रम, वृक्षारोपण करण्यात येईल व प्रा. एम आर कांबळे यांच्या व्याख्यानाने सप्ताहाचा समारोप होणार आहे. तरी कार्यक्रमास माजी विद्यार्थी, पालकांनी उपस्थित राहावे, असे प्राचार्य डॉ. एम. एन. जगताप व मुख्य समन्वयक प्रा. डॉ. जवाहर मोरे यांनी केले आहे.

## श्रावणमासानिमित्त वटवृक्ष मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि.२४ जुलै**
यंदाच्या श्रावणमासा निमित्त येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी दिली.

श्रावणमासातील शुक्रवार दि. २५ जुलै ते गुरुवार दि. ३१ जुलै अखेरच्या पहिल्या सप्ताहात हभप श्रीहरी महाराज रसाळ (अंबड) जि.जालना यांच्या वाणीतून भागवत कथा सप्ताहाचे, शुक्रवार दिनांक - १ ऑगस्ट ते शुक्रवार दिनांक - ८ ऑगस्ट अखेरच्या दुसऱ्या सप्ताहात हभप श्री. म नोहर महाराज घोरपडे (महालिंगरायवाडी, उस्मानाबाद) यांचे गीता पठण सप्ताहाचे रविवार दि. १० ऑगस्ट ते शनिवार दि.१६ ऑगस्ट अखेरच्या तिसऱ्या सप्ताहात ह.भ.प. योगीराज महाराज प्रकाश गोंदीकर (श्री क्षेत्र गोंदी) जि.जालना यांचा गोकुळ अष्टमी व गोपाळकाल्या निमित्त कीर्तन सेवेचे, रविवार दि.१७ ऑगस्ट ते शनिवार दि.२३ ऑगस्ट अखेरच्या श्रावण मासातील शेवटच्या सप्ताहात वसई येथील ह.भ.प. श्री.प्रदीप पाठक यांच्या नारदीय किर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. वरील सर्व कार्यक्रम नियोजीत तारखेस व वेळेवर देवस्थानच्या ज्योतीबा मंडपात दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत संपन्न होणार आहेत. श्रावण मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक कार्यक्रमांचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर विश्वस्त समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी केले आहे.

> श्रावण मासातील प्रत्येक श्रावण सोमवारी नित्यनियमाने होणारी श्री स्वामी समर्थांची नैवेद्य आरती सकाळी ११:३० वाजता न होता सायंकाळी ५:३० वाजता होईल, व आरतीनंतर देवस्थानकडून प्रसाद वाटप करण्यात येईल. तद्नंतर त्यादिवशी रात्रीची शेजारती होणार नाही याची सर्व भाविकांनी नोंद घ्यावी.



## पिलीव येथे सावता माळी यांची पुण्यतिथी साजरी

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. २४ जुलै-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे संत शिरोमणी सावता माळी यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी श्री संत सावता माळी जाधवस्ती येथील मित्र मंडळाच्यावतीने विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अरण येथून युवा कार्यकरत्यांनी पेटती ज्योत आणली. या ज्योतीचे स्वागत बसस्थानकावर माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश पाटील, भाजपाचे माळशिरस मंडल अध्यक्ष नितीन मोहीते, शहराध्यक्ष प्रमोद भैस, ॲड. सत्यजित गलांडे यांनी स्वागत केले.

पिलीव येथे विठ्ठल-रुक्मिणी मंदिरासमोर गझीढोलाचे आयोजन करण्यात आले होते. याठिकाणी माळशिरस तालुक्याचे लोकप्रिय माजी आमदार राम सातपुते यांच्या हस्ते महाआरती करण्यात आले. याठिकाणी मंदिरात भजनाचे आयोजन करण्यात आले होते.नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच जाधवस्ती याठिकाणी माळशिरस तालुक्याचे लोकप्रिय माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या हस्ते महाआरती करणयात आली. यावेळी भाजपचे माळशिरस मंडल अध्यक्ष नितीन मोहीते, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील, प्रमोद भैस तसेच माळी ब्रिगेडचे अध्यक्ष बाजीराव जाधव, रणजित जाधव, गणेश पिसे, सिद्धेश्वर जाधव, अजिंक्य पिसे, आदीनाथ जाधव, संदीप जाधव,सौरभ जाधव, दिपक जाधव, अमित पिसे, किशोर जाधव, अण्णा जाधव, निखील जाधव, अरविंद जाधव, बिरुदेव जाधव, अशोक जाधव, राजू पिसे, शहाजी पिसे, निखील फुले, विशाल हुबाले यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## श्री वटवृक्ष संस्थेचा वर्धापन दिन साजरा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जुलै-**
सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आरोग्य, पर्यावरण या क्षेत्रांत आणि गोर गरीब गरजू संकटग्रस्तासाठी काम करणारी श्री. वटवृक्ष बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचा पाचवा वर्धापन दिन येथील धनश्री हॉटेलमध्ये विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

तहसीलदार श्रीकांत पाटील, आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अजित लकडे, विजापूर नाका पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सुशांत वराळे साहेब, आदिवासी विकास सेवा विभाग अधिक्षक राघवेंद्र हिरापुरे यांच्या हस्ते गोर गरीब अनाथ विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्चासाठी आर्थिक मदत करण्यात आली. मान्यवरांचे श्री.पंचाक्षरी विद्यामंदिर विंचूर येथील विद्यार्थिनींनी भरतनाट्य नृत्य सादरीकरण करून स्वागत केले. संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल चडचण यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानंद बगले यांनीस केले. नागेश फुलारी यांनी आभार मानले.

> **सत्कारमूर्ती व पुरस्कार्थी असे**
> आदर्श गुरुवर्य पुरस्कार : निलप्पा जवळकोटे, तुळशीराम शेतसंदी. यशस्वी उद्योजक पुरस्कार : जगदेवप्पा पाटील(ओम साई इंटरप्रायजेस), शिवराज कालदे (समर्थ मोबाईल शॉपी), महादेव दिंडोरे. गुणवंत विद्यार्थी : अंकिता बगले, साक्षी बगले, पूजा स्वामी, पल्लवी स्वामी, प्रसाद गुरव. उल्लेखनीय : बसवराज इंडी. धार्मिक कार्य : नामदेव पुकळे

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## 'फॅबटेक'मध्ये अभियांत्रिकी प्रवेशासाठी ऑप्शन्स फॉर्म भरण्यास उद्यापासून सुरुवात

**सांगोला, दि.२३ जुलै-**

पदवी अभियांत्रिकीच्या प्रवेशाकरीता तात्पुरती गुणवत्ता यादी दि.१९ जुलै तसेच अंतिम गुणवत्ता यादी दि. २४ जुलै रोजी शासनाच्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाली आहे. पहिली फेरीचे ऑप्शन फॉर्म भरण्याची प्रक्रिया दि. २६ ते २८ जुलै पर्यंत चालणार आहे.

या कालावधीत फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथे फॅसिलिटेशन सेंटर मध्ये ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची सोय मोफत करण्यात आली आहे. पहिल्या प्रवेश फेरीची अलॉटमेंट यादी अधिकृत संकेतस्थळावर गुरुवार दि. ३१ जुलै रोजी प्रसिद्ध होणार आहे. ज्यांनी पदवी अभियांत्रिकी प्रवेशासाठी कॅप रजिस्ट्रेशन, डॉक्युमेंट्स व्हेरिफिकेशन आणि कन्फर्मेशन केले त्यांना या प्रवेश फेरीचा लाभ घेता येणार असल्याची माहिती संस्थेचे सचिव डॉ.अमित रूपनर यांनी दिली. पहिल्या फेरीच्या जागा वाटपानंतर विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन दि.१ ते दि.३ ऑगस्ट रोजी सायं.५ वा. पर्यंत आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरून प्रवेशाची निश्चिती करावी लागणार आहे. प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंगच्या प्रवेशासंदर्भात काही अडचण निर्माण झाल्यास अधिक माहितीसाठी प्रा.राजकुमार गावडे (८४०८८८८५०४), प्रा.आशिष जोशी (९५११८५८३९७) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन कॉलेजच्या वतीने करण्यात आले आहे.



### सिध्देश्वर फाऊंडेशनच्यावतीने श्री क्षेत्र कुमशी येथे पक्षीतीर्थ

**सोलापूर :** श्रीक्षेत्र कुमशी (ता. अफजलपुर, जि. कलबुर्गी, कर्नाटक) येथे श्री दत्त महाराजांचे पवित्र स्थान आहे. याठिकाणी सोलापुरातील श्री सिद्धेश्वर फाऊंडेशनच्या वतीने दोन एकर परिसरात पक्षीतीर्थ निर्माण होत आहे. त्यासाठी वृक्षारोपण करण्यात येत आहे.

## महत्वाचे...

### नोकरी लावतो म्हणून २७ लाखांची फसवणूक; तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २४ जुलै -**

तलाठी पदाची नोकरी लावण्याचे आमिष दाखवून महिलेची २६ लाख ६१ हजार ५०० रुपयांची फसवणुक करणाऱ्या तिघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अंजली सूर्यकांत शिवशरण (वय २८, रा. प्लॉट नं. ४२, चंडक मळा, विश्व नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन गौतम आप्पा शिंदे, सरोज गौतम शिंदे, रीतेश गौतम शिंदे (सर्व रा. उध्दव नगर भाग २, ओम गर्जना चौक, विजापूर रोड, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंजली शिवशरण आणि गौतम शिंदे हे एकमेकांच्या ओळखीचे आहेत. गौतम शिंदे यांनी अंजली शिवशरण यांचा विश्वास संपादन करून त्यांना तलाठी पदाची नोकरी लावण्याचे आमिष दाखविले. शिवशरण यांचा विश्वास संपादन करून शिंदे यांनी १२ एप्रिल २०२३ ते १८ जानेवारी २०२५ या कालावधीत गौतम शिंदे यांनी शिवशरण यांच्याकडून वेळोवेळी रोख व ऑनलाईन स्वरूपात २६ लाख ६१ हजार ५०० रुपये गौतम शिंदे यांची स्वतःच्या, त्यांची पत्नी सरोज शिंदे, मुलगा रितेश शिंदे यांच्या बँक खात्यावर स्विकारले. पैसे देऊनदेखील नोकरी लागत नसल्याचे पाहून शिवशरण यांनी शिंदे यांना पैसे परत देण्याची मागणी केली. त्यावेळी शिंदे यांनी पैसे देण्यासाठी टाळाटाळ केली. त्यावरून आपली फसवणुक झाल्याचे शिवशरण यांच्या लक्षात येताच त्यांनी विजापूर नाका पोलिस ठाणे गाठून याबाबत गुन्हा दाखल केला. पोलिस उपनिरीक्षक पवार पुढील तपास करीत आहेत.

### वैद्यकीय अधिकारी डॉ. घोडके यांचा मनमानी कारभार; कर्मचाऱ्यांचे निवेदन

**सोलापूर, दि. २४ जुलै -**

माळशिरस तालुक्यातील महाळुंग येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. सचेतन घोडके यांनी मनमानी कारभार करून आरोग्य कर्मचार्यांना त्रास देत असल्याने डॉ. शिल्पा राठोड आणि सर्व कर्मचार्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना निवेदन दिली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र महाळुंग येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. घोडके यांच्यामुळे सर्व कर्मचारी यांनी त्रास होत असल्याबद्दल निवेदन दिले होते. तक्रारीची दखल घेऊन कार्यालयाकडून कारवाई न झाल्याने कर्मचाऱ्यांनी आत्महत्या करण्याची वेळ येऊ नये अशी अर्हता साद घातली होती. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे गावपातळीवर मोठ्या प्रमाणात तक्रारी आहेत. डॉ. सचेतन घोडके कर्मचाऱ्यांना दहशतीखाली ठेवण्याचा वेळोवेळी प्रयत्न करीत आहे. कर्मचाऱ्यांची मानसिकता काम करण्याची राहिलेली नसून वारंवार कर्मचारी आत्महत्या करण्याचे विचार करत आहेत. म्हणून डॉ. सचेतन घोडके यांची जिल्हया बाहेर प्रशासकीय बदली करण्यात यावी, असे वरिष्ठ पातळीवर कळविले असून अद्याप कसलीही कार्यवाही झाल्याची आढळून येत नाही. तसेच विभागीय आयुक्त यांना सुध्दा पत्राद्वारे कळविले आहे. तरी सुध्दा न्याय मिळत नाही. आदेशाची अंमलबजावणी होत नसल्यास संघटनेला आंदोलनाचा पर्याय शोधावा लागेल. कर्मचाऱ्यांच्या अडचणी वाढत असून मुजोर वैद्यकीय अधिकारी डॉ. सचेतन घोडके यांच्यावर तात्काळ कारवाई करावे, अन्यथा २८ जुलै रोजी आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र नवनिर्मित नर्सेस संघटनेकडून देण्यात आला आहे.

### चातुर्मासाच्या आगमनालाच फळांची आवक

**सोलापूर, दि. २४ जुलै -**

श्रावण महिना शुक्रवारपासून सुरू होत आहे. यापुढील चातुर्मासाच्या काळातील उपवास, व्रते, आणि सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर फळांची मागणी लक्षात घेत सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फळांची आवक मोठ्या प्रमाणात होत आहे. या महिन्यात आरोग्यस्नेही जीवनशैलीचा भाग म्हणून अनेकजण फळांना प्राधान्य देत असल्याने नाशपती, डाळिंब, सफरचंद, पेरू, पपई, मोसंबी, केळी, अननस आणि सीताफळ यांसारख्या फळांची बाजारात चलती आहे. श्रावण महिन्याच्या आगमनाने बाजारपेठेला उत्साहाचे नवे रूप आले असून, फळांच्या खरेदी-विक्रीला जोरदार चालना मिळाल्याचे चित्र आहे. श्रावण महिन्यात सोमवार, शुक्रवार-शनिवारचे उपवास, शिवपूजा, नागपंचमी, नारळी पौर्णिमा, गोकुळाष्टमी यासारख्या सणांची रेलचेल असते. या पार्श्वभूमीवर उपवासाच्या दिवशी सहज पचणारी व उर्जादायक अशी फळे खाल्ली जातात. यामुळे या महिन्यात सफरचंद, डाळिंब, पेरू, केळी, पपई, मोसंबी यांसारख्या फळांना जास्त मागणी असते. काही ठिकाणी श्रावणात फळांचे नैवेद्यही अर्पण केले जातात. परिणामी फळांना मोठी मागणी असते. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील फळ बाजारात डाळिंबाच्या दररोज सुमारे ५-७ गाड्या बाजारात दाखल होत असून, दर ८० ते १४० रुपये किलोपर्यंत आहेत. तसेच सफरचंदाच्या ५ ते ६ गाड्या रोज येत असून, त्याचे दर ८० ते १८० रु. किलोपर्यंत आहेत. सीताफळही ७० ते ८० रुपये किलो दराने विकले जात आहे.

## श्री क्षेत्र अरणमध्ये रंगला 'श्रीफळहंडी'चा सोहळा

**● संत सावता माळी ७३० वा संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आयोजन ● सुमारे पाच हजार श्रीफळांची हंडी**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २४ जुलै-**

श्री क्षेत्र अरण (ता. माढा) येथे संत शिरोमणी सावता महाराजांचा ७३० वा संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त तुकाराम महाराज यांचे वंशज बाळासाहेब देहुकर महाराज यांच्या हस्ते श्रीफळ हंडी फोडण्यात आली. या सोहळ्याला अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार अभिजीत पाटील, माजी सभापती भारत शिंदे, माजी सभापती शिवाजी कांबळे, रमेश बारसकर, सावता परिषदेचे कल्याणराव आखाडे, मृदुल माळी उपस्थित होते.

ज्ञानोबा-तुकारामांचा जयघोष, टाळ मृदंगाचा गजर आणि वारकऱ्यांच्या उत्साहात श्रीफळ हंडी सोहळा चांगलाच रंगला. सुमारे अर्धा तास चाललेला हा नयनरम्य सोहळा उपस्थितानी याची देहा याची डोळा पाहिला. श्रीक्षेत्र अरण या ठिकाणी सुमारे पाच हजार श्रीफळांची हंडी बांधलेली असते.गिड्डे यांच्या या मानकऱ्यांच्या घरून समारंभपूर्वक हंडी आणून पारावर बांधली गेली. पांडुरंग व सावता महाराजांच्या पालखीसमोर रंगलेल्या या दही-काल्याच्या हंडीभोवती काही श्रद्धेचे नारळ बांधले गेले.ती हंडी फोडून हा सोहळा पार पडतो. पांडुरंगाच्या पालखीचा फडाचा मान आजरेकर परिवार यांचा आहे. संत तुकाराम महाराजांचे वंशज देहूकर कुंटूबातील बापूसाहेब देहूकर, बाळासाहेब देहूकर, कान्होबा देहूकर यांनी श्रीफळ हंडी फोडली. अरण (ता. माढा) येथील संत सावता महाराज संजीवन समाधी मंदिरासमोर हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.बुधवारी दुपारी बारा वाजता श्री विठ्ठल आणि संत सावता महाराज यांच्या पालखीची भेट संजीवन समाधी मंदिर येथे झाली. पुष्पवृष्टी नंतर महाआरती झाली. श्री विठ्ठल पालखीचे अरण शिवारात वाजत गाजत स्वागत झाले. अश्वपूजन करुन जागोजागी रांगोळी, फटाक्यांची आतषबाजी झाली. यावेळी संत सावता माळी महाराज पालखीसमोर देहूकर मंडळींचे किर्तन झाले तर विठ्ठलाच्या पालखीसमोर अरण व परिसरातील भजनी मंडळाने भजन गायले.विठ्ठलभक्तांनी अरण येथे सावता महाराजांच्या समाधीच्या दर्शनासाठी गर्दी केली होती.





महाराष्ट्रातून शेकडो दिंड्या, पालख्यांचा वैष्णव मेळावा पंढरपुरात हजेरी लावत असतो; परंतु कर्मयोगी सावता महाराजांच्या समाधी सोहळ्याला प्रत्यक्ष परमात्मा धावून आल्याने सावता महाराजांनी पेरलेला भक्तीचा मळा भाविकांनी फुलून जातो. श्रीफळ हंडीचा सोहळा डोळ्यात साठवून भाविक धन्य झाले. भक्तांनी व वारकऱ्यांनी वाहिलेले नारळ बांधून ही श्रीफळ हंडी तयार करण्यात येते आणि हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत हा नयनरम्य श्रीफळ हंडी सोहळा श्री संत सावता माळी महाराज यांच्या अरण भूमीत साजरा केला. यावेळी श्रीफळहंडीचे नारळ प्रसाद म्हणून मिळविण्यासाठी तरूणांची धडपड पाहावयाला मिळाली.

हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी भाविकांनी संत सावता माळी परिसर व मंदिरावर, शिवाजी कांबळे यांचे निवासस्थान, ग्रामपंचायत कार्यालय, सभामंडप, यात्री निवास या इमारतींवर गर्दी केली होती.या श्रीफळ हंडी सोहळ्याचे नियोजन संत सावतेबुवा महाराज देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विठ्ठल गाजरे, सचिव विजय शिंदे, विणेकरी पोपट माने, चोपदार उत्तम नागटिळक, बबन चोपदार, भारत सुळ, बालाजी टोणपे, सावता रणदिवे, नितीन सोलंकर, संजय शिंदे, सोमनाथ शिंदे यांनी केले होते. हा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडतो.

### श्रीफळ हंडीचा सोहळा वर्षानूवर्षेची परंपरा

संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पूण्यतिथी निमित्त आयोजित कऱण्यात आलेल्या श्रीफळ हंडीचा सोहळा वर्षानूवर्षे परंपरेने चाललेला आहे. श्रीफळ हंडीचा सोहळ्यासाठी लागणारे हंडीच्या कड्याचे व हंडी फिरवण्याचे मानकरी गिड्डे परिवाराचा असून त्यांच्या घरून डोक्यावरून वाजत गाजत श्री संत सावता महाराज याच्या मंदिराकडे आणले जाते. तसेच हंडी ही श्री संत सावता महाराज मंदिरातून त्या हंडीत दही, भात व लाह्या हे सर्व भरून मंदिरातील पुजारी श्रीफळ हंडीच्या स्थळी आणतात व त्या नंतर गिड्डे परिवाराने आणलेले हंडीचे कडे व हंडी ही एकत्र बांधून मंदीर प्रांगणात पारावरती उभ्या असलेल्या लोखंडी खांबाना बांधली जाते.




## लोकमंगल पतसंस्थतर्फे राजर्षी शाहू महाविद्यालयात वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जुलै-**

हरित सोलापूर समृद्ध सोलापूर या संकल्पनेतून लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था शाखा जुना विडी घरकुल व कर्णिक नगर शाखा यांच्या वतीने राजर्षी शाहू कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात एक पेड माँ के नाम या संकल्पनेतून १० वृक्ष लावण्यात आले.

यावेळी मुख्याधापक उदयसिंग पवार, शिक्षक नाना पटोळे, ज्ञानेश्वर कांबळे, अमिता शिंदे तसेच शाखेचे खातेदार स्वामी भौरम्मा, म्हंताटी अमरनाथ, सल्लागार अंजली हैदळे, जक्कन चंद्रशेखर, शशिकांत दुधगी, मीनाक्षी पाटील, शाखाधिकारी कल्पना आरकेल व तोरणगी सुरेखा उपस्थित होते.

## सहायक अभियंता घाटेंचा जामीन मंजूर

### बनावट बांधकाम फसवणूक प्रकरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ जुलै -**

अधिकार नसताना बनावट बांधकाम परवाने मंजूर करून महापालिकेची २ कोटी ४२ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणीच्या गुन्ह्यात महापालिकेतील सहायक अभियंता शिवशंकर बळवंत घाटे (वय ५६, रा. २७, रेवणसिद्धेश्वर मंदिर जवळ, सोलापूर) यास जिल्हा व सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांनी जामीनावर मुक्तता करण्याचा आदेश दिला.

उपअभियंता, अर्जदारासह अन्य एक सहायक अभियंता व कनिष्ठ लिपिक या चौघांनी संगनमत करून त्यांना अधिकार नसताना बनावट बांधकाम परवाने दिले, तसेच आवक रजिस्टर व अधिकृत बांधकाम परवाना क्रं. १ ते ९६ दस्त गायब केला, महापालिकेकडे कमी विकास शुल्क जमा करण्यास लावून चौघांनी संगनमत करून महापालिकेचे २ कोटी ४२ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान केले अशा आशयाची फिर्याद उपअभियंता नीलकंठ मठपती यांनी सदर बझार पोलिसात अर्जदार व इतर तिघांविरुद्ध दाखल केली.

त्यामध्ये अर्जदाराने एकूण सहा प्रकरणे अधिकार नसताना मंजूर केल्याचा आरोप अर्जदार यांच्यावर ठेवण्यात आला. तदनंतर दिनांक २६ जून २०२५ रोजी आरोपीस अटक करण्यात आली. सहायक अभियंता शिवशंकर घाटे यांनी जामीनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्याची सुनावणी झाली.जी ६ प्रकरणे अधिकार नसताना मंजूर केली असा आरोप करण्यात आला आहे त्यापैकी एक ही प्रकरण ऑनलाईन प्रक्रिया सुरू झाल्यानंतर स्वीकारण्यात आलेले नाही, महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले याला कोणताही आधार नाही, त्याबाबत ऑडिट केले नाही, दप्तर सांभाळण्याचे काम आरोपीचे नव्हते, आरोपी बाबतचा तपास पूर्ण झालेला आहे, आरोपी तपासात सहकार्य करणेस तयार आहे असा युक्तिवाद आरोपीच्या वकिलांनी केला.

तो मान्य करुन न्यायालयाने आरोपीचा जामीन मंजूर केला. यात सरकार तर्फे ॲड. दत्ता पवार यांनी तर आरोपी तर्फे ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. गणेश माशाळ, ॲड. श्रीपाद देशक, ॲड. सिध्दाराम पाटील यांनी पाहिले.

## संत नामदेव महाराजांचे जन्मस्थान हे चालते बोलते विद्यापीठ

**● श्री भक्त शिरोमणी नामदेव महाराज पुरस्काराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सन्मानित**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ जुलै-**

संत नामदेव महाराजांचे जन्मस्थान हे चालते बोलते विद्यापीठ आहे. संत नामदेव महाराज यांनी भागवत धर्माची पताका महाराष्ट्र बाहेर नेली, रुजवली व वाढवली. त्यामुळे वारकऱ्यांना देशभर प्रतिष्ठा आहे. तसेच वारीच्या माध्यमातून देशभरातून लाखो भाविक पंढरपूरात येतात आणि त्यांच्या सुख, समृद्धी व सेवेसाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

संत शिरोमणी नामदेव महाराज परिवार व संत जनाबाई यांच्या षष्ठशतकोत्तर (६७५ वा) संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त भक्त शिरोमणी संत श्री नामदेव महाराज पुरस्कार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना संत नामदेव महाराज यांच्या वंशाच्याकडून संत नामदेव महाराज मंदिर येथे प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र सन्मानचिन्हे असे पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी सर्व आमदार समाधान आवताडे, अभिजीत पाटील, उत्तम जानकर, माजी आमदार शहाजी बापू पाटील, माजी आमदार जयवंत जगताप, सकल संत वंशज तथा संत समाधी संस्थान प्रमुख, विश्वस्त, फडकरी, जेष्ठ कीर्तनकार मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, संत नामदेव महाराजांच्या जन्मभूमीवर पुरस्कार मिळणे हे मी माझे भाग्य समजतो. तसेच हा पुरस्कार वैयक्तिक सन्मान मानण्याऐवजी सहकाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ म्हणून स्वीकारल्याची भावना व्यक्त केली. हा पुरस्कार कोणत्याही पदापेक्षा मोठा असल्याचे त्यांनी म्हटले. शेतकरी व वारकरी यांचा विकास हे प्राधान्य असून संत नामदेवांच्या शिकवणीप्रमाणे तळागाळातील प्रत्येकाचा सर्वांगीण विकास अपेक्षित आहे. शासन धार्मिक अधिष्ठानास राजकीय अधिष्ठानापेक्षा प्राधान्य देत असून, महाराष्ट्रातील तमाम साधू-संतांच्या सेवेसाठी कटिबद्ध आहे, असेही श्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. इतिहासात प्रथमच वारकऱ्यांच्या दिंड्यांसाठी शासनाने अनुदान जाहीर केले असून विमा सुरक्षा, आरोग्य तपासणी शिबिरे, शुद्ध पाणी, निवास, स्वच्छता इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. हा सगळा विकास लोकांना विश्वासात घेऊन आणि पांडुरंगाच्या आशीर्वादाने होत असल्याचेही त्यांनी सांगितले. संतांचे विचार आणि वारकरी संतरंपरा हीच महाराष्ट्राची ओळख आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी, वीरांची भूमी आणि छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी आहे. त्यांची शिकवण नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हेच आपले कर्तव्य असल्याचे श्री. शिंदे यांनी यावेळी म्हटले.

प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केशवराज यांचे दर्शन घेतले व त्यानंतर नामदेव महाराजाच्या वंशजांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना श्री भक्त शिरोमणी नामदेव महाराज पुरस्काराने सन्मानित केले. यावेळी त्यांना पगडी, विणा तसेचसन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या संस्थांच्या वतीने देण्यात आलेला श्री भक्त शिरोमणी नामदेव महाराज हा पहिलाच पुरस्कार श्री.शिंदे यांना देण्यात आलेला आहे. अक्षय महाराज भोसले यांनी प्रास्ताविक केले यामध्ये त्यांनी श्री संत शिरोमणी नामदेव महाराज व त्यांचे वंशज यांच्या परंपरेंची व कार्याची माहिती दिली तसेच हा पुरस्कार देण्यामागचा उद्देश सांगितला.यावेळी ह.भ.प. चैतन्य महारज देगलूरकर, राणा महाराज वासकर यांनी आपले विचार व्यक्त केले.



### अधिक प्रभावीपणे काम केले जाणार

तीर्थक्षेत्र विकास व मंदिरांना संस्कार केंद्र मानून विकास महाराष्ट्रातील प्रत्येक तीर्थक्षेत्राला सरकारने देणगी दोन कोटी रुपयांवरून पाच कोटीपर्यंत वाढवली आहे. मंदिरांना संस्कार केंद्र मानून महाराष्ट्र सरकारने गोमातेला राज्य मातेचा दर्जा दिला. तसेच महाराष्ट्रात वारकरी संप्रदायासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळामार्फत वारकऱ्यांच्या गरजांवर अधिक प्रभावीपणे काम केले जाणार आहे, अशी माहिती श्री. शिंदे यांनी दिली.

### धर्मरक्षण ही सामूहिक जबाबदारी

पांडुरंग आपल्या प्रत्येक वारकऱ्यात आहे, ही भावना त्यांनी व्यक्त करीत धर्मरक्षण ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे ठामपणे सांगितले. संत नाम देवांनी भक्तीबरोबरच ज्ञानाचा प्रसार केल्यामुळे त्यांची शिकवण देशभर पसरली असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### महापालिकेच्यावतीने लोकमान्य टिळक यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २४ जुलै-**
सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने भारताचे थोर नेते लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त टिळक चौक येथील भारताचे थोर नेते कै. लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यास तसेच कौन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र. कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, जनसंपर्क अधिकारी श्रीगणेश बिराजदार, कनिष्ठ अभियंता श्रीविद्या गुट्टी, कनिष्ठ अभियंताअक्षय फुदे सिद्धू तिमिगार,अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.



### वालचंद महाविद्यालयात अकरावी प्रवेशोत्सव उत्साहात

**सोलापूर, दि. २४ जुलै-**
वालचंद कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी इयत्ता ११ वी कला व विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे, बुधवार २३ जुलै रोजी उपस्थित मान्यवर, विद्यार्थी पालक व शिक्षक यांच्या उपस्थितीत गुलाब पुष्प देऊन औपचारिक पद्धतीने आनंदी व उत्साही वातावरणात स्वागत करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते, प्रवेशित विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी व विद्यार्थिनींचा गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. संतोष कोटी, शिक्षण उपनिरीक्षक माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग स्मिता नडीमेटला, डाएटचे अधिव्याख्याता प्राध्यापक डॉ. प्रभाकर बुधाराम, जेलरोडचे पोलीस उपनिरीक्षक शिवाजी राऊत, अशोक चौक पोलीस चौकीचे उपनिरीक्षक मनोज महादेव मोरे, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे, कार्यालयीन अधीक्षक संतोष सरसमकर, क्रीडाशिक्षक राहुल हजारे उपस्थित होते. प्रास्ताविक उपप्राचार्य अनुप म्हेत्रे यांनी केले.` सूत्रसंचालन प्रशांत पाटील यांनी केले.



### बुर्ला महाविद्यालयात लोकमान्य टिळक जयंती साजरी

**सोलापूर, दि. २४ जुलै-**
पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लोकमान्य टिळक यांची १६९वी जयंती साजरी करण्यात आली. यासंगी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी संचालक डॉ. टी.व्ही. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास कार्यक्रम अधिकारी रा. से. योजना प्रा. डॉ.ॲनी जॉन, प्रा. डॉ. शंकर राजे, प्रा. सविता मल्लाडे, प्रा. सुरेखा बत्तुल, डॉ.रंजना बनसुडे, डॉ. दरेप्पा बताले, प्रा. महादेव गायकवाड, प्रा.विजयकुमार मुलगे, प्रा. मनोज वाघमारे, प्रा. निर्मला कर्रे, प्रा.यमुना द्यावनपल्ली,प्रा.संपदा जिंदम, प्रा. अमिता जावळे, प्रा. सविता शेरीकर आदी उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### शहाजान मुलाणी



**पिलीव, दि. २४ जुलै-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील श्री महालक्ष्मी यात्रा कमीटीचे माजी सचिव ज. शहाजहान महंमद मुलाणी यांचे आजाराने निधन झाले. ते ७८ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मुस्लिम समाजाचे नेते निसारभाई मुलाणी यांचे ते वडील होते.

### अशोक घोडके




**सोलापूर, दि. २४ जुलै -**
श्रीदेवी नगर, आकाशवाणी केंद्र येथील रहिवासी अशोक कल्लप्पा घोडके (वय ६३,) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना व नातवंडे आहेत. ते इंद्रायणी फायर सेफ्टी सर्व्हिसेसचे अमित घोडके यांचे वडील होत.

### श्रावण गजधाने



**अक्कलकोट, दि.२४ जुलै-**
भारतीय सैन्यदलातील तत्कालीन जवान तसेच अक्कलकोट तालुक्यातील चपळगांव ग्रामपंचायत सदस्य श्रावण सिद्राम गजधाने (वय ७०) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर चपळगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुली असा परिवार आहे. श्रावण गजधाने यांनी भारतीय सैन्यदल व सोलापूर महानगरपालिकेतही अनेक वर्षे काम केले.

# शहर-जिल्ह्यातील २३ अंमलदार झाले पोलिस उपनिरीक्षक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जुलै-**
विभागीय अर्हता परिक्षा उत्तीर्ण असलेल्या व पोलिस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्याबाबतच्या निवडसूचीतील पात्र पोलिस अमंलदारांना २५ टक्के कोट्यातील रिक्त पदात पदोन्नती देण्याबाबतचा निर्णय गृह विभागाने घेतला आहे. त्यानुसार राज्याताल १८३ अमंलदारांना पोलिस उपनिरीक्षकपदी पदोन्नती देण्यात आली आहे. यामध्ये सोलापूर शहर व जिल्ह्यातील २३ अमंलदारांचा समावेश आहे.

विभागीय अर्हता परिक्षा उत्तीर्ण असलेल्या अमंलदारांना पोलिस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती बदली करण्याचा निर्णय गृह विभागाने घेतला असून राज्यातील १८३ अमंलदारांना पोलिस उपनिरीक्षकपदी पदोन्नती देण्यात आली आहे. त्यामध्ये सोलापूर शहर व जिल्ह्यातील पोलिस उपनिरीक्षकपदी पदोन्नती मिळालेले अमंलदार पुढीलप्रमाणे : झाकीर हुसेन अ. अजीज पटेल (सोलापूर शहर ते मसुप), शब्बीर महिबुब तांबोळी (सोलापूर शहर ते पुणे रेल्वे), राजकुमार तोळनुरे (सोलापूर शहर ते सोलापूर शहर), रामकृष्ण थोरात (सोलापूर शहर ते सोलापूर शहर), राजेंद्र बंडगर (सोलापूर शहर ते सोलापूर शहर), शहाजी दुधाळ (सोलापूर शहर ते सोलापूर शहर), संजीव आवताडे (सोलापूर शहर ते सोलापूर शहर), संजय मोटे (सोलापूर शहर ते कोल्हापूर परिक्षेत्र), इमाम सैफन इनामदार (सोलापूर शहर ते पुणे रेल्वे), नवनित नडगेरी (सोलापूर शहर ते नागपूर शहर), शिवाजी कासे (सोलापूर शहर ते मुंबई रेल्वे), सिध्दाराम गवळी (सोलापूर शहर ते मुंबई रेल्वे), रणजित शिंदे (सोलापूर शहर ते मुंबई रेल्वे), देविदास वाल्मिकी (सोलापूर शहर ते मुंबई रेल्वे), पद्मानंद चंगरपल्लू (सोलापूर शहर ते मुंबई रेल्वे), दिपक भोसले (सोलापूर शहर ते मुंबई रेल्वे), अल्ताफ शेख (सोलापूर शहर ते नागपूर परिक्षेत्र), धनाजी सुरवसे (सोलापूर शहर ते मुंबई रेल्वे), सुभाष राठोड (सोलापूर ग्रामीण ते नागपूर परिक्षेत्र), सुनिता पवार (सोलापूर शहर ते कोल्हापूर परिच्रेत्र), संगीता लोंढे (सोलापूर शहर ते मुंबई रेल्वे), सीमा डोंगरीतोट (सोलापूर शहर ते नागपूर रेल्वे), मनोहर माने (सोलापूर ग्रामीण ते मुंबई रेल्वे).

# इंडियन दलित सेनेच्या वतीने गुणवंतांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जुलै-**
इंडियन दलित सेनेच्या वतीने रंगभवन येथील समाज कल्याण केंद्रात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संदीप कारंजे, अतिरिक्त आयुक्त सुधीर खरटमल, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहरअध्यक्ष राजश्री कांबळे, अंगद जाधव यांची उपस्थिती होती तर संघटनेचे संस्थापक देविदास गुपारगुडे अध्यक्षस्थानी होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन दिपप्रज्वलीत करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वदीप वाघमारे, सुलोचना बनसोडे, सुहास बिराजदार, मनोज गजधाने, अर्चना केंगाळ, देवानंद सोनवणे, रुक्मिणी नागणे, मुन्नप्पा मरेड्डी, विलास दुपारगुडे, लक्ष्मी लोंढे, आशा वाघमारे, परमेश्वर भडकुंबे, सुधीर डोळ्ळे, किसन नागणे, राजू वडवेराव, सुमित्रा बिरुनगी, सुरेखा कांबळे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचान कृष्णा जटार यांनी केले.

### विद्यानिकेतनमध्ये लोकमान्य टिळक यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २४ जुलै-**
विद्यानिकेतन हायस्कूल मध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेच पूजन प्रशालेचे ज्येष्ठ लिपिक सुधाकर महिंद्रकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गोपीनाथ नवले हे होते तर प्रमुख उपस्थिती पर्यवेक्षक शंकरगिरी गिरी व ज्येष्ठ शिक्षक विद्याधर रंगदाळ यांची होती. ज्येष्ठ शिक्षिका शोभा अंबुरे यांनी लोकमान्य टिळकांचा जीवनपट आपल्या भाषणातून उलगडला. सूत्रसंचालन सहशिक्षिका शशीकला नवले यांनी केले तर राजकुमार लवटे यांनी समारोप केला. कार्यक्रमास सांस्कृतिक विभाग प्रमुख रूपादेवी राजगे, नितीन मुसळे उपस्थित होते.

# 'माझ्या हृद्य आठवणी'तून उलगडला मठ मंदिरांचा इतिहास

### लेखिका पंडीत यांनी ७० वर्षांच्या जुन्या आठवणींना दिला उजाळा





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जुलै-**
मठमंदिरे संस्कार आणि संस्कृती शिकवित आधार देतात. ही संस्कृतीचे केंद्रे, आधाराचे स्तंभ, मुक्तीचे द्वार आहेत. मठाने खूप माणसे दिली. खूप नाती जोडली. अशा अनेक हृद्य आठवणी सांगत लेखिका सुनेत्रा पंडीत यांनी सोलापूरातील मठ मंदीराचा गेल्या ७० वर्षांचा इतिहास बुधवारी दि. २३ जुलै रोजी शुभराय मठातील कार्यक्रमात उलगडला.

दत्त चौकातील शुभराय मठ संस्थेच्या वतीने माझ्या हृद्य आठवणी...कार्यक्रमात लेखिका पंडीत बोलत होत्या. यावेळी त्यांनी आपल्या आयुष्यातील सत्तर वर्षांच्या आठवणींची शिदोरी उलगडली. सुरुवातीला श्री शुभराय महाराज भजनी मंडळातील श्रीमती सुनंदा लक्ष्मण श्रीगीरी आणि श्रीमती जयश्री भिमाशंकर उंबरजे ह्यांनी सांग विठ्ठला का रुसला हे भक्तीगीत सादर केले. सूत्रसंचालन राहुल उपाध्ये यांनी केले. शुभांगी बुवा (माई) यांनी आभार मानले.`लेखिका पंडित यांनी आपल्या आयुष्यातील आठवणी सांगताना पूर्वी मठाला दगडी चौकटीत मोठा लाकडी दरवाजा होता. त्या दरवाजाच्या बाजूला एक झाड होते. प्राजक्ताची फुले अंगावर पडत. मठाच्या डाव्या बाजूला गोठयात एक गाय असायची. मठात रहात असलेल्या बुवांच्या नातेवाईक विठाआत्यांनी आलेल्या अनेक भक्तांचे डोकेदुखीसारखे अनेक आजार घालवले. देवघरात शुभरायांच्या भक्तीसाठी विठ्ठरायाची मूर्ती होती. विठ्ठरायासमोर लाकडी चौथडा होता. रथात बसण्याचा आनंद खूप मिळाला. पुण्याहून सिंधुताई गोडबोले कीर्तनसाठी सोलापूरला यायच्या. त्यांच्या सारखे किर्तन प्रवचन करायचा संकल्प लहानपणीच केला. सन २००१ साली मठाची वास्तू ही नवीन वास्तूत परावर्तीत झाली. मठाला अध्यात्मिक आणि सामाजिक बळकटी देण्याचे काम शुभा (शुभांगीमाई बुवा) यांनी पुढे चालू ठेवले आहे. दर आषाढी आणि कार्तिकी एकादशीला मोठी रथयात्रा, चातुर्मासात मठात छोटा रथाची रथयात्रा, तसेच सगळे उत्सव समारंभ मठात साजरे केले जातात. येणारा भक्तगण याचा आनंद घेत असल्याचे त्यांनी सांगितले.



# हरीहारा वीरा मल्लू सिनेमाच्या पोस्टरवर दुग्धाभिषेक; पवन कल्याण फॅन्स असोसिएशनतर्फे नॅपकिन वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२४ जुलै-**
पवन कल्याण यांच्या बहुप्रतिक्षित ऐतिहासिक चित्रपट हरीहारा वीरा मल्लू चा पहिला शो दिमाखात पार पडला. पहिल्याच दिवशी सिनेमाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जय पवन कल्याण जय पवन कल्याण अशा घोषणा देण्यात आल्या. चाहत्यांनी ढोल - ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीत आणि पवन कल्याण यांच्या पोस्टर्सवर दुग्धाभिषेक करत आपली निष्ठा आणि आनंद व्यक्त केला. थिएटरमध्ये हाऊसफुल्ल शो पाहायला मिळाला. हरीहारा वीरा मल्लू या चित्रपटात पवन कल्याण यांनी एका धडाडीच्या वीर योद्ध्याची भूमिका साकारत पवन कल्याण यांनी चाहत्यांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं आहे. पवन कल्याण फॅन्स असोसिएशन सोलापूरच्यावतीने चित्रपट पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांना ५०० नॅपकिनचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी श्रीनिवास कनकी, गणेश पोतन, अनिल कोंडा, श्रीनिवास महेशन, नरेंद्र बल्ला, श्रीनिवास बिटला, रोहन सोमा, सूरज दासरी, विनायक जगताप, अंबादास गड्डाम व श्रीनिवास यन्नम कामटे उपस्थित होते.

# लोधी समाजाच्यावतीने माँ शितलादेवी आषाढ यात्रा साजरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जुलै-**
लोधी समाजाच्या वतीने मॉ शितलादेवी आषाढ यात्रा साजरी करण्यात आली. समाजाचे अध्यक्ष भगतसिंग कल्लावाले व समस्त मुरब्बीगण यांच्या नेतृत्वाखाली रविवारी मॉ शितलादेवी मंदिर, लष्कर व मॉ शितलादेवी मंदिर कुमठा नाका, येथे हजारो समाज बांधव, देवीची दर्शनास व पूजा आरती, भजन, कीर्तन, श्रध्दा भावाने भक्तिमध्ये विलीन झाले. यावेळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

रविवारी सांय. ५ वाजता सर्व समाज बांधव एकत्रपणे हजारोंच्या संख्येने ढोलताशा व पारंपारिक वाद्यांसह मॉ वनशितलादेवी मंदिर, पत्रकार नगर परिसर येथे मंदिरासमोरील पटांगणात वनशितलादेवीचे सामुहिक महापूजेसाठी आले. वनशितलादेवीची आषाढी यात्रेसाठी मुंबई, पुणे, उस्मानाबाद, कर्नाटक मधील विज़ापूर जिल्हयातील हजारो नागरीक दर्शनासी यात्रेत आले होते आणि शितलामातेचा जयजयकार करत होते. यावेळी माजी आमदार शिवशरण अण्णा पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख मनिष अण्णा काळजे, माजी नगरसेवक गुरुशां धुत्तरगांवकर, जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंह राजपूत, भगतसिंग कल्लावाले, उपाध्यक्ष सिताराम लंगडेवाले, घनशाम शिवसिंगवाले, नागनाथ शिवसिंगवाले, नगरसेवक रवी कैय्यावाले, नगरसेवक भारत बडुरवाले, नगरसेविका जुगनबाई आंबेवाले, वनशितलादेवी ट्रस्टचे रणजित दवेवाले, मुरब्बीगण, श्री विठ्ठलसिंग शिवसिंगवाले, राणोसिंग सतारेवाले, किसन कजाकवाले, मानसिंग कोलाकाटी, सोबुराम शिवसिंगवाले, बन्सीसिंग कैय्यावाले, भरतसिंग मदनावाले, कन्हेय्यासिंग खंडेवाले, चंदु मन्सावाले, अशोक बोकेवाले, अर्जुन रिसालदार, मोहन मौलावाले, किसन विजापुरे, सिताराम थुक्कुवाले, सुरेश तुक्कुवाले, सुरेश पंतुवाले, किसन पंतुवाले, गोपाल सोनगीवाले, लक्ष्मण बाडीवाले, राणुसिंग आंबेवाले, रतन कैय्यावाले, विजय फटफटवाले, मोहन लष्करवाले, विजय कल्लावाले, मन्नुसिंग बाबावाले, गुलजारसिंग शिवसिंगवाले, नागनाथ शिवसिंगवाले, अर्जुन शिवसिंगवाले, परशुराम सतारेवाले उपस्थित होते.



### मानव उत्थान सेवा समितीतर्फे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जुलै-**
मानव उत्थान सेवा समिति पंढरपूर शाखेच्यावतीने वृक्षारोपण अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मानव धर्मचे प्रणेते सदगुरुदेव श्री सतपाल जी महाराज यांच्या प्रेरणेने संपूर्ण भारत देशात मानव उत्थान सेवा समिती या संस्थेच्या माध्यमातून दिनांक ५ ते २० जुलैपर्यंत वृक्षारोपण अभियान यानिमित्ताने मानव उत्थान सेवा समिती शाखेच्या वतीने आश्रमाचे प्रबंधक संत महात्मा दामिनी बाईजी व साध्वी जगेश्वरी बाईजी यांच्या हस्ते शेळगी या विभागात वृक्षारोपण करण्यात आले आहे. यावेळी डॉ. देविदास पालकर, चंदा पालकर, चंद्रमोहन चिप्पा, पद्मा चिप्पा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राजू रापेल्ली, नागेश कोतलापुरे, अंबादास तवटम, लक्ष्मण लगशेट्टी, जगदीश रापेल्ली यांनी परिश्रम घेतले. तिरुपती संबारी यांनी आभार मानले.

# निवृत्त पोलिसांवरही सन्मानपूर्वक अंत्यसस्कार!

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ जुलै -**
पोलीस दलात पदोन्नती मिळाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतःहून ती बहाल करण्याची पद्धत राज्य पोलीस दलात रुढ झाली आहे. आता सेवानिवृत्त झालेल्या पोलिसांवर निधनानंतर सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार केले जावेत, यासाठी राज्य पोलिसांकडून कार्यप्रणाली जारी करण्यात आली आहे. पोलीस दलाकडून अगदी शेवटपर्यंत संबंधित पोलिसाची काळजी घेतली जाते, असा संदेश कुटुंबीयांपर्यंत जावा या हेतूने ही कार्यप्रणाली सुरू करण्यात आली असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. अशा पद्धतीची पहिल्यांदाच कार्यप्रणाली प्रसारित करण्यात आली असून ती राज्यभर राबविली जावी, अशी अपेक्षा पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी व्यक्त केली आहे.

पोलीस सेवानिवृत्त झाल्यानंतर त्या त्या विभागात संबंधित पोलिसाला कुटुंबीयांच्या उपस्थितीत निरोप दिला जातो. मात्र त्यानंतर सेवानिवृत्त पोलिसाची खबर ठेवली जात नाही. त्यामुळे त्याचा मृत्यू होतो, तेंव्हाही पोलीस दलाला फार क्वचित माहिती मिळते. आता सर्व पोलिसांनी सेवानिवृत्तीनंतरचा तपशील अद्ययावत ठेवण्याचे आदेश महासंचालकांनी दिले आहेत.

राज्यातील पोलीस आयुक्तालये, परिक्षेत्र कार्यालये, अधीक्षक कार्यालयांनी ही माहिती अद्ययावत ठेवण्यासाठी समन्वय अधिकारी नियुक्त करावा, असे नमूद केले आहे. वयोमानानुसार सेवानिवृत्त, स्वेच्छानिवृत्ती, वैद्यकीय कारणामुळे सेवानिवृत्त आणि सेवानिवृत्त किंवा निवृत्ती वेतनधारकाचे ओळखपत्र असलेल्या सर्व पोलिसांसाठी ही कार्यप्रणाली लागू आहे. मात्र आत्महत्या किंवा अपकीर्ती परिस्थितीमुळे मरण पावलेल्या पोलिसांना अशा पद्धतीने अंत्यसंस्काराच्या वेळी विशेष औपचारिकता प्राप्त होणार नाही, असे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. या कार्यप्रणालीनुसार सेवानिवृत्त पोलिसाचा मृत्यू झाल्यानंतर अंत्यसंस्काराच्या वेळी कोणत्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने गणवेशात हजर राहिले पाहिजे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. संबंधित पोलिसावर सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार व्हावेत, याची दक्षता संबंधित उपस्थित अधिकाऱ्याने घ्यावी, असेही स्पष्ट केले आहे.

### अधिकाऱ्यांना उपस्थिती बंधनकारक

सेवानिवृत्तीच्या वेळी पोलीस महासंचालक वा अतिरिक्त महासंचालक असलेल्या पोलिसाचा मृत्यू झाल्यास उपमहानिरीक्षक वा त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्याने तर महानिरीक्षक वा उपमहानिरीक्षक असल्यास अधीक्षक किंवा त्यावरील दर्जाच्या, अधीक्षक वा अतिरिक्त अधीक्षक असल्यास उपअधीक्षक वा त्यावरील दर्जाचा तर पोलीस निरीक्षक वा त्याखालील सहायक निरीक्षक, उपनिरीक्षक, हेड कॉन्स्टेबल, हवालदार, शिपाई यांचा मृत्यू झाल्यास उपनिरीक्षक यांनी अंत्यसंस्काराच्या ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

### बिगुल आणि शोक सलामी

मृत झालेला पोलीस अधिकारी महासंचालक दर्जाचा असल्यास गार्ड ऑफ ऑनर (औपचारिक संचलनाशिवाय) देण्यात यावा. बिगुल आणि शोक सलामी प्रदान करावी, असे नमूद केले आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक वा त्यावरील दर्जाचे पोलीस अधिकारी असल्यास त्याबाबत पोलीस महासंचालक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, संबंधित पोलीस आयुक्त तसेच संबंधित परिक्षेत्रीय पोलीस महानिरीक्षकांना माहिती द्यावी, असेही स्पष्ट केले आहे.

## महत्त्वाचे

### बीसीसीआय युएईमध्ये आशिया चषकाचे आयोजन

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट नियामक मंडख (बीसीसीआय) आगामी आशिया चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा संयुक्त अरब अमिरातीमध्ये आयोजित करण्यास सज्ज आहे आणि काही दिवसांत औपचारिक घोषणा अपेक्षित आहे, असे आशियाई क्रिकेट परिषदेतील (एसीसी) सूत्रांनी गुरुवारी सांगितले. आशिया क्रिकेट परिषदेच्या सर्व २५ सदस्य देशांनी या आशिया चषक स्पर्धेच्या स्थळावर चर्चा करण्यासाठी उपस्थित होते. बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी आभासी माध्यमातून प्रतिनिधित्व केले. बीसीसीआय युएईमध्ये आशिया चषकाचे आयोजन करेल. भारत आपले सर्व सामने दुबईमध्ये खेळण्याची शक्यता आहे. वेळापत्रकाबाबत अजूनही चर्चा सुरू आहे, असे एसीसीच्या एका सूत्राने सांगितले. ही स्पर्धा सप्टेंबरमध्ये पंधरा दिवसांपेक्षा जास्त काळ आयोजित केली जाईल. त्या ठिकाणापासून भारताची वेस्ट इंडीजविरुद्धची कसोटी मालिका नियोजित असल्याने ती महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापूर्वी संपली पाहिजे. आमचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला एसीसीच्या बैठकीला उपस्थित होते. ते सदस्यांना माहिती देतील. मी अनुमानांवर विश्वास ठेवत नाही, त्यामुळे काही दिवसांत तुम्हाला अधिकृतपणे कळेल, असे बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी वृत्तसंस्थेला सांगितले. ■

### स्टीफनोस- प्रशिक्षक गोरान वेगळे झाले

**अॅथेन्स** : ग्रीकचा स्टार टेनिसपटू स्टीफनोस सितसिपास थोड्या काळासाठी एकत्र काम केल्यानंतर प्रशिक्षक गोरान इव्हानिसेविच यांच्यापासून वेगळा झाला. गोरान इव्हानिसेविचसोबत काम करणे हा एक छोटासा अनुभव होता, पण माझ्या प्रवासातील एक खरोखरच मौल्यवान अध्याय होता. त्यांनी मला आणि माझ्या संघाला समर्पित केलेल्या वेळेबद्दल, प्रयत्नांबद्दल आणि उर्जेबद्दल मी आभारी आहे, असे माजी तिसरा विश्वमानांकित स्टीफनोसने म्हटले आहे. जूनमध्ये अव्वल २० मधून बाहेर पडलेल्या दोन वेळा ग्रॅण्ड स्लॅम अंतिम फेरी गाठणारा स्टीफनोस याने मे महिन्याच्या अखेरीस फ्रेंच ओपनमध्ये दुसऱ्या फेरीत पराभव पत्करल्यानंतर २००१ च्या विम्बल्डन विजेत्या इव्हानिसेविचसोबत काम करण्यास सुरुवात केली होती. इव्हानिसेविचने हॅले व विम्बल्डन येथे २६ वर्षीय स्टीफनोसला प्रशिक्षण दिले. तो विम्बल्डनच्या पहिल्या सामन्यात पाठीच्या दुखापतीमुळे निवृत्त झाला होता. स्टीफनोस रविवारपासून टोरंटोमध्ये खेळणार आहे.

### लैंगिकतावादी टिप्पणीबद्दल चिचारितोवर जोरदार टीका

**मेक्सिको सिटी** : स्टार फुटबॉलपटू झेवियर 'चिचारितो' हर्नांडिझ याला त्यांच्या समाजमाध्यम खात्यावर लिंग भूमिकांबाबत पोस्ट केलेल्या टिप्पणीबद्दल मेक्सिकोच्या अध्यक्षा क्लॉडिया शीनबॉम आणि इतरांकडून टीका सहन करावी लागत आहे. ६३ वर्षीय शास्त्रज्ञ शीनबॉम गेल्या वर्षी देशाच्या २०० वर्षांच्या इतिहासातील पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून निवडून आल्या. चिचारितो हा एक खूप चांगला फुटबॉल खेळाडू आहे, पण महिलांबद्दलच्या त्यांच्या मतांचा विचार येतो तेव्हा त्याला अजूनही बरेच काही शिकायचे आहे, असे, शीनबॉम ने म्हटले आहे. चिचारितोने माजी मेक्सिको आंतरराष्ट्रीय खेळाडूच्या कल्पना ''अत्यंत लैंगिकतावादी'' असल्याचे वर्णन केले. महिला होण्यास घाबरू नका, स्वतःला पुरुषाच्या नेतृत्वाखाली चालवू द्या. महिलांनो, तुम्ही अपयशी ठरत आहात, तुम्ही पुरुषत्व नष्ट करत आहात, समाजाला अतिसंवेदनशील बनवत आहात, ३७ वर्षीय हर्नांडिझ म्हणाला. मेक्सिकन राष्ट्रीय संघासाठी ५२ गोलसह सर्वकालीन आघाडीचा गोलरक्षक हर्नांडिझ गता वर्षी चिवाससोबत दोन वर्षांच्या करारावर मेक्सिकोला परतला. तिथे त्याने २००६ मध्ये त्याच्या व्यावसायिक कारकिर्दीची सुरुवात केली होती. महिलांनी पुरुषत्व स्वीकारायला पाहिजे व त्याचा आदर करायला शिकले पाहिजे, असे त्याने आपल्या आणखी एका पोस्टमध्ये म्हटले आहे.

### जागतिक रॅकेटलॉन स्पर्धेत विक्रमादित्यकडे भारताचे नेतृत्व

**नवी दिल्ली** : आगामी ३० जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान नेदरलॅण्डमधील रॉटरडॅम येथे होणाऱ्या जागतिक रॅकेटलॉन अजिंक्यपद स्पर्धेसाठी विक्रमादित्य चौफला यांची भारतीय संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. रॅकेटलॉन हा एक संयोजन खेळ आहे, ज्यामध्ये स्पर्धकांना टेबल टेनिस, बॅडमिंटन, टेनिस आणि स्क्वॅश असे चार रॅकेट खेळ खेळावे लागतात. माजी बॅडमिंटनपटू चौफला यांनी गेल्या वर्षीच्या जागतिक स्पर्धेमध्येही संघाचे नेतृत्व केले होते. २०२२ च्या आवृत्तीत त्यांनी वैयक्तिक गटात रौप्यपदक जिंकले होते. चौफला यांच्याशिवाय रॅकेटलॉन इंडिया स्पोर्ट्स असोसिएशनने जाहीर केलेल्या भारतीय संघात कृष्णा बी. कोटक, प्रशांत सेन, निहित कुमार सिंग आणि सुहेल कपूर यांचा समावेश आहे. तर राघव जटिया राखीव म्हणून काम पाहतील. महिला स्पर्धेत भाग घेणारी निधी तिवारी ही एकमेव भारतीय आहे. ■

# पंतचे अर्धशतक, भारत ३५८

**मॅन्चेस्टर, २४ जुलै**

ओल्ड ट्रॅफर्डवर सुरु असलेल्या अॅण्डरसन-तेंडुलकर चषक कसोटी मालिकेतील पाचव्या सामन्यात दुसऱ्या दिवशी काल जखमी निवृत्त झालेला उपकर्णधार यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंत मैदानावर येऊन सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. पंतने केलेल्या ५४ धावांच्या अर्धशतकी खेळीच्या तसेच शार्दुल ठाकूरच्या ४१ धावांच्या खेळीच्या बळावर भारताने पहिल्या डावांत ११४.१ षटकांत सर्वबाद ३५८ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तर देताना इंग्लंडने चहापानापर्यंत १४ षटकांत बिनबाद ७७ धावा काढल्या, त्यावेळी सलामीवीर झॅक क्रॉली ३३ धावांवर, तर बेन डकेट ४३ धावांवर खेळत होते.


फटकेबाजी करताना ऋषभ पंत

भारताने ४ बाद २६४ धावांवरून पुढे खेळताना अष्टपैलू रवींद्र जडेजाने (२०) एका धावेची भर घातली आणि चोफ्रा आर्चरच्या भेदक माऱ्याला बळी पडला. त्यानंतर शार्दुल ठाकूरला साथ देण्यासाठी आपल्या दुखापतीची तमा न बाळगता कालचा जखमी निवृत्त ऋषभ पंत मैदानावर आला. शार्दुल ठाकूरने पंतसोबत सहाव्या गड्यासाठी ४८ धावांची भागीदारी केली. ८८ चेंडूंत ५ चौकारांसह ४१ धावांची खेळी करणारा शार्दुल स्टोक्सच्या गोलंदाजीला बळी पडला. नंतर पंतने एक बाजू सांभाळत वॉशिंग्टन सुंदर (४१), अंशुल कंबोज (०), जसप्रीत बुमराहच्या साथीने आपले अर्धशतक साजरे केले व संघाला साडे तिनशे धावांच्या जवळपास आणले. अखेर पंतही जोफ्रा आर्चरच्या वेगवान माऱ्याचा बळी ठरला. छंतने ७५ चेंडूंत ३ चौकार व २ षट्कारसह ५४ धावांची खेळी केली. जसप्रीत बुमराह (४) आर्चरच्या चेंडूवर स्मिथकडून झेलबाद होताच भारताचा डाव आटोपला. भारताने ११४.१ षटकांत सर्वबाद ३५८ धावा केल्या. इंग्लंडकडून बेन स्टोक्सने ७२ धावांत ५ बळी टिपलेत. जोफ्रा आर्चरने ३ बळी, ख्रिस वोक्स व लियाम डावसनने प्रत्येकी १ बळी टिपला. (वृत्तसंस्था)

## जखमी पायाने खेळत पंतचा विक्रम

ऋषभ पंतने जखमी पायाने फलंदाजीला येऊन सर्वांना धक्का दिला आणि कालचा जखमी निवृत्त पंतने पुढे खेळत ३७ धावसंख्येवरून वाढवून ५४ धावा केल्या. हे त्याचे १७ वे कसोटी अर्धशतक ठरले. या अनपेक्षित खेळीदरम्यान त्याने कसोटी क्रिकेटमधील ९० वा षट्कार मारला आणि भारताच्या कसोटी क्रिकेटमधील सर्वाधिक षट्कार मारणाऱ्या वीरेंद्र सेहवागची बरोबरी केली. त्याने इंग्लंडमधील कसोटी मालिकेत यष्टीरक्षकाकडून सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम आहे.

सेहवागला अशी कामगिरी करण्यासाठी १०३ कसोटी लागले; पंतची ही केवळ ४७ वी कसोटी होती. पंतने अर्धशतक पूर्ण केले.

काल पंतच्या पायाला चेंडू लागला, तेव्हा त्याला मैदानाबाहेर नेण्यात आले. तो थेट स्कॅनसाठी गेला. बीसीसीआयने अद्याप स्कॅनच्या निकालांची पुष्टी केलेली नव्हती, परंतु तिकड माध्यमात पंत उर्वरित दौऱ्यातून बाहेर झाल्याच्या बातम्या उठल्या, मात्र आज दुसऱ्या दिवसाच्या खेळादरम्यान, तो अनपेक्षितपणे मैदानावर परतला, तेव्हा सर्वांना आश्चर्याचा धक्का ब सला व त्याने अर्धशतकही पूर्ण केले. ■

## पंतच्या जागी जगदीशनला संधी?

**नवी दिल्ली** : दुखापतग्रस्त ऋषभ पंतच्या जागी इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या अॅण्डरसन-तेंडुलकर चषक कसोटी क्रिकेट सामन्यासाठी यष्टिरक्षक-फलंदाज एन. जगदीशनला भारतीय कसोटी संघात पहिल्यांदाच स्थान मिळण्याची शक्यता आहे. बीसीसीआयकडून लवकरच अधिकृत घोषणा होण्याची अपेक्षा आहे.

जगदीशन व्हिसा प्रक्रिया सुरू करण्यासाठी व लवकरात लवकर इंग्लंडमध्ये भारतीय कसोटी संघात सहभागी होण्यासाठी त्याच्या मूळ गावी कोइम्बतूरहून चेन्नईला जात आहे. नॉटिंगहॅमशायरकडून नुकताच कौंटी स्पर्धेत खेळलेला डावखुरा यष्टिरक्षक-फलंदाज ईशान किशन संघात सहभागी होण्याची शक्यता आहे, असे समजते. किशन डाव्या घोट्याच्या दुखापतीमुळे ग्रस्त आहे आणि ३१ जुलैपासून द ओव्हल येथे सुरू होणाऱ्या कसोटीसाठी वेळेत खेळण्यासाठी तो तंदुरुस्त होणार नाही. सध्या इंग्लंडमध्ये असलेल्या केएस भरतला बोलावण्याबाबतही एक विचारसरणी होती. ■

# नागपूरची दिव्या देशमुख फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषकाच्या अंतिम फेरीत

### अंतिम फेरी गाठणारी पहिली भारतीय

**बाटुमी, २४ जुलै**

जॉर्जियातील बटुमी येथे सुरू असलेल्या फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ २०२५ स्पर्धेच्या च्या उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात भारताचे प्रतिनिधित्व करणारी नागपूरची आंतरराष्ट्रीय मास्टर दिव्या देशमुख हिने चीनच्या टॅन झोंगी हिला हरवून अंतिम फेरीत स्थान मिळवले. या विजयासह, दिव्याने २०२६ मध्ये होणाऱ्या कॅण्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेतही आपले स्थान निश्चित केले व कॅंडिडेट्स स्पर्धेत स्थान मिळवले आणि आपला पहिला ग्रॅण्ड मास्टर नॉर्मही मिळवला.


विजयानंतर प्रतिस्पर्धीशी हस्तांदोलन करताना दिव्या देशमुख

१९ वर्षीय दिव्या देशमुख ही खेळाडू फिडे महिला विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश करणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली.

उपांत्य फेरीतील पहिला सामना बरोबरीत सोडवल्यानंतर, भारतीय बुद्धिबळ स्टारने दुसऱ्या सामन्यात आपल्या प्रतिस्पर्ध्याला पांढऱ्या सोंगट्यांसह हरवून उपांत्य फेरीत १.५-०.५ असा विजय मिळवला.

दिव्या देशमुखने डावाच्या मध्यभागी झोंगी हिच्या एका चुकीवर दोन-प्यादा आघाडी मिळवून क्वीन्सची देवाणघेवाण केली. थोड्या वेळाने तिचे स्थान गमावल्यानंतर, दिव्याने तिचा फायदा पुन्हा मिळवला आणि त्यातून बचाव केला. तिच्या प्रतिस्पर्ध्याने आक्रमक खेळ केल्यानंतर टिंगजीने अखेर राजीनामा दिला.

दुसऱ्या उपांत्य फेरीत, भारताची कोनेरू हम्पी आणि चीनची लेई टिंगजी यांनी सलग दुसऱ्यांदा बरोबरी साधली आणि गुरुवारी खेळवण्यात येणाऱ्या टायब्रेकमध्ये प्रवेश केला. (वृत्तसंस्था)

# सात्त्विक-चिराग उपांत्यपूर्व फेरीत

### चायना ओपन बॅडमिंटन

**चांगझोऊ, २४ जुलै**

येथे सुरु असकलेल्या चायना ओपन सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेत गुरुवारी सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी या भारताच्या अव्वल पुरुष दुहेरी जोडीने इंडोनेशियाच्या लिओ रोली कार्नांडो व बागास मौलाना या जोडीवर सरळ गेममध्ये विजय मिळवत स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. छुरुष एकेरीत एच. एस. प्रणॉयचे आव्हान संपुष्टात आले.




माजी प्रथम विश्वमानांकित भारतीय जोडीने रणनीतिक शिस्त आणि संयम दाखवत चुरशीच्या सामन्यात आठव्या मानांकित इंडोनेशियन जोडीवर २१-१९, २१-१९ असा विजय मिळवला.

पण एच. एस. प्रणॉयसाठी हा शेवटचा मार्ग होता. पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात प्रणॉयला चीन तैपेईच्या सहाव्या मानांकित चाऊ तिएन चेनकडून २१-१८, १५-२१, ८-२१ असा पराभव पत्करावा लागला.

दोन्ही गेममध्ये वारंवार बदल होत असल्याने सात्त्विक व चिरागला विजयासाठी कठोर परिश्रम करावे लागले.

पहिल्या गेममध्ये, इंडोनेशियन जोडीने ८-६ आणि नंतर १४-१२ अशी थोडी आघाडी घेतली होती, परंतु भारतीय जोडीने स्वतःला स्पर्श करण्याच्या अंतरावर ठेवले. १४-१६ पासून भारतीय जोडीने सलग पाच गुण मिळवत १९-१६ अशी आघाडी घेतली आणि पहिला गेम संपवला. दुसऱ्या गेममध्येही अशीच पद्धत होती, लिओ व बागासने एका टप्प्यावर १४-१० अशी आघाडी घेतली. परंतु भारतीय जोडीने जोरदार मुसंडी मारत १८-१८ अशी बरोबरी साधली व शेवटच्या टप्प्यात त्यांची हिंमत रोखून सामना जिंकला.

हा सामना खूपच गोंधळलेला होता. सामन्यात अनेक चढ-उतार होते. आमच्याकडे खरोखर मोठी आघाडी नव्हती व त्यांनाही नव्हती. सलग ३-४ गुण मिळवल्यामुळे पहिला गेम संपवण्यात यश आले, असे चिराग म्हणाला. (वृत्तसंस्था)

# भार्गव राम-विश्व तेजची आगेकूच

### बॅडमिंटन आशिया कनिष्ठ वैयक्तिक अजिंक्यपद स्पर्धा • तन्वी शर्मा, वेन्नाला कलागोटला उपांत्यपूर्व फेरीत

**सोलो, २४ जुलै**

इंडोनेशियातील सोलो येथे झालेल्या बॅडमिंटन आशिया कनिष्ठ गट वैयक्तिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या युवा बॅडमिंटनपटूंनी आपली प्रभावी कामगिरी सुरू ठेवली. तन्वी शर्मा, वेन्नाला कलागोटला व पुरुष दुहेरीत अव्वल मानांकित भार्गव राम आणि विश्व तेज या जोडीने आपली आगेकूच कायम राखली.


भार्गव राम-विश्व तेज

महिला एकेरी गटात दुसऱ्या मानांकित तन्वी शर्माने आपले वर्चस्व दाखवत ३२ व्या फेरीत चीनच्या शी सी चेनवर २१-१९, २१-१४ असा विजय मिळवला आणि त्यानंतर १६ व्या फेरीत थायलंडच्या फन्नाचेट पासा-ऑर्नवर २१-१४, २१-१५ असा विजय मिळवला. दरम्यान, वेन्नालाने सलग दुसऱ्या दिवशी सलग दोन फेऱ्या जिंकून अंतिम आठमध्ये स्थान निश्चित केले.

पुरुष दुहेरीत, अव्वल मानांकित भार्गव राम व विश्व तेजने जपानच्या हारू मासुदा आणि शोगो मियाशिता या जोडीचा २१-१५, २१-१५ असा सहज पराभव करून १६ व्या फेरीत प्रवेश केला. अव्वल विश्वमानांकित भारतीय जोडीला आता उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवण्यासाठी चीनच्या वेन झिन व वेई गँग झेंग या जोडीशी सामना करावा लागेल.

पुरुष एकेरीत, रौनक चौहानने थायलंडच्या उत्चन रुयसॅपवर २५-२३, २१-१८ असा विजय मिळवला, तर अंश नेगीने व्हिएतनामच्या ले मिन्ह सनवर २१-१४, २१-१६ असा विजय मिळवला आणि दोघेही १६ व्या फेरीत पोहोचले.

महिला दुहेरीत, वेन्नाला कलागोटला व रेशिका यू या जोडीने हाँगकाँगच्या चीनच्या औ-येउंग विंग ची आणि यी किउ यू यांचा २१-७, २१-१६ असा पराभव करून १६ व्या फेरीत प्रवेश केला.

दरम्यान, प्रणव राम नागालिंगमने १६ व्या फेरीत आपला प्रवास संपवला, तर हिमार लालथाझुआला, तन्वी रेड्डी अंडलुरी आणि विष्णू केदार कोडे आणि कीर्ती मंचला या मिश्र दुहेरी जोडीला ३२ व्या फेरीत पराभव पत्करावा लागला. (वृत्तसंस्था)

# भारतीय पुरुष संघ इंग्लंडमध्ये ५ टी-२०, ३ वन-डे सामने खेळणार

### महिला संघ ३ टी-२०, एकमेव कसोटी सामना खेळणार

**मॅन्चेस्टर, २४ जुलै**

भारतीय संघ पुढील वर्षी व्हाईट-बॉल दौऱ्यासाठी इंग्लंडला जाणार असून या दौऱ्यामध्ये पाच टी-२० आणि तीन एकदिवसीय सामने असतील, असे इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट मंडळाने (ईसीबी) गुरुवारी जाहीर केले.



भारताचा दौरा १ जुलै रोजी डरहम येथे टी-२० क्रिकेट सामन्याने सुरू होईल, त्यानंतर मॅन्चेस्टर (४ जुलै), नॉटिंगहॅम (७ जुलै), ब्रिस्टल (९ जुलै) आणि साऊदम्पटन (११ जुलै) येथे सामने होतील.

दोन्ही संघांमधील तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका १४ जुलैपासून बर्मिंगम येथे सुरू होईल, त्यानंतर १६ जुलै रोजी कार्डिफ येथे सामने होतील व १९ जुलै रोजी लॉर्ड्स येथे सामने होतील.

भारतीय महिला संघ इंग्लंड महिला संघासोबत तीन सामन्यांची टी-२० मालिका आणि एक कसोटी सामना देखील खेळेल. टी-२० मालिका २८ मे रोजी चेम्सफोर्ड येथे सुरू होईल, त्यानंतर ३० मे रोजी ब्रिस्टल आणि २ जून रोजी टॉन्टन येथे सामने होतील. एकमेव कसोटी १० जुलैपासून लॉर्ड्स येथे खेळवली जाईल.

बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखालील इंग्लंडचा पुरुष कसोटी संघ न्यूझीलंड आणि पाकिस्तानचे दोन रोथेसे कसोटी मालिकेत स्वागत करेल, तर हॅरी ब्रुकचा व्हाईट-बॉल संघ भारताशिवाय श्रीलंकेचे एकदिवसीय आणि टी-२० सामन्यांमध्ये यजमानपद भूषवेल.

२०२६ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा एक शानदार उन्हाळा कसा असेल हे उघड करण्यास आम्हाला खरोखर उत्सुकता आहे. जागतिक दर्जाचे प्रतिस्पर्धी संघ देशभरातील प्रतिष्ठि ठिकाणी भेट देत असल्याने, चाहत्यांना पुरुष व महिलांच्या सर्वोत्तम खेळाचे साक्षीदार होण्याची संधी मिळेल, असे ईसीबीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रिचर्ड गोल्ड यांनी म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# उन्नती हुडाची सिंधूवर मात

**चांगझोउ, २४ जुलै**

एका उच्च- सर्व भारतीय सामन्यात १७ वर्षीय उन्नती हुडाने दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी. त्रही. सिंधूला हरवून गुरुवारी चायना ओपन २०२५ च्या महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले.

महिला एकेरीच्या अंतिम सोळाव्या फेरीच्या सामन्यात उदयोन्मुख स्टार उन्नती हुडाने अनुभवी विजेती सिंधूशी सामना केला. हुडाने जोरदार सुरुवात केली, पहिला गेम २१-१६ असा जिंकला, परंतु सिंधूने दुसऱ्या गेममध्ये पुनरागमन केले आणि तणावपूर्ण गेममध्ये २१-१९ असा विजय मिळवला व सामन्यात बरोबरी साधली. निर्णायक गेममध्ये उन्नती हुडाने उल्लेखनीय खेळ दाखवत २१-१३ असा सामना जिंकून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. आता



उन्नती हुडाचा सामना जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकाची व तिसऱ्या मानांकित जपानची अकाने यामागुचीशी होईल. (वृत्तसंस्था)

# जागतिक मुष्टियुद्ध चषक पदक विजेत्यांसाठी १७.५ लाखांची बक्षिसे

**नवी दिल्ली, २४ जुलै**

ब्राझील आणि कझाकस्तानमध्ये नुकत्याच झालेल्या जागतिक मुष्टियुद्ध चषक स्पर्धेत पदके जिंकणाऱ्या १७ भारतीय खेळाडूंना रोख बक्षीस देण्यासाठी भारतीय मुष्टियुद्ध महासंघाने (बीएफआय) १७.५ लाख रुपयांची बक्षीस रक्कम जाहीर केली आहे.

या वर्षाच्या अखेरीस नवी दिल्ली येथे होणाऱ्या जागतिक मुष्टियुद्ध चषकात अंतिम फेरीपर्यंत मजल मारणाऱ्या प्रत्येक सुवर्णपदक विजेत्याला २ लाख रुपये, रौप्यपदक विजेत्याला १ लाख रुपये आणि कांस्यपदक विजेत्याला ५०,००० रुपये मिळतील. सध्या राष्ट्रीय कोर गट सप्टेंबरमध्ये लिव्हरपूलमध्ये होणाऱ्या जागतिक मुष्टियुद्ध स्पर्धा आणि नंतर मायदेशात होणाऱ्या जागतिक मुष्टियुद्ध चषक फायनल या दोन महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या तयारीसाठी पतियाळा येथे प्रशिक्षण शिबिर सुरु असताना ही घोषणा करण्यात आली. जागतिक स्तरावर त्यांच्या शानदार कामगिरीबद्दल मी आमच्या खेळाडूंचे अभिनंदन करू इच्छितो. (वृत्तसंस्था)

# सोलापुरात वरिष्ठांच्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धा आजपासून

### ३१ जुलैपर्यंत जिल्हा क्रीडा संकुल व इलिझियम क्लबच्या मैदानावर स्पर्धा होणार

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. २४ जुलै-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत व अखिल भारतीय लॉन टेनीस संघटनेच्या अधिपत्याखाली वरिष्ठांच्या चौथ्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेस शुक्रवार २५ जुलैपासून सोलापुरात सुरुवात होईल.

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलातील एम.एस.एल.टी.ए. टेनिस सेंटर व इलिझियम क्लबच्या मैदानावर सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत ३१ जुलैपर्यंत या स्पर्धा होतील. पुरुष, महिलांच्या एकेरी, दुहेरी व मिश्र दुहेरी या प्रकारात ही स्पर्धा होईल. या स्पर्धेत ३५ ते ८० वर्षापुढील पुरुष तर ३० ते ५० वर्षापुढील महिला सहभागी होतील. देशातून १७५ खेळाडू या स्पर्धेत सहभागी होतील. या स्पर्धेचे आयोजन सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने केले आहे. खेळाडूंच्या पिण्याच्या पाण्याची सोय स्पेनका कंपनीने केली आहे.

या स्पर्धेचे उदघाटन शुक्रवार २५ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजता आमदार देवेंद्र कोठे व जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांच्या हस्ते होईल. या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय टेनिस फेडरेशनने पर्यवेक्षक म्हणून पुण्याच्या वैशाली शेकटकर यांची, स्पर्धा संचालक म्हणून मुंबईच्या डोसा रामाराव यांची तर एम.एस.एल.टी.ए चे संयुक्त मानद सचिव राजीव देसाई यांच्यावर स्पर्धा व्यवस्थापनाची जबाबदारी सोपविली आहे. स्पर्धेतील खेळाडूना आंतरराष्ट्रीय गुण मिळणार आहे.

#### जागतिक मास्टर्स स्पर्धेसाठी निवड होणार

या स्पर्धेची लोकप्रियता देशभरात दिवसेंदिवस वाढत चालली असून जानेवारी ते जुलै २०२५ या कालावधीत १३ जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक वयोगटातील सर्वाधिक गुण प्राप्त केलेल्या प्रथम ४ खेळाडूंची पोर्तुगाल येथे जानेवारी २०२६मध्ये होणाऱ्या जागतिक मास्टर्स स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड केली जाणार आहे.

# विश्वचषकापूर्वी महिला क्रिकेटपटूंचा आत्मविश्वास वाढेल : तेंडुलकर

**नवी दिल्ली, २४ जुलै**

इंग्लंडसारख्या आव्हानात्मक ठिकाणी भारतीय महिला क्रिकेट संघाने मिळवलेल्या दुहेरी मालिका विजयामुळे दोन मोठ्या विश्वचषकापूर्वी भारतीय महिला क्रिकेट संघाचा आत्मविश्वास लक्षणीयरीत्या वाढेल, असा विश्वास महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने व्यक्त केला.

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघाने टी-२० सामन्यात ३-२ असा विजय मिळवून इतिहास घडवला. हा भारताचा इंग्लंडच्या भूमीवरचा पहिला मालिका विजय होता आणि त्यानंतर एकदिवसीय सामन्याचा टप्पा २-१ असा जिंकला.

भारतीय महिला क्रिकेट संघ ३० सप्टेंबरपासून श्रीलंकेसोबत एकदिवसीय विश्वचषक आणि त्यानंतर २०२६ चा इंग्लंडमध्ये होणारा टी-२० विश्वचषक सह-यजमानपदासाठी सज्ज असल्याने या विजयांना अधिक महत्त्व आहे.

इंग्लंडमध्ये विजय मिळवणे नेहमीच एक आव्हान असते आणि टी-२० सामन्यात आणि एकदिवसीय सामन्यांमध्ये ते करणे संघाच्या तयारी आणि मानसिकतेबद्दल बरेच काही सांगते, असे तेंडुलकर म्हणाला.



या कामगिरीमुळे संघाला पुढे जाण्यासाठी खूप आत्मविश्वास मिळेल. जवळ दोन विश्वचषक आहेत, त्यामुळे त्यांच्या विश्वासासाठी हे महत्त्वाचे ठरेल. भारतीय महिला संघ छान खेळला, असे तो म्हणाला.

भारत आता १४ सप्टेंबरपासून घरच्या मैदानावर होणाऱ्या विश्वचषकापूर्वीच्या त्यांच्या शेवटच्या सामन्यात विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध तीन सामन्यांच्या मालिकेत यजमानपद भूषवण्यासाठी सज्ज झाला आहे.

तेंडुलकरने या मालिकेचे कौतुक सामूहिक धैर्याचे प्रतीक म्हणून केले.

उपकर्णधार स्मृती मंधानाने सलामीच्या सामन्यात आपले पहिले टी-२० शतक झळकावले, तर कर्णधार कौरने एका भव्य शतकासह तिच्या सर्वोत्तम खेळांना वाचवले जे मालिकेचा निर्णायक एकदिवसीय सामन्यात भारताच्या विजयाचा आधारस्तंभ बनले.

२१ वर्षीय क्रांती गौडने विक्रमी सामन्यांमध्ये आपले नाव नोंदवले, ती सर्वात तरुण भारतीय वेगवान गोलंदाज आणि तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात सहा बळी टिपणारी एकूण पाचवी गोलंदाज ठरली.

पहिल्या टी-२० मध्ये स्मृतीने झळकावलेल्या शतकाने दौऱ्याच्या सुरुवातीलाच एक वेगळीच सुरुवात केली. शेवटच्या एकदिवसीय सामन्यात हरमनप्रीतने केलेल्या शतकानेही त्या गतीचा आधार घेतला. त्यानंतर क्रांती (गौड) नेही चेंडूने सुंदर कामगिरी केली आणि दबावाच्या परिस्थितीत सहा बळी घेतले. इतरांनीही आपापली भूमिकायोग्यरीत्या बजावली, दोन्ही मालिकांमधील महत्त्वाच्या क्षणांमध्ये तेजी दाखवली, असे तेंडुलकर म्हणाला. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# जि.प.कडून १२४ अनुकंपाधारकांची समुपदेशनाने पारदर्शक पदभरती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जुलै**

अनुकंपा भरती प्रक्रियेत जिल्हा परिषदेकडून १२४ पदांची अनुकंपा पदांची भरती यशस्वी समुपदेशनाद्वारे केल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी राबविल्याबद्दल कौतुक होत आहे.

जिल्हा परिषद सोलापूर यांनी १२४ अनुकंपा पदांची भरती अत्यंत पारदर्शक आणि न्याय्य पद्धतीने, समुपदेशनाच्या माध्यमातून यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. या प्रक्रियेमुळे प्रशासनातील विश्वासार्हता आणि कार्यक्षमतेचे उत्तम उदाहरण समोर आले आहे.

अनुकंपा तत्वावर भरती ही एक संवेदनशील प्रक्रिया असून, तिच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणि न्यायाचा तत्वधाराच असणे आवश्यक असते. याच अनुषंगाने जिल्हा परिषदेने संपूर्ण प्रक्रिया वर्तमानपत्र जाहिरात, अर्ज छाननी, सूची प्रसिद्धी आणि प्रत्यक्ष समुपदेशन अशा टप्प्यांमधून पार पाडली. यामध्ये कोणतीही अस्पष्टता न ठेवता, अर्जदारांना संधी आणि माहिती दोन्ही समप्रमाणात उपलब्ध करून देण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांचे यामध्ये विशेष योगदान राहिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि वेळेवर पार पडली.

या भरती प्रक्रियेमुळे १२४ अनुकंपा तत्वाखाली पात्र उमेद्वारांना आर्थिक स्थैर्य मिळाले असून, जिल्हा परिषदेची लोकाभिमुख आणि संवेदनशील प्रशासनाची प्रतिमा अधिक दृढ झाली आहे. या अनुकंपा भरती प्रकियेसाठी प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे,सचिन साळुंखे प्रदीप सगट, महेश केंद्रे, शिवाजी राठोड, सचिन मायनाळ,अरविंद सोनवणे, मोहित वाघमारे, संतोष शिंदे, तुषार इटकर, किरण जाधव, ऋषिकेश जाधव, इराण्णा भरडे, हनुमंत गायकवाड, कृष्णा आधटराव रोहीत शिंदे, गणेश वटवटे, आदम नाईक परीश्रम घेतले.

महाराष्ट्र शासन अंगिकृत **पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे**
**(म्हाडाचा विभागीय घटक)**
म्हाडा MHADA
गृहनिर्माण भवन, (अलंकार थिएटरच्यामागे) आगरकर नगर, पुणे ४११००१. फोन : ०२०-२६१२१८३०
निविदा/का.अ.२/पुणे/३१/२०२५-२६
**पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे यांच्या अखत्यारितील खालील काम करणे आहे.**

| कामाचे नाव | निविदा रक्कम | कालावधी | अनामत रक्कम | निविदा विक्री रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| अभिन्यास क्र. १७/८५ भूखंड क्र.२, स.क्र.३२१/१ब(जुना) स.क्र.१२३/१ब (नवीन), मजरेवाडी समर्थ नगर जुळे सोलापूर भाग १ संरक्षण भिंत बांधणेचे काम | रु. ८,७०,८६६/- (जीएसटी वगळून) | ०२ महिने (पावसाळा ऋतुसह) | रु. ९,०००/- | रु. ५९०/- (जी.एस.टी.सह) |

**कोऱ्या निविदा विक्री दि. २५.०७.२०२५, स.११.०० पासुन दि. ०१.०८.२०२५, दु. ०१.०० वा. पर्यंत मोहरबंद निविदा स्विकृती दि. २५.०७.२०२५, दु. १२.०० पासुन दि. ०१.०८.२०२५, दु.३.०० वा. पर्यंत, मोहरबंद निविदा उघडण्याचा दि. ०१/०८/२०२५ सायं. ०५ वाजता** अनामत रकमेसह मोहरबंद निविदा वरील पत्यावर स्वीकारल्या जातील व दि. ०१/०८/२०२५ सायं. ०५ वाजता कार्यकारी अभियंता-२/ पुणे मंडळ, यांचे कार्यालयात उघडण्यात येतील. एक किंवा सर्व निविदा कोणतीही पुर्वसूचना न देता किंवा कारणे न देता फेटाळण्याचा अधिकार मंडळास राहील.

स्वाक्षरीत /-
दि. २५.०७.२०२५ — कार्यकारी अभियंता- २/पुणे मंडळ

**PUNYASHLOK AHILYADEVI HOLKAR SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR**
**APPOINTEMENT OF TEMPORARY TEACHING POSTS**
(Maharashtra Public Universities Act, 2016 Under Section 103 & Self Supporting) Advt. No.: PAHSUS/Estt/TP-CB-02/2025/268
**Advertisement for Temporary Contract Basis Teaching Posts**

Applications are invited for the post of Assistant Professor on a purely temporary contract basis for the Academic year 2025-26 in various post Graduate Schools of the Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur. The detailed information regarding qualifications, experience, specialization, application form and other relevant instructions is available on University website http://sus.ac.in.

**The soft copy of application should be sent on the email advjuly2025@sus.ac.in last date 30th July, 2025 at 11:00 pm.**

Sd/-
**[Dr. Atul Lakde]**
**I/c REGISTRAR**

Ref No.: PAHSUS/Estt/TP-CB-02/2025/-5960
Date: 24/07/2025

Khadi India

**बेरोजगार युवक/युवति/महिला/कारागिरांकरिता स्वयम रोजगाराची सुवर्ण संधी**

खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचा मूळ उद्देश रोजगार देणे, विक्रीसाठी वस्तूंचे उत्पादन आणि जनते मध्ये आत्मनिर्भरता तसेच सुदृढ ग्राम स्वराज्याची भावना निर्माण करणे हा आहे. राज्य कार्यालय, खादी आणि ग्रामोद्योग आयोग, मुंबई यांच्या वतीने ग्रामोद्योग विकास योजनेअंतर्गत १८ ते ५५ वर्षे वयोगटातील बेरोजगार युवक/युवती/महिला/विविध क्षेत्रामध्ये काम करीत असणाऱ्या कारागिरांकडून खालील तक्त्यानुसार विविध कार्यक्रम/उद्योगांअंतर्गत अर्ज मागविले जात आहेत.

| अ. क्र. | कार्यक्रम/ उद्योगाचे नाव | कार्यक्षेत्राच्या अंतर्गत दिले जाणारे प्रशिक्षण तसेच वितरित केले जाणाऱ्या टूलकिट/यंत्रांचे विवरण वर्ष २०२५-२६ साठी |
|---|---|---|
| १ | एम बी आय | विद्युतचलित कुंभार चाक |
| २ | सेवा क्षेत्र | इलेक्ट्रिशियन/प्लंबर/शिलाई मशीन/मोबाईल दुरुस्ती |
| ३ | ए बी एफ पी आय | फ्रूट अँड व्हेजिटेबल/व्हिलेज ऑइल/ताड गुळ |
| ४ | रेन्टी | वेस्ट वुडच्या अंतर्गत |
| ५ | हनी मिशन | मधमाशी पालन |
| ६ | एच एम पी एफ आय | पेपर/द्रोण पत्रावळी मशीन |
| ७ | पी सी बी आय/ डब्ल्यू सी आय | ऑटोमॅटिक अगरबत्ती मशीन |
| ८ | पी सी बी आय | लेदर/फुटवेअर मशीन व टूलकिट |

टीप : १) सदर योजने अंतर्गत सामान्य / ओबीसी प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी मशीन किंमतीच्या २० टक्के, अजा/अज लाभार्थ्यांसाठी मशीन किंमतीच्या १० टक्के आणि बीपीएल धारकांना शून्य टक्के लाभार्थी हिस्सा (own contribution) कार्यालयामध्ये जमा करावे लागतील. २) प्रथम प्राप्त अर्जांना प्राधान्य दिले जाईल. ३) लाभार्थ्यांची निवड राज्यस्तरीय समितीद्वारे केली जाईल, समितीचा निर्णय अंतिम तसेच बंधनकारक असेल. आपले अर्ज खालील दिलेल्या पत्त्यावर व ई-मेल वर पाठवावे.

- संचालक

**खादी आणि ग्रामोद्योग आयोग**
(सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकार)
नॅशनल इंशुरंस बिल्डिंग, ४था मजला, १४ जे.टी. रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०
टेलि/फेक्स: +९१ २२ २२८१७४४९ ई-मेल: somkvicbom@yahoo.com

## सहायक गटविकास अधिकारी विजय विभुते यांची गटविकास अधिकारीपदी पदोन्नती

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. २४ जुलै-**



येथील पंचायत समिती सहायकगटविकास अधिकारी विजय बबनराव विभुते यांची महाबळेश्वर (जि. सातारा) येथे गटविकास अधिकारी वर्ग-१ या पदावर पदोन्नतीने बदली झाली आहे. यामुळे अक्कलकोट येथील सहायक गट विकास अधिकारी पद पुन्हा रिक्त झाले आहे. गटविकास अधिकारी विभुते यांनी १९९५ पासुन पंचायत समिती कराड येथे विस्तार अधिकारी पदावर नोकरीची सुरवात केली. २०१९ पासुन ते सहायक गटविकास अधिकारी पंचायत समिती पाटण, कराड, खटाव येथे कार्यरत होते. यानंतर श्री क्षेत्र अक्कलकोट पंचायत समिती येथे सहाय्यक गटविकास अधिकारीपदी कार्यरत होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडळ**
**विविध विद्युत कामे**

मध्य रेल्वे, सोलापूरचे वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) यांनी भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वरून खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत: ई-निविदा सूचना क्रमांक: SUR/TD/T/2025/05R. मोहोळ-दुधनी विभागात अक्कलकोट रोड-नागनसूर दरम्यान किमी (1) 494/6-7 येथे प्रस्तावित भुयारी मार्गाच्या संबंधात कामाचे नाव. (2) मोहोळ-दुधनी विभागात नागनसूर-बोरोटी दरम्यान 501/6-7, दुधनी यार्ड येथील हायड्रॉलिक ब्रिज क्रमांक 517/3-4 द्वारे सार्वजनिक वाहतूक टाळण्यासाठी 517/8-9. (4) दुधनी-वाडी विभागात पुशिंग पद्धतीने कुलाली-गौडगाव दरम्यान 528/4-5. (पुन्हा आमंत्रण) अंदाजे खर्च: 49,36,353.18. बोली सुरक्षा: 98,700/-. पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. ऑफरची वैधता: 60 दिवस.

**कामः** इलेक्ट्रिकल TRD भाग वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 20/08/2025 15.00 वाजता.

Sr.DEE (TRD) सोलापूर

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

Sai/SUR/53

**CHANGE OF NAME**

I Here by Declare that my Old Name is **RUDRAVIJAY SHANTLING AYYA SWAMI** has been change as New name **RUDRAVIJAY SHANTLING** SWAMI Infront of Executive Magistrate Akklakot Affidivite No. 10110/2025 Date 23.07.2025

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांना जाहीर नोटीसीने कंळविण्यांत येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डिाा व सब डिाा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर महानगरपालिकेच्या नवीन हद्दवाढ भागातील नेहरु नगर येथील जुना सर्व्हे नं. ३५१/२ ब यांसी नवीन सर्व्हे नं. ७/२/ब यापैकी स्वामी विवेकानंद नगर भाग-२ या नावाने ओळखले जाणारे नगरातील प्लॉट नं. १ याचे क्षेत्र १५००० चौरस फुट इतकी आहे. यांसी, चतुः सिमा पुर्वेस - रस्ता, दक्षिणेस- प्रतापनगर रस्ता, पश्चिमेस - रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं. १८० व १८१.

वर नमूद प्लॉट ज़ांगा मिळकत जीवन शिवा लमाण यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. त्यांनी सदर वर नमूद मिळकत आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून, आमचे अशिलांकडून रक्कम स्विकारुन, आमचे अशिलांचे नांवे इसारा पावतीचा दस्त लिहून दिला आहे.

वर नमूद मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, अशी मिळकत मालकांनी आमचे अशिलांना खात्री. व भरवसा दिले आहे. तरी परंतु वरील मिळकतीबाबत कोणाचा गहाण, दान, लिज, टाच, बक्षीस पत्र, साठेखत, खरेदीखत, कुलमुखत्यारपत्र, नोटरी करार-मदार, इसारा, पावती, कब्जा साठेखत, पोटगी, कोर्ट केस, बँक कर्ज बोजा, तसेच सहकारी संस्था वगैरे कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत लेखी कागदपत्राचे पुराव्यानिशी खालील नमुद पत्त्यावर येवून आमचे अशिलाची खात्री करुन दयावी.

मुदतीत कुणाचीही तक्रार व हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून खरेदी व्यवहार. पूर्ण करतील. मग तद्नंतर सदर वर नमुद मिळकतीबाबत व मालकीबाबत् कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत व तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. ता. २४/०७/२०२५.

**सही/-**
**विश्वनाथ एच. मगी**
**(बी.एस.एल.एलएल.बी.) ॲडव्होकेट**
**पत्ता : युनिटी ड्रीम अपार्टमेंट प्रेम नगर, विजापूर रोड, जुळे सोलापूर -४१३००४**
**मो.नं. ९८९०५४३९२९**

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे दहिटणे, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील गांवच्या लोकांना कळिवण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन डि. व सब डि. सोलापूर पैकी ता. बार्शी पैकी मौजे दहिटणे हद्दीतील शेतजमीन याचा गट नं.१२३ चे एकुण क्षेत्र ०२ हे.२२ आर पो. ख. ० हे. ०० आर, आकार ५ रु.२३ पैसे, यापैकी पश्चिम आणि दक्षिण उत्तर गटा लगतच्या बाजूची नंदा बाबासाहेब लोखंडे यांचे क्षेत्र ० हे. ६८ आर आकार १ रु. ६० पैसे पैकी ० हे ३८ आर आणि बाबासाहेब डोलाप्पा लोखंडे यांचे ० हे ८० आर आकार १ रु ८९ पैसे पैकी ० हे ५० आर यासी चतुःसिमा पुर्वेस :-गट नंबर १२४ ची जमीन, दक्षिणेस गट नं. १२१ ची जमीन, पश्चिमेस : तडवळे गांवची शिव व कॅनल, उत्तरेस :- गट नं. १२९ ची जमीन व कॅनल येणेप्रमाणे चतुः सिमेची शेतजमिन आतील सर्व झाडझुडूपे वस्ती वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कांसह.

उपरोक्त वर्णन केलेली शेतजमीन ही बाबासाहेब डोलाप्पा लोखंडे आणि सौ. नंदा . बाबासाहेब लोखंडे यांच्या स्वतंत्र मालकी व कब्जेवहिवाटीची होती व आहे व आजरोजी प्रत्यक्ष मालकी हक्कात व कब्जेवहिवाटीत आहे. विद्यमान मालकांनी सदरची शेतजमीन त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेली आहे. सदर शेतजमीन मिळकत खरेदी घेण्याबाबत आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्या दरम्यान सदर शेतजमीन मिळकत खरेदी घेणेबाबत बोलणे झालेले असून खरेदी देणाऱ्यांनी आमचे अशिलाकडून इसार म्हणून काही रक्कमेचा मोबदला स्वीकार केलेला आहे. सदर शेतजमीन मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची खरेदी देण्याची ग्वाही व भरवसा शेतजमीन मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे.

तरी वर नमुद शेतजमीनीवर कोणाचा हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास सदर शेतजमीन संदर्भात कोणी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, बँक बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर शेतजमीनवर कोणाचा बोजा हक्क, हितसंबंध असल्यास तसेच मोजणी संबंधी काही तक्रारी, हरकती असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्यावर कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर शेतजमीन निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदी पुर्व जाहीर नोटीस दिली असे. ता. २२/०७/२०२५

**सही/-**
**प्रविणकुमार कल्लाप्पा बुध्देहाळकर**
**(बी.ए.एलएल.बी.) ॲडव्होकेट**
**मो.नं. ७७२०९९२७०६ / ९०९६२२९१६१**
**मु.पो. डोणज, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर.**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

### उपनिबंधक, सहकारी संस्था सोलापूर शहर, सोलापूर
### सोलापूर जिल्हा महसुल कर्मचारी सहकारी पतसंस्था नियमित सोलापूर, सिटी सर्व्हे नं ८४१३ दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी अवार, सोलापूर ४१३००३

**श्री पंचमुखी हनुमान नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शेळगी, सोलापूर -- अर्जदार**
**विरूध्द**
**(खालील तपशीलातील नमूद केलेले थकबाकीदार सभासद)**

| अ. क्र. | दावा क्र. | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ५९७/२०२५ | १०६८१/- | १<br>३<br>४ | **लक्ष्मी संजय धोत्रीकर** १०२ बी भवानीपेठ, साई गणेश मंदीर जवळ, सोलापूर ४१३००२ मो. ९४८२९२५४४५<br>**संगीता मोहन पंधारकर** विदयानगर जनता बँक जवळ, शेळगी, सोलापूर ४१३००६<br>**प्रभावती मल्लिनाथ हिंगमिरे** विदयानगर, शेळगी, सोलापूर ४१३००६ |
| २ | ५९८/२०२५ | २००२१/- | १<br>३<br>४ | **प्रभावती मल्लिनाथ हिंगमिरे** विदयानगर, शेळगी, सोलापूर ४१३००६<br>**लक्ष्मी संजय धोत्रीकर** १०२ बी भवानीपेठ, साई गणेश मंदीर जवळ, सोलापूर ४१३००२ मो. ९४८२९२५४४५<br>**संगीता मोहन पंधारकर** विदयानगर जनता बँक जवळ, शेळगी, सोलापूर ४१३००६ |
| ३ | ५९९/२०२५ | ३९५५६/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **मंजुळा राजदत्ता रासोलगिकर** १०२ ई १८ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९९२३३९३३२९<br>**विजयालक्ष्मी चंद्रकांत करजगी** १०२ ई १९ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२<br>**शांताबाई मल्लिकार्जुन माळगे** ९०/जी १/४१ भवानीपेठ, वैदयवाडी, सोलापूर ४१३००२<br>**शिवकांता निलकंठ कोळी** १०२ ई १६ घोंगडे वस्ती, भवानीपेठ, सोलापूर ४१३००२<br>**महानंदा सिद्राम रासोलगीकर** १०२/१८ ई घोंगडे वस्ती, भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ |
| ४ | ६००/२०२५ | ३९५५६/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **शिवकांता निलकंठ कोळी** १०२ ई १६ घोंगडे वस्ती, भवानीपेठ, सोलापूर ४१३००२<br>**विजयालक्ष्मी चंद्रकांत करजगी** १०२ ई १९ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२<br>**मंजुळा राजदत्ता रासोलगिकर** १०२ ई १८ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९८२३३९३३२९<br>**महानंदा सिद्राम रासोलगीकर** १०२/१८ ई घोंगडे वस्ती, भवानीपेठ, सोलापूर ४१३६०२<br>**शांताबाई मल्लिकार्जुन माळगे** ९०/जी १/४१ भवानीपेठ, वैदयवाडी, सोलापूर ४१३००२ |
| ५ | ६०१/२०२५ | ४२७५६/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **शांताबाई मल्लिकार्जुन माळगे** ९०/जी १/४१ भवानीपेठ, वैदयवाडी, सोलापूर ४१३००२<br>**शिवकांता निलकंठ कोळी** १०२ ई १६ घोंगडे वस्ती, भवानीपेठ, सोलापूर ४१३००२<br>**विजयालक्ष्मी चंद्रकांत करजगी** १०२ ई १९ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२<br>**मंजुळा राजदत्ता रासोलगिकर** १०२ ई १८ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९९२३३९३३२९<br>**महानंदा सिद्राम रासोलगीकर** १०२/१८ ई घोंगडे वस्ती, भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ |
| ६ | ६०२/२०२५ | ३९५५६/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **विजयालक्ष्मी चंद्रकांत करजगी** १०२ ई १९ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२<br>**मंजुळा राजदत्ता रासोलगिकर** १०२ ई १८ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९९२३३९३३२९<br>**शांताबाई मल्लिकार्जुन माळगे** ९०/जीं १/४१ भवानीपेठ, वैदयवाडी, सोलापूर ४१३००२<br>**महानंदा सिद्राम रासोलगीकर** १०२/१८ ई घोंगडे वस्ती भवानीपेठ, सोलापूर ४१३००२<br>**शिवकांता निलकंठ कोळी** १०२ ई. १६ घोंगडे वस्ती, भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ |
| ७ | ६०३/२०२५ | ३९५६६/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **महानंदा सिद्राम रासोलगीकर** १०२/१८ ई घोंगडे वस्ती भवानीपेठ, सोलापूर ४१३००२<br>**शिवकांता निलकंठ कोळी** १०२ ई १६ घोंगडे वस्ती, भवानीपेठ, सोलापूर ४१३००२<br>**शांताबाई मल्लिकार्जुन माळगे** ९०/जी १/४१ भवानीपेठ, वैदयवाडी, सोलापूर ४१३००२<br>**मंजुळा राजदत्ता रासोलगिकर** १०२ ई १८ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९९२३३९३३२९<br>**विजयालक्ष्मी चंद्रकांत करजगी** १०२ ई १९ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ |
| ८ | ६०४/२०२५ | १८१३४/- | ३ | **प्रतिभा सुभाष वाघमारे** ८३ बुध्दविहीर भवानीपेठ, मड्डी वस्ती सोलापूर ४१३००२ |
| ९ | ६०५/२०२५ | ८६४३/- | २<br>३ | **प्रतिमा सुभाष वाघमारे** ८३ बुध्दविहीर भवानीपेठ, मड्डी वस्ती सोलापूर ४१३००२<br>**रंजना दरेप्पा मानवे** ९० बी विदयानगर, शेळगी, सोलापूर ४१३०० |
| १० | ६०६/२०२५ | १८१३४/- | १ | **प्रतिभा सुभाष वाघमारे** ८३ बुध्दविहीर भवानीपेठ, नड्डी वस्ती सोलापूर ४१३००२ |
| ११ | ६०७/२०२५ | १८१३४/- | ३ | **प्रतिमा सुभाष वाघमारे** ८३ बुध्दविहीर भवानीपेठ, नड्डी वस्ती सोलापूर ४१३००२ |
| १२ | ६१३/२०२५ | ५११०१/- | १<br>३ | **विजयालक्ष्मी मधुकर कोळी** १०२/१६ भवानीपेठ, घोंगडे वस्ती सोलापुर ४१३००२ मो. ७०५८८५७९७३<br>**फरजाना अस्लम इनामदार** १०२ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ७७७६९९००१२ |
| १३ | ६१४/२०२५ | ४७७८८/- | २<br>३ | **विजयालक्ष्मी मधुकर कोळी** १०२/१६ भवानीपेठ, घोंगडे वस्ती सोलापूर ४१३००२ मो. ७०५८८५७९७३<br>**फरजाना अस्लम इनामदार** १०२ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ७७७६९९००१२ |
| १४ | ६१५/२०२५ | ४७७८८/- | १<br>२ | **फरजाना अस्लम इनामदार** १०२ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ७७७६९९००१२<br>**विजयालक्ष्मी मधुकर कोळी** १०२/१६ भवानीपेठ, घोंगडे वस्ती सोलापूर ४१३००२ मो. ७०५८८५७९७३ |
| १५ | ६१७/२०२५ | ४७७८८/- | २<br>४ | **विजयालक्ष्मी मधुकर कोळी** १०२/१६ भवानीपेठ, घोंगडे वस्ती सोलापूर ४१३००२ मो. ७०५८८५७९७३<br>**फरजाना अस्लम इनामदार** १०२ मवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ७७७६९९००१२ |
| १६ | ६१८/२०२५ | ५३८०४/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **अनिता सुर्यकांत साळुंखे** झोन नं २ रविवार पेठ, सोलापूर ४१३००५ मो. ७७७३९२९००७<br>**नजमा शहाजीलाल बागवान** ९२ संगमेश्वर नगर सुतमील, सोलापूर ४१३००६ मो. ९९७५१२०१७७<br>**शकीला महिबुब शेख** १०२/ ई २२ भवानीपेठ, घोंगडे वस्ती, सोलापूर ४१३००२ मो. ९९७५१२०१७७<br>**महादेवी राजेश गायकवाड** साई गणेश मंदीर जवळ, ३३ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९६७३३७८७७२<br>**रियाना हयात उटकूर** हनुमान मंदीर जवळ १०२ डी घोंगडेवस्ती, भवानी पेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९५९५४१६९४८ |
| १७ | ६१९/२०२५ | ५०३०४/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **नजमा शहाजीलाल बागवान** ९२ संगमेश्वर नगर, सुतमील, सोलापूर ४१३००६ मो. ९९७५१२०१७७<br>**महादेवी राजेश गायकवाड** साई गणेश मंदीर जवळ, ३३ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९६७३३७८७७२<br>**शकीला महिबुब शेख** १०२/ ई २२ भवानीपेठ, घोंगडे वस्ती, सोलापूर ४१३००२ मो. ९९७५१२०१७७<br>**अनिता सुर्यकांत साळुंखे** झोन नं २ रविवार पेठ, सोलापूर ४१३००५ मो. ७७७३९२९००७<br>**रियाना हयात उटकूर** हनुमान मंदीर जवळ १०२ डी घोंगडेवस्ती, भवानी पेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९६९५४१६९४८ |
| १८ | ६२०/२०२५ | ५०३०४/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **शकीला महिबुब शेख** १०२/ ई २२ भवानीपेठ, घोंगडे वस्ती, सोलापूर ४१३००२ मो. ९९७५१२०१७७<br>**नजमा शहाजीलाल बागवान** ९२ संगमेश्वर नगर, सुतमील, सोलापूर ४१३००६ मो. ९९७५१२०१७७<br>**रियाना हयात उटकूर** हनुमान मंदीर जवळ १०२ डी घोंगडेवस्ती, भवानी पेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९५९५४१६९४८<br>**अनिता सुर्यकांत साळुंखे** झोन नं २ रविवार पेठ, सोलापूर ४१३००५ मो. ७७७३९२९००७<br>**महादेवी राजेश गायकवाड** साई गणेश मंदीर जवळ ३९ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९६७३३७८७७२ |
| १९ | ६२१/२०२५ | ५०३०४/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **महादेवी राजेश गायकवाड** साई गणेश मंदीर जवळ, ३३ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ नो. ९६७३३७८७७२<br>**शकीला महिबुब शेख** १०२ / ई २२ भवानीपेठ, घोंगडे वस्ती, सोलापूर ४१३००२ मो. ९९७५१२०१७७<br>**रियाना हयात उटकूर** हनुमान मंदीर जवळ १०२ डी धागडेवस्ती, भवानी पेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९५९५४१६९४८<br>**नजमा शहाजीलाल बागवान** ९२ संगमेश्वर नगर, सुतमील, सोलापूर ४१३००६ मो. ९९७५१२०१७७<br>**अनिता सुर्यकांत साळुंखे** झोन नं २ रविवार पेठ, सोलापूर ४१३००५ मो. ७७७३८२९००७ |
| २० | ६२२/२०२५ | ५०३०४/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **रियाना हयात उटकूर** हनुमान मंदीर जवळ १०२ डी घोंगडेवस्ती, भवानी पेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९५९५४१६९४८<br>**अनिता सुर्यकांत साळुंखे** झोन नं २ रविवार पेठ, सोलापूर ४१३००५ मो. ७७७३९२९००७<br>**नजमा शहाजीलाल बागवान** ९२ संगमेश्वर नगर, सुतमील, सोलापूर ४१३००६ मो. ९९७५१२०१७७<br>**शकीला महिबुब शेख** १०२/ ई २२ भवानीपेठ, घोंगडे वस्ती, सोलापूर ४१३००२ मो. ९९७५१२०१७७<br>**महादेवी राजेश गायकवाड** साई गणेश मंदीर जवळ, ३३ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९६७३३७८७७२ |
| २१ | ६२६/२०२५ | ४६९६९/- | २ | **अनुराधा सुरेश जमादार** १०२ ब भवानी पेठ, सोलापूर ४१३००२ मी. ९८२३३०८२२२ |
| २२ | ६२७/२०२५ | ४६९६९/- | २ | **अनुराधा सुरेश जमादार** १०२ ब भवानी पेठ, सोलापूर ४१३००२ मो. ९६२३३०८२२२ |
| २३ | ६२८/२०२५ | ३६८३२/- | ३ | **कविता सचिन भोसले** जुना तुळजापूर नाका जवळ ८२ मड्डीवस्ती भवानीपेठ, सोलापूर |
| २४ | ६२९/२०२५ | ३६५२९/- | ३ | **कविता सचिन भोसले** जुना तुळजापूर नाका जवळ ८२ मड्डीवस्ती भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ८०५५४७४८५५ |
| २५ | ६३०/२०२५ | ४६३७९/- | १ | **कविता सचिन भोसले** जुना तुळजापूर नाका जवळ ८२ मड्डीवस्ती भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ८०५५४७४८५५ |
| २६ | ६३१/२०२५ | ४६३८५/- | ३ | **कविता सचिन भोसले** जुना तुळजापूर नाका जवळ ८२ मड्डीवस्ती भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ८०५५४७४८५५ |
| २७ | ६३२/२०२५ | ४६३८१/- | १<br>५ | **रेशमा निजाम शेख** मारुती मंदीर जवळ, १७१/३०९ मड्डीवस्ती शांतीनगर, सोलापूर ४१३००२ मो. ९६५७०४७१२६<br>**कविता सचिन भोसले** जुना तुळजापूर नाका जवळ ८२ मडीवस्ती भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ८०५५४७४८५५ |
| २८ | ६३३/२०२५ | १८६०४/- | १<br>५ | **अंबिका राजू हिरेमठ** ५२/५ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ७०५८८१०८०९<br>**लक्ष्मी शिवराज कुर्रे** १०/१२ भवानीपेठ, घोंगडेवस्ती, सोलापूर ४१३००२ मो. ९१४६४१५२६२ |
| २९ | ६३४/२०२५ | १८६०४/- | २<br>४ | **अंबिका राजू हिरेमठ** ५२/५ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ७०५८८१०८०९<br>**लक्ष्मी शिवराज कुर्रे** १०/१२ भवानीपेठ, घोंगडेवस्ती, सोलापूर ४१३००२ मो. ९१४६४१५२६२ |
| ३० | ६३५/२०२५ | १८६०४/- | २<br>४ | **अंबिका राजू हिरेमठ** ५२/५ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मी. ७०५८८१०८०९<br>**लक्ष्मी शिवराज कुर्रे** १०/१२ भवानीपेठ, धोंगडेवस्ती, सोलापूर ४१३००२ मो. ९१४६४१५२६२ |
| ३१ | ६३६/२०२५ | १८६०४/- | १<br>२ | **लक्ष्मी शिवराज कुर्रे** १०/१२ भवानीपेठ, घोंगडेवस्ती, सोलापूर ४१३००२ मो. ९१४६४१५२६२<br>**अंबिका राजू हिरेमठ** ५२/५ भवानीपेठ, सोलापूर ४१३००२ मो. ७०५८८१०८०९ |
| ३२ | ६३७/२०२५ | ६५३९०/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **सनाबेगम म.हनिफ शेख** १२ सरवदे नगर, विडीघरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६ मो. ७८४०९९९७६३<br>**रईसा शहाब्बोदीन पटेल** १७२ सग्गम नगर विडीघरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६ मो. ८८००३१७०२३<br>**तैमिना मोहसिन शेख** टिपूसुलता शाळेजवळ, ११ सरवदे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर ४१३००६ मो. ८४८५०२२५०४<br>**जबीन फातिमा जाविद शेख** टिपूसुलता शाळेजवळ, १८४ सरवदे नगर मुळेगाव रोड, सोलापूर ४१३००६ मो. ७८४०९११७०५<br>**नौशाद शफीक बागवान** ४७ सरवदे नगर, विडीघरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६ मो. ८८८८७५९६३६ |
| ३३ | ६३८/२०२५ | ६५३९०/- | १<br>३<br>३<br>४<br>५ | **रईसा शहाब्बोदीन पटेल** १७२ सग्गम नगर, विडीघरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६ मो. ८६००३१७०२३<br>**सनाबेगम म.हनिफ शेख** १२ सरवदे नगर, विडीधरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६ मो. ७८४०९९९७६३<br>**तैमिना मोहसिन शेख** टिपूसुलता शाळेजवळ, ११ सरवदे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर ४१३००६ मो. ८४८५०२२५०४<br>**जबीन फातिमा जाविद शेख** टिपूसुलता शाळेजवळ, १८४ सरवदे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर ४१३००६ मो. ७८४०९११७०५<br>**नौशाद शफीक बागवान** ४७ सरवदे नगर, विडीघरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६ मो. ८८८८७५९६३८ |
| ३४ | ६३९/२०२५ | ६५३९०/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **तैमिना मोहसिन शेख** टिपूसुलता शाळेजवळ, ११ सरवदे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर ४१३००६ मो. ८४८५०२२५०४<br>**सनाबेगम महनिफ शेख** १२ सरवदे नगर, विडीघरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६ मो. ७८४०९९९७६३<br>**रईसा शहाब्बोदीन पटेल** १७२ सग्गम नगर, विडीघरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६ मी. ८८००३१७०२३<br>**जबीन फातिमा जाविद शेख** टिपूसुलता शाळेजवळ, १८४ सरवदे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर ४१३००६ मो. ७८४०९११७०५<br>**नौशाद शफीक बागवान** ४७ सरवदे नगर विडीघरकुल हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६ मो. ८८८८७५९६३६ |
| ३५ | ६४०/२०२५ | ६५३९०/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **जबीन फातिमा जाविद शेख** टिपूसुलता शाळेजवळ, १८४ सरवदे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर ४१३००६ मो. ७८४०९११७०५<br>**सनाबेगम म.हनिफ शेख** १२ सरवदे नगर, विडीधरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००८ मो. ७८४०९९९७६३<br>**रईसा शहाब्बोदीन पटेल** १७२ संग्गम नगर, विडीधरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६ मो. ८६००३१७०२३<br>**तैमिना मोहसिन शेख** टिपूसुलता शाळेजवळ, ११ सरवदे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर ४१३००६ मो. ८४८५०२२५०४<br>**नौशाद शफीक बागवान** ४७ सरवदे नगर विडीघरकुल हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६ मो. ८८८८७५९६३६ |
| ३६ | ६४१/२०२५ | ६५३९०/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **नौशाद शफीक बागवान** ४७ सरवदे नगर, विडीघरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००८ मो. ८८८८७५९६३६<br>**सनाबेगम महनिफ शेख** १२ सरवदे नगर, विडीघरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६ मो. ७८४०९९९७६३<br>**रईसा शहाब्बोदीन पटेल** १७२ सग्गम नगर, विडीघरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६ मो. ८६००३१७०२३<br>**तैमिना मोहसिन शेख** टिपूसुलता शाळेजवळ, ११ सरवदे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर ४१३००६ मो. ८४८५०२२५०४<br>**जबीन फातिमा जाविद शेख** टिपूसुलता शाळेजवळ, १८४ सरवदे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर ४१३००६ मो. ७८४०९११७०५ |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्याने / पत्यावर आढळून येत नसल्याने /अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहिर समन्स देण्यात येत आहे.

प्रतिवादी यांना जाहिर समन्स द्वारे कळविण्यात येते की, उपनिर्दिष्ट अर्जा संबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः जातीने अथवा वकीला मार्फत दिनांक ५/८/२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर राहावे, प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्याच्या

गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्यतो निर्णय केला जाईल, आज दि. २४/०७/२०२५ रोजी माझी सही कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहिर समन्स दिले आहे.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : २४/७/२०२५**

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था सोलापूर शहर, सोलापूर**

## महत्वाचे...

### निंबर्गीत आजपासून सिध्दलिंग महाराज जीवनचरित्र कथा

**सोलापूर, दि.२४ जुलै-**



प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही श्री बसवेश्वर देवस्थान निंबर्गी येथे श्री सिद्धलिंग महाराज लच्याण यांचे जीवन चरित्रावर पुराणकथा आयोजित केली आहे. श्री महांतेश हिरेमठ (तदेवाडी) यांच्या अमृतवाणीतून ही कथा दररोज संध्याकाळी ७.३० ते रात्री ९ वाजेपर्यंत आयोजित केली आहे. प्रवचन संपल्यानंतर महाप्रसादाची सोय करण्यात आली आहे. निंबर्गी पंचक्रोशीतील भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन बसवेश्वर देवस्थान पंच कमिटीने केले आहे.



### वागदरीत भाग्यवंती देवी प्रकटदिन उत्साहात

**अक्कलकोट दि. २४ जुलै-**

वागदरी (ता.अक्कलकोट) येथील जागृत भाग्यवंती देवीचा प्रकटदिन व पाळणा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी विविध धार्मीक, सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यानिमित्त २३ जुलै रोजी रात्री भजन, भारुड, कीर्तन या कार्यक्रमाने जागरण करण्यात आले. दि. २४ जुलै गुरुवारी पहाटे देवीच्या मूर्तीस महारुद्र अभिषेक त्यानंतर नवग्रह पूजा, दाम्पत्य पूजा, होम हवन झाले. तदनंतर दुपारी एक वाजता हजारो भक्तगणांच्या व सुवासिनीच्या उपस्थितीत पाळणा व प्रकट दिन कार्यक्रम झाले. ष.नि.प्र. महास्वामी वीरक्त मठ वागदरी यांच्या दिव्य सानिध्यात हा कार्यक्रम झाला. हन्नूरचे उपसरपंच सागर कल्याणशेट्टी व शेळके प्रशालेचे चेअरमन बसवराज शेळके, गोगावचे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, प्रदीप जगताप, सुनील सावंत, शानपा मांगाणे उपस्थित होते. महाराष्ट्र, कर्नाटक, मराठवाडा, मुंबई, पुण्यासह पंचक्रोशीतील हजारो भक्तांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. श्री भाग्यवंती देवी चारिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष काशिनाथ पोमाजी, सिद्धाराम यमाजी, सुरेश सावंत, मल्लिनाथ परीट, बसवराज पोमाजी, रुद्रप्पा हुगे, महादेव सरसंबी, श्याम बाबर, महादेव सोनकवडे यासह ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

### शेटफळ येथे वकीलाच्या घरात चोरी; पाच तोळे सोने लंपास

**मोहोळ, दि.२४ जुलै-**

शेटफळ (ता. मोहोळ) येथील वकीलाच्या घरातून पाच तोळे सोन्याची चोरी झाल्याची फिर्याद मोहोळ पोलिस ठाण्यात दाखल झाली आहे. शेटफळ येथील वकील अॅड. कैलास निवृती खडके यांची पत्नी छाया हिने त्यांच्या गळ्यातील ३ लाख ६० हजार रूपयांचे साडेचार तोळे वजनाचे सोन्याचे गंठण, ३० हजार रुपयांची साडेतीन ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी या वर्णनाचे सोने दि. २७ मे रोजी स्वतः च्या राहत्या घरातील किचनमधील एका वाटीमध्ये भांड्याच्या रॅकवर ठेवले होते. ते नातेवाईकाच्या लग्नाच्या वेळी दि. १० जुन रोजी सकाळी १० वाजता पाहिले असता मिळून आले नाही. घरात इतरत्र शोध घेतला, चौकशी केली असता वरील वर्णनाचे सोने मिळून आले नाही म्हणून कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या सहमती वाचून चोरून नेले असल्याची फिर्याद मोहोळ पोलिस ठाण्यात कैलास निवृती खडके यांनी दाखल केली आहे. त्या अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास मोहोळ पोलिस करित आहेत.



### सोलापुर ते श्रीशैलम बससेवा पुर्ववत सुरु

**सोलापुर दि. २४ जुलै -**

हिंदु धर्मातील पवित्र श्रावण महिन्यात तीर्थक्षेत्र देवदर्शनासाठी सोलापूर आगाराने सर्वच तीर्थक्षेत्रासाठी विशेष बसेसची व्यवस्था केली आहे. यामध्ये सोलापूर ते श्रीशैलम बस सेवा पूर्ववत सुरू करण्यात आली आहे. आंध्र प्रदेशातील श्रीशैलम मल्लिकार्जुन दर्शनासाठी एसटी महामंडळाकडून विशेष बसची सोय केली असुन ही बस शुक्रवार पासून सकाळी सहा वाजता सोलापुरातून सुटेल उमरगा, हुमनाबाद, हैदराबाद मार्गे श्रीशैलम येथे रात्री ८ वाजता पोहचेल. श्रीशैलम येथुन परतीचा प्रवास सकाळी सहा वाजता सुटेल आणि रात्री आठ वाजता सोलापुरला पोहचेल अशी माहिती सोलापुरच्या आगार प्रमुखांनी दिली. भाविकांनी या बसचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

**श्रावणमासानिमित्त भाविकांनी लाभ घेण्याचे एसटी महामंडळाकडून आवाहन**



# २८ जुलैपासून श्री विठ्ठल पूजेची ऑनलाईन नोंदणी

**सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती**

**महानैवेद्य सहभाग योजनेचा देखील समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ जुलै-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्यपूजा, पाद्यपूजा, तुळशी अर्चन पूजा, महानैवेद्य सहभाग योजना इत्यादी सर्व प्रकारच्या पूजा श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. दि. १ ऑगस्ट ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीतील पूजेची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याची सुरवात दि.२८ जुलै रोजी स.११ पासून होत असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

याबाबत मंदिर समितीच्या दि. १५ जून रोजीच्या सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. भाविकांना पूजेची नोंदणी https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे. यापूर्वी पहिल्या टप्प्यात दि. ७ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२४, दुसऱ्या टप्प्यात दि.१ जानेवारी ते ३१ मार्च २०२५ तसेच तिस-या टप्प्यात दि. ०१ एप्रिल ते ३१ जुलै २०२५ या कालावधीतील श्रींच्या नित्यपूजा, तुळशी अर्चन पूजा व पाद्यपूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून व देशभरातून कर्नाटक, आसाम, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यातील भाविकांनी पूजेची नोंदणी केली होती. यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आता, चौथ्या टप्प्यात दि. १ ऑगस्ट ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा व पाद्यपूजा तसेच दि. ०१ ते ३१ ऑगस्ट, २०२५ कालावधीतील तुळशी अर्चन पुजा व महानैवेद्य सहभाग योजना ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ऑनलाइन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल. याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६-२९९२९९ या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा. याशिवाय पूजेचे बुकिंग मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरूनच करावे कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीस संपर्क करू नये, असे आवाहन कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.



**असे आहे विविध प्रकारच्या पुजेसाठींचे देणगी मुल्य**

श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेच्या नित्यपूजेसाठी अनुक्रमे रु.२५,०००/-, रू.११,०००/- तसेच पाद्यपूजेसाठी रू.५,०००/- व तुळशी अर्चन पूजेसाठी रू.२१००/- तसेच महानैवेद्य सहभाग योजनेसाठी रू.७,०००/- इतके देणगी मुल्य आहे.

# जि.प.चे सिईओ जंगम यांच्याकडे १५ दिवस जिल्हाधिकारीपदाचा चार्ज

**'त्या' खुर्चीवर बसून काम करतानाचा आनंद वेगळाच**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जुलै-**

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे १५ दिवस रजेवर गेले असल्याने त्यांचा पदभार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे दिला आहे. दरम्यान, आज जंगम यांचा पहिला दिवस असल्याने अनेकांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. तर आजचा पहिला दिवस आनंदी गेला असून, त्या खुर्चीवर बसून काम करतानाचा आनंद वेगळाच असल्याची प्रतिक्रिया सीईओ जंगम यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना दिली.




जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना २१ जुलै रोजी दोन वर्षे पूर्ण झाले आहेत. ते आता १५ दिवस खाजगी रजेवर गेले आहेत. त्यामुळे त्यांनी आपला पदभार सीईओ जंगम यांच्याकडे सोपविला आहे. अप्पर जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकूर याही रजेवर असल्याने हा पदभार जंगम यांना दिल्याचे सांगण्यात आले.

सीईओ कुलदीप जंगम यांना जिल्हा परिषदेमध्ये येऊन अकरा महिने झाले आहेत. त्यांच्याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी आपला पदभार सोपवला आहे. यामुळे आता तब्बल पंधरा दिवस जंगम हे सोलापूरचे जिल्हाधिकारी राहणार असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या कामाचा अनुभव त्यांना शिकायला मिळणार आहे. नुकत्याच झालेल्या आषाढी वारीमध्ये या जोडीने वारीचे अतिशय उत्कृष्ट नियोजन केले होते. याची दखल थेट मुख्यमंत्र्यांनीही घेतली होती. दरम्यान, जिल्हाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार जंगम यांच्याकडे आल्याने आज पहिल्या दिवशी त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव झाला.

### मंत्री भुजबळ, पडळकरांनी घेतले सावता महाराजांच्या समाधीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २४ जुलै-**

श्री क्षेत्र अरण (ता. माढा) येथे संत शिरोमणी श्री सावता महाराजांच्या ७३०व्या संजीवन समाधी सोहळयानिमित्त पारंपरिक पद्धतीने श्रीफळ हंडी सोहळा उपस्थित राहून श्री सावता महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. या प्रसंगी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, आमदार अभिजीत पाटील, आमदार गोपीचंद पडळकर, माजी सभापती शिवाजी कांबळे, माजी सभापती भारत शिंदे, संत सावता महाराजांचे वंशज सावता महाराज वसेकर, प्रभू महाराज माळी, संत सावतेबुवा महाराज देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विठ्ठल गाजरे,सचिव विजय शिंदे आदी उपस्थित होते.



# चौभेपिंपरी येथे बनावट मद्य निर्मितीच्या कारखान्यावर धाड

**चार लाखांचा मुद्देमाल जप्त**

**राज्य उत्पादन शुल्कची कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ जुलै -**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने चौभेपिंपरी (ता. माढा) येथील बनावट मद्य निर्मितीच्या कारखान्यावर धाड टाकून ४ लाख ४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये स्पिरीट, गोवा निर्मित विदेशी मद्य, विदेशी मद्याची बनावट लेबले, बुचे, रिकाम्या बाटल्या, बाटल्या सील करण्याचे दोन सिलींग मशिन, दोन वाहने याचा समावेश आहे.



अकलूज येथील पथकाने चौभेपिंपरी येथील बनावट विदेशी मद्याच्या कारखान्यावर धाड टाकून तीन जणांना अटक केली. या पथकाने ३० बल्क लिटर स्पिरीट, १५३ बल्क लिटर विदेशी मद्य, ८९ बल्क लिटर बनावट विदेशी मद्य जप्त केले. तसेच कुर्डूवाडी विभागाने चारचाकी वाहनातून गोवा बनावटीची दारूची वाहतूक पकडून ७ लाख २ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

जुलै महिन्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून १९२ गुन्हे नोंद करून १७० जणांवर कारवाई करण्यात आली. शहर व जिल्ह्यातील अवैध हातभट्टींवर केलेल्या कारवाईत ५७ हजार ७५५ लिटर रसायन, ३८९४ लिटर हातभट्टी दारू, ५२० बल्क लिटर देशी मद्य, १६९ बल्क लिटर विदेशी मद्य, १२८ बल्क लिटर बिअर, ७९८ लिटर ताडी तसेच १६ वाहने असा ६६ लाख ५ हजार ९७ रुपयांचा मद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच अवैध मद्य विक्रि करणाऱ्या व मद्य पिण्यास परवानगी देणाऱ्या होटगी येथील हॉटेल आप्पाश्री ढाबा व हॉटेल याराना ढाबा यावर गुन्हे नोंदवून १८ जणांवर कारवाई करण्यात आली. ही कारवाई अधिक्षक भाग्यश्री जाधव, उपअधिक्षक एस आर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक आर एम चवरे, जे एन पाटील, ए व्ही घाटगे, राकेश पवार, पंकज कुंर, सचिन भवड, दुय्यम निरीक्षक एस डी कांबळे, नागरे, सुखदेव सिद, सचिन शिंदे, कदम, कुदळे, नेवसे, भुमकर, सहाय्यक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, मोहन जाधव, संजय चव्हाण, जवान आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, अशोक माळी, चेतन व्हनगुंटी, देविदास चौधरी, योगेश पाटील, अनिल पांढरे, विनायक काळे, पवन उगले, कपिल स्वामी, दिपक वाघमारे, सानप, मारूती जडगे, महिला कर्मचारी शिवाजी मुंढे, दिपाली सलगर यांनी केली.

# बंकलगीतील शिबिरात ७० जणांचे रक्तदान

**लक्ष्मण सुतार यांचे १०८ वे रक्तदान**

**प्राणीमित्र संस्था व श्रेया कॉम्पुटरचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**बंकलगी, दि. २४ जुलै-**

बंकलगी (ता. दक्षिण सोलापूर) येथील ग्रामदैवत मल्लम्मा देवी यात्रेनिमित्त प्राणिमित्र बहुउद्देशीय सामाजिक संस्था व श्रेया कंप्युटर यांच्यावतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ७० जणांनी रक्तदान केले. येथील लक्ष्मण सुतार यांनी या शिबिरात आपले १०८ वे रक्तदान करत गावातील प्रथम शतकवीर रक्तदाता होण्याचा मान मिळवला.

शिबिराचे उद्घाटन सरपंच चंद्राम सगरे यांच्या हस्ते श्री महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमापूजनाने झाले. यावेळी राजशेखर सगरे, यात्रा कमिटीचे लक्ष्मण कोणदे, चंद्रकांत कोणदे, सिद्धाराम मंगरूळे, काशिनाथ कोणदे, प्राणी मित्र मल्लिकार्जुन धुळखेडे, सुरेश जगताप, माणिक देशमुख, प्रशांत सगरे, अमृत देखणे, शिवानंद कोणदे, षडाक्षरी स्वामी, सुनील देशमुख, चनबसप्पा कोणदे, मल्लिकार्जुन मदभावी, सचिन देशमुख, तंटामुक्ती अध्यक्ष मल्लिकार्जुन चेंडके, मौलाना रफीक नदाफ, मुकेश वाघमारे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. शिबिरास श्री मित्र प्रेम गणेश तरुण मंडळ, बसवेश्वर तरुण मंडळ व समस्त ग्रामस्थांचे सहकार्य लाभले. सेलापूरच्या सिद्धेश्वर ब्लड सेंटरने रक्त संकलन केले. वळसंग पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक अनिल सनगले यांनी रक्तदात्यांना प्रबोधन केले,



# शहर मध्य मतदारसंघात विक्रमी ९४३ रक्तदान

**आमदार देवेंद्र कोठे यांचा पुढाकार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शहर मध्य विधानसभा मतदारसंघात मंगळवारी ९४३ जणांनी विक्रमी रक्तदान केले. शहर मध्य मतदारसंघात तीन ठिकाणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च न करता रक्तदान शिबिरे आणि समाजोपयोगी कामासाठी तो पैसा खर्च करावा असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत आमदार कोठे यांनी एमआयडीसी येथील बालाजी मंगल कार्यालय, मोदीतील अष्टभुजा मंदिर आणि लष्कर बेडर पूल येथील श्री अंबाबाई देवस्थान येथे रक्तदान शिबिर घेतेल. यावेळी आ. कोठे, भाजपा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, अविनाश महागावकर, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, विनायक कोंड्याल, रामचंद्र जन्नु, देवेंद्र भंडारे, अक्षय अंजिखाने, नागेश सरगम, नागेश खरात, रवी कैय्यावाले, मेघनाथ येमुल, राजकुमार हंचाटे, भारतसिंग बडुरवाले, माजी नगरसेवक अनिल पल्ली, जेम्स जंगम, माजी नगरसेविका मीनाक्षी कम्पल्ली, रामेश्वरी बिर्रू, अंबादास करगुळे, सिद्धाराम खजूरगी, विठ्ठल कोटा, सारिका सुरवसे, राजेश अनगिरे, काशिनाथ झाडबुके, भूपती कमटम, बजरंग कुलकर्णी, यशवंत पाथरूट, दिलीप पतंगे, राजा माने, रमेश यन्नम, आनंद बिर्रु, दत्तात्रय पोसा, मधुकर वडनाल, संतोष कदम, अविनाश बेंजरपे, रवी कोळेकर, सिद्धेश्वर कमटम, अजय यादव, अंबादास बिंगी आदींची उपस्थिती होती.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च न करता सामाजिक उपक्रम राबवण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले होते. त्यानुसार ही रक्तदान शिबिरे झाली. शहर मध्य मतदारसंघात झालेले विक्रमी रक्तदान हे लोकप्रिय मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावरील जनतेच्या प्रेमाचे प्रतीक आहे.
**- देवेंद्र कोठे, आमदार, शहर मध्य**

**मतदानाप्रमाणे रक्तदानासाठीही रांगा**

विधानसभा निवडणुकीत मतदानासाठी जशा रांगा लागल्या तसेच चित्र रक्तदानाला दिसून येत होते. नागरिकांनी ९४३ इतक्या प्रचंड संख्येने रक्तदान करून प्रतिसाद दिला.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)